## डॉ. नितीन मोरे

# मच्छर टाईम्स



# मच्छर टाईम्स

डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

# मच्छर टाईम्स

लेखक :डॉ. नितीन मोरे

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन : ३ मे २०१७

(मराठी भाषा दिन)

©esahity Pratishthan®2017

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# मच्छर टाईम्स

## प्रस्तावना

आजची वृत्तपत्रे ही उद्याची रद्दी आहेत असे म्हणतात म्हणे !
मला नाही तसे वाटत.
म्हणजे वृत्तपत्रांतील काही मजकूर काळावर मात करून टिकून राहतो.
नुसताच टिकतो असे नाही तर प्रबोधन करतो.
असा उद्बोधक मजकुराची कमी या सुजलाम सफलाम महाराष्ट्रात तर नाहीच नाही.
गरज आहे फक्त तो शोधून काढून सुजाण वाचकांच्या समोर आणण्याची.
मच्छर टाइम्स मध्ये हाच प्रयत्न आहे.
वर्तमानपत्रीय असल्याने हा मजकूर काल्पनिक असल्याची पळवाट नाही काढता यायची पण तरीही यातील मजकुराचा जिवंत वा कोण्या मृत व्यक्तीशी संबंध वा सारखेपणा हा निव्वळ योगायोग समजावा !

डॉ. नितीन मोरे

अर्पणपत्रिका

जिवाची मुंबई करावी त्याप्रमाणे
जिवाची पत्रकारिता करणा-या
सर्व बोरूबहाद्दर पत्रकारांस
सादर नि सप्रेम !

# अनुक्रमणिका


१) मच्छर टाईम्स: एक नवीन दैनिक

२)

- एक प्रवचन
- मी मठाधिपती कसा झालो?
- ही तो महाराजांची इच्छा

३)

- नामदार श्री. संपतराव सुरनळे यांची मुलाखत
- सुदामराव शिर्के : आपले भावी मुख्यमंत्री
- मालिनीताई समर्थ : बंद हृदयसम्राज्ञीला श्रद्धांजली

४ चोराच्या वाटा (एक संक्षिप्त आत्मचरित्र) : श्री.मनोहर घांग्रे

५

- 'ठाम्मत' या संग्रहाच्या प्रकाशना निमित्ताने
- तीन पत्रे

६ माणसं : अशी नि तशी

७ अर्वाचीन महाराष्ट्रातील काही खास खाद्यपदार्थ

८ बंगलोर ट्रीप : एक प्रवासवर्णन

९ काही बातमीपत्रे

१० थिल्लर टाईम्स

११ टीकेविना !

१

## मच्छर टाईम्स : एक नवीन दैनिक

त्या दिवशी रात्री उशीरा झोपलो. बाराला मल्टीप्लेक्सातला शो संपला. मल्टीप्लेक्स मधला सिनेमा म्हणजे खिशाला भोक आणि त्या पैशांनी हिरो नाहीतर हिरॉईनीची श्रीमंती पाहणे, पण बालहट्ट पुरवावाच लागला. रात्रीचा शो संपवून घरी आलो. गाढ झोपेत रात्री पांघरूणातून कोठून कसा कोणास ठाऊक पण एक मोठा मच्छर शिरला नि त्याने कडकडून चावा घेतला. तो मच्छरपण कसा? लार्जर दॅन लाईफ नुसता. एखाद्या झुरळाएवढा मच्छर मी प्रथमच पाहात होतो. त्याची नांगीच एखाद्या दाभणासारखी होती. सिनेमात कसे सारेच एन्लार्ज करून दाखवतात तसा हा मच्छर. सिनेमातल्या हीरोच्या घरी भिंतींवर पालींऎवजी मगरी चालतात नि दाराशी कुत्र्याऎवजी वाघाला बांधून ठेवलेले असते. हा फिल्मी मच्छर चावला तसा मी हात वर करून त्याला मारायला लागलो. पकड पकड मला पकड म्हणत तो उडायला लागला. मी त्याच्या मागे लागलो पण तो कसला हाती येतोय?

पहाटे जाग आली तर कानात आवाज येऊ लागले,

'ए, तू तिकडे चाव, ही माझी एरिया आहे'

'ती तिकडे बाई झोपली आहे तिला चाव'

'माझे पोट भरले आता, दमलो रात्रभर उडून उडून. आता मस्त ताणून देणार'

'डेली ही रात्रपाळी, त्या डेंगूच्या डासांना बरी दिवस पाळी मिळते? पुढचा जन्म तरी डेंगू डासाचा मिळो.'

मी चमकलो. आजूबाजूला कानात गुणगुणऱ्या मच्छरांची बोली मला कळायला लागली होती ! ती गुं गुं भाषा होती आणि लहान मुलांच्या गोष्टीतील पक्ष्यांची भाषा समजणाऱ्या माणसासारखे हे झाले होते. कानात मग रोज रात्री गुं गुं भाषेतील मच्छरांची बडबड ऎकायला येऊ लागली. कानात नुसता गोंगाट सुरू झाला. या गुणगुणण्यातून काय काय ऎकायला यावे?

'त्या तिथे शेजारी गेलो तर तिथला माणूस रात्र भर जागा, लाईट चालूच.'

'तिकडे नवीन काहीतरी धूरवाली अगरबत्ती जाळतात, असा खोकला आला, लगेच उडून आलो तिकडून.'

'त्या घरातील मालकीण काय चांगली आहे, घरभर नुसता पसाराच पसारा. लपाछपी खेळायला मस्त मजा येते.'

'तिकडच्या त्या काळयाच्या वाटेला जाऊ नकोस, काय जाड कातडी त्याची, माझी नांगी तुटता तुटता बचावली. आणि परत त्याचे रक्त पिऊन आजारी पडायचो आपण.'

असे काही बाही ऐकायला येऊ लागले. एके दिवशी मात्र काही वेगळेच घडले. एक मच्छर दुसऱ्याला काहीतरी मच्छर टाईम्स बद्दल सांगत होता. मच्छर आणि माशा यांची युती झाली होती आणि त्यांनी हा मच्छर टाईम्स नावाचा पेपर काढला आहे म्हणे ! माझे कुतुहल जागे झाले आणि मी या मच्छर टाइम्सच्या मागे लागलो. गुं गुं ची भाषा समजू लागली होती मला त्यामुळे सारेच कसे सोपे झाले...

जे जे आपणासी ठावे ते इतरांना सांगावे म्हणतात. तेव्हा माझ्या या मच्छर टाईम्स ची माहिती खास माणसाच्या भाषेत ( मराठीत प्रथमच ! ) आपल्या साठी.

मच्छर टाईम्स चे संपादक वगैरे मंडळ बहुधा कोठल्यातरी पेपराच्या ऑफिसात चावाचावी करत असावे कारण त्यांच्या पेपराचे स्वरूप कितीतरी आपल्या दैनिकांसारखेच आहे.

हे आहे त्याचे मास्ट हेड

**'एकच चावा : मच्छर टाईम्स'**

मच्छर आणि मक्षिकांचे एकमेव दैनिक व्यासपीठ

अस्वच्छता हाच परम धर्म

शेवटची ओळ ही त्यांची टॅग लाईन असावी किंवा लाइफ लाईन ही म्हणता येईल. यापुढे मच्छर टाईम्स मध्ये आपल्या पेपरासारखीच सदरे. अग्रलेख, बातम्या, फोटो, जाहिराती वगैरे वगैरे.

पहिल्याच पानावर मुख्य बातमी मच्छर टाइम्सच्या पहिल्या अंकाबद्दल. त्या उद्घाटनाचे फोटो बिटो, आणखीन वृतांत. मग अग्रलेख.

<u>अग्रलेख</u>

## माणसाचे डोके ठिकाणावर ठेवावे काय?

मनुष्यप्राणी स्वत:ला उत्क्रांत वगैरे समजतो. साध्या भाषेत सांगायचे तर तो स्वत:ला शाण्या समजत असेल. देशोदेशी माणसाला केन्द्रस्थानी धरूनच सारे काही होत असते. अगदी शिरगणती देखील माणसांचीच होते. त्यात परत हे बाता पण मानवकल्याणाच्याच करतात. जणू काही जगात आणखी कोणीच नाही ! पण मानवाच्या लक्षात न आलेली बाब अशी की मच्छर आणि माश्या हेच या जगातील बहुसंख्य आहेत. माणूस हा त्या मानाने अल्पसंख्यांत मोडतो. असे असताना या अल्पसंख्याकांनी असा तोरा मिरवावा का? आणि आपल्या सारख्या बहुसंख्यांनी त्यास भिऊन जगावे का? मच्छर मक्षिकांची एकजूट व्हावी आणि माणसास त्याची जागा दाखवून द्यावी याकरता हा मच्छर टाइम्सचा प्रपंच मांडत आहोत. याचे आपण सर्वांनीच स्वागत केले पाहिजे. मानवाशी लढा हेच आपले ध्येय आहे आणि असले पाहिजे.

या पार्श्वभूमीवर हा मच्छर टाइम्सचा पहिला अंक आपल्या सोंडेत देताना आम्हाला अत्यानंद होत आहे. या आपल्या मच्छर टाईम्स मध्ये काय काय असेल? मच्छर मक्षिका जगातील बातम्या आणि घडामोडी असतील, रोखठोक भूमिका घेणारे अग्रलेख असतील.काय नसेल म्हणाल तर पेज थ्री मात्र नसेल. मनुष्यप्राण्याने आपली लाज सोडून काहीबाही तो छापत असेल पण हा सभ्य मच्छर आणि माश्यांचा सभ्य मच्छर मक्षिकांकरता पेपर असेल. तेव्हा न छापण्याजोग्या अवस्थेतील फोटो आम्ही छापणार नाही. एवढी लाज आम्ही अजूनतरी बाळगून आहोत. तेव्हा थोडक्यात हे पेज थ्री प्रकरण मात्र आपल्या पेपरात नसेल. जाहिरातदारांच्या कृपेनेच हे अंक चालवणे शक्य होणार आहे तेव्हा जाहिरात पुरवण्या असतील.

दैनिक स्वरूपात निघणाऱ्या या पेपरास या निमित्ताने आपल्या शुभेच्छा मिळाव्यात हीच विनंती आपणा सर्वांच्या पंखांशी आहे ! या निमित्ताने आपला मानवाशी होणारा लढा अजून जोमाने पुढे जाईल यात शंका नाही.

संपादक

यानंतर या दैनिकातील काही बातम्या पहा :

**मलेरिया  वाहक डासांची पैदास**

उडासपूर शहरात मलेरिया वाहक डासांची पैदास या विषयावर कार्यशाळा भरविण्यात येणार आहे. मलेरियाचे रोगी मानव ओळखण्याचे प्रशिक्षण, गनिमी काव्याने त्याच्या पांघरूणात कसे शिरावे, अंगावरच्या कपड्यांतून नांगी मारण्याचे प्रात्यक्षिक प्रशिक्षण यात देणार आहे. मलेरियाच्या पॅरासाईट्सनी ही कार्यशाळा प्रायोजित केलेली आहे. इच्छुक मच्छरांसाठी ही कार्यशाळा विनामूल्य राहील.

**डेंग्यू पसरवणाऱ्या मच्छरांनो सावधान !**

मागील वर्षी डेंग्यू मच्छरांनी आपल्या प्राणाची बाजी लावून डेंग्यू प्रसार करण्याचा यशस्वी प्रयत्न केला असला तरी मानवाने विविध उपाय योजत यात अटकाव आणण्याचे प्रयत्न केले आहेत. यात कित्येक मच्छरांना आपला जीव गमवावा लागला आहे. यावर्षी याबद्दल मच्छरांस खास इशारा देऊन सावधान करण्यात येत आहे.

**बकालपूरात एक हजार मच्छर शहीद**

काल बकालपूरातील एका घरात उडणाऱ्या मच्छर बांधवांवर माथेफिरू मानवाने केलेल्या स्प्रे हल्ल्यात हजाराहून अधिक मच्छर शहीद झाल्याची बातमी आहे. हा हल्ला रात्रीच्या वेळी झाल्याचे समजते. हा मच्छरजातीवरचा भ्याड हल्ला असल्याचे मच्छर-मक्षिका युतीचे निमंत्रक डासू उडास यांनी म्हटले आहे.

**मक्षिकांस खूशखबर**

लवकरच आंब्याचा मौसम येणार असून यावेळी ते पीक जोरात येईल असे वृत्त आहे. माणसाने खाऊन टाकलेल्या आंब्यांवर मक्षिका भगिनींचा डॊळा असल्याने त्यांना ही खूशखबरच आहे. तेव्हा मक्षिका भगिनींनो तयार राहा.

**अखिल विश्व मच्छर मक्षिका युतीस आवाहन**

नुकतीच मच्छर मक्षिका युती झाली असून त्यात गृहोपजीवी झुरळे आणि पाली यांना सामावून घेण्यात यावे असे आवाहन झुरळे आणि पालींच्या वतीने करण्यात आले. युतीच्या प्रवक्त्याने यावर विचार होईल पण न उडणाऱ्या जीवांचा समावेश करावा की नाही यात मतभेद असल्याचे सांगितले. तिकडे मधमाशा घरातील माशा नसल्याने त्यांचा युतीत समावेश करू नये असे मक्षिका प्रवक्त्या उडूबाई यांनी म्हटले आहे.

पेपर म्हटला की जाहिराती आल्याच. बातम्यांशिवाय नि अग्रलेखांशिवाय पेपर निघू शकतात पण जाहिरातींशिवाय? कधीच नाही. मच्छरटाईम्सही त्याला अपवाद नाही. नमुन्यादाखल काही जाहिराती बघा :

**नांग्या शार्पनर**

मच्छरांना खूशखबर ! आपापल्या नांग्या तीक्ष्ण करणारे नवीन यंत्र ! जाड ब्लँकेटातून आरपार घुसवता येईल अशी धार मिळवा !

**चिकटू रसायन**

मक्षिकांस एका ठिकाणी चिकटून राहून जास्तीत जास्त अन्नग्रहण करण्यास मदत करणारे रसायन ! हे वापरणाऱ्या माशांचे वजन सरासरी एक ग्रामने इतरांहून जास्त भरल्याचे एका पाहणीत दिसून आले आहे. हे रसायन प्रमुख दुकानांतून उपलब्ध आहे !

**जीवन शिक्षण वर्ग : मच्छर मक्षिकांस जीव वाचवण्याचे शिक्षण**

मानवाने आपल्या प्रजाती विरूद्ध विविध रसायने वापरात आणली आहेत. या रसायनांना दाद न देण्याचे खास प्रशिक्षण वर्ग चालवण्यात येणार आहेत. मच्छर दाणीत घुसण्याचे प्रशिक्षण मोफत देण्यात येईल. त्वरा करा ! फक्त काही हजार जागा उपलब्ध ! प्रथम उडत येणाऱ्यास प्राधान्य !

यानंतर एक मोठी घोषणा करण्यात आलेली आहे

**अखिल विश्व मच्छर मक्षिका संघटना महासंमेलन**

उडासपूरात येत्या काही दिवसांत हे महासंमेलन भरवण्यात येणार आहे : त्यातील काही प्रमुख आकर्षणे :

डासू चावरे अध्यक्ष : डासू चावरे हे डीडीटी हल्ल्यातून आजवर शंभर वेळा वाचलेले असून ते अध्यक्ष पद भूषवतील. त्यांच्या 'डी.डी.टी. चे दिवस' या पुस्तकाचे प्रकाशन ही तेव्हा करण्यात येईल.

जाहीर सत्कार : एक हजार मलेरिया जंतू पसरवणारे मच्छर बांधव व टायफॉईड पसरवणाऱ्या मक्षिका यांचा जाहीर सत्कार यावेळी होईल.

परिसंवाद : दोन परिसंवाद होतील १.मधमाशा या माश्या आहेत का? २. मुंग्यांना संघटनेत सन्मानाने बोलवावे काय?

निषेध : मच्छरदाणी, ओडोमॉस तसेच विविध रसायनांनी आपल्या जातीचा नायनाट करू पाहणाऱ्या मानवजातीचा निषेध करण्यात येईल. मानवी भाषेत माश्या मारणे, माशी शिंकणे, कोणास मच्छर म्हणणे असे प्रचलित प्रकार आहेत. अशी भाषा वापरणाऱ्या मानवाचा निषेध करण्यात येईल.

आभार प्रदर्शन : डेंग्यू, मलेरिया, टायफॉईड, कावीळ असे रोगजंतू आपल्यावरच अवलंबून असतात. त्यांच्या संघटनांकडून आभार प्रदर्शन करण्यात येईल.

हा आहे मच्छरटाईम्सचा पहिलाच अंक ! पुढे काय काय होईल? जोपर्यंत ही गुंगुं भाषा अवगत आहे तो पर्यंत नवनवीन माहिती मी देतच राहिन !

२

**धर्मसत्ता ! एखाद्या राजाची सत्ता असते, ती तो गाजवतो ही. तशीच धर्मसत्ता असते. ती गाजवणारे अनेक. लोकांनाही ती भक्तीभावे श्रद्धापूर्वक गाजवून घ्यायला आवदते. त्यातूनही ती सनातन असली तर पहायलाच नको. मासिक 'सनातन धर्मसत्ता' मधील दोन लेख वाचकांना उद्बोधक वाटावेत. एक स्वामी बटुकनाथांच्या आश्रमातील प्रवचन तर दुसरे स्वामी अपूर्णानंदांचे मनोगत ! गंभीरतेतून थोडी रजा घेऊन या मासिकाने ही तो महाराजांची इच्छा ही गोष्टही अलिकडेच छापली. ती वाचकांना आवडेल अशी श्रद्धा वाटते. कारण हे सर्व छापले आहे ते सनातन धर्मसत्तेत! तेव्हा स्वामीजींचे स्मरण करा नि वाचा. तुम्हाला आत्मिक उन्नतीचा मार्ग जरूर दिसेल! शुभम भवतु !**

- एक प्रवचन
- मी मठाधिपती कसा झालो?
- ही तो महाराजांची इच्छा !

**एक प्रवचन**

( संत श्री समर्थ सद्गुरूदेव स्वामी बटुकनाथानंद बापू महाराजांचे शिष्य श्री. अडगडानंद यांचे बटुकआश्रमातील एक प्रवचन )

भक्त आणि भक्तिणींनो,

बोला जय बटुक

या. आलात महाराजांच्या दरबारात? या तुमचे स्वागत आहे. पण तुम्ही कोण आहात? तुम्ही कोणाचे भाऊ असाल, कोणाचे बाप असाल नि कोणाचे पुत्र असाल. कोणाचे कायद्यातील पुत्र म्हणजे जावई असाल, कोणाचा नवरा असाल. या आमच्या भक्तिणी कोणाच्या मुली तर कोणाच्या आई असतील, सासू नाहीतर सून असतील. नणंद नाहीतर भावजया असतील. पण महाराज म्हणतात तुम्ही सारे खरे तर दगडगोटे आणि विटा आहात.

तेव्हा हे दगडांनो आणि विटांनो, नामाचा जप करा, तप करा आणि स्वउद्धार करा. हा भवसागर तरून जाण्यास बटुकनाथ जप पुरेसा आहे. प्रत्यक्ष रामायणातला दाखला आहे. महासागरात रामनाम लिहीलेले खडक तरंगले. रामनामाच्या विटा तरंगल्या. या भवसागरात बुडायचे नसेल नि तरंगायचे असेल तर नाममहिमा जाणून घ्या. बटुक नामस्मरण तुम्हाला तारून नेईल. आणि बुडण्यापासून वाचवेल. बटुकनाथ प्रत्यक्ष प्रभू रामचंद्रांचा अवतार आहेत. बोला संत श्री समर्थ सद्गुरूदेव स्वामी बटुकनाथानंद बापू महाराज की जय. जय जय बटुकनाथानंद हरी.

( मग अडगडानंद एकाएकी दूर रोखून पहायला लागतात.)

तो पहा. तो पहा मला दिसतोय...

(भक्त आणि भक्तिणी मागे वळून पाहू लागतात )

पहा पहा तो इसम म्हणावा असा माणूस बुडत आहे. किस किसम का इसम है यह? साधासुधा सामान्य माणूस आहे हा. तो भवसागरात बुडत होता. वाचला. वाचला. आता त्याला किनाऱ्यावर कोणी घेऊन आले आहे. कोणी लावले त्यास किनाऱ्यास? कोण आहे

त्यास वाचवणारा? अर्थात आपले बटुक महाराज आहेत. ज्यांची श्रद्धा त्यांना दिसेल. ज्याचा भाव त्याचा देव. बिन भावाचा देव म्हणजे दगडाची मूर्ती. भाव म्हणजे भाजी आणि डाळीचा भाव का? आटेदाल का भाव का? तर नाही. भाव म्हणजे मनातील शुद्ध भाव. पहा तो शूद्र माणुस. कसा आहे तो? जीवजंतू सारखा. आतापर्यंत तो बुडत होता. तो आता पोहोचला किनाऱ्यावर. कारण एकच महाराजांवरील श्रद्धा. महाराजांनीच त्याला वाचवले. ( अडगडानंद मग मधेच गाऊ लागतात..)

**हे विश्वचि अवघी माया बटुका धर रे तुझी छाया**
**बटुक जप जे जे करिती भवसागर ते तरूनि जाती.**
मग आरतीच्या चालीत
**जय बटुक जय बटुक जय बटुक देवा**
**तुझ्या मुळे मिळे आम्हा छत्र आणि छाया**
बोला संत श्री समर्थ सद्‌गुरूदेव स्वामी बटुकनाथानंद बापू महाराज की जय.

तू कोण आहेस? ती कोण आहे? हा कोण आहे? ही कोण आहे? वर काय आहे? खाली काय आहे? आकाशात काय आहे? पाताळात काय आहे? हे सर्व क्षूद्र जंतू आणि जीव आहेत. हा संसार या जीव जंतूंनी भरलेला आहे. या यकश्चित मानवाला वाचवण्यासाठी बटुकमहाराजांचा अवतार आहे. महाराज काय म्हणतात? नाव घेत रहा. नावे ठेऊ नका, घ्या. कोणाचे नाव घ्याल? बायकोने नवऱ्याचे नाव घ्यावे का? काही फायदा नाही. महाराजांचे नाव घ्या. महाराज काय म्हणतात? नाव घेत रहा. मनात दुसरा विचार आणू नका. श्रद्धेने महाराजांच्या पायी डोके ठेवा. आपल्याकडील गोष्टींचा त्याग करा. निर्मोही बना. संपत्तीचा साठा नको. सोने नको, नाणे नको. ही सर्व माया त्यागून टाका. त्याग म्हणजे दान करा. महाराजांच्या चरणी वाहून टाका. भक्तीभावाने वहा. ज्याचा भाव जास्त नि त्याग जास्त त्याला मिळेल मन:शांती जास्त. जो हसत दान देतो त्याला शांति लाभेल.

हे पहा मंगळदास शेठ. त्यांच्या गोडाऊन मध्ये छापा पडणार होता. महाराजांच्या चरणी त्यांनी वाहून घेतले. आज शेठजी सुखात आहेत. शांतीत आहेत. हे कसे झाले?

महाराजांच्या कृपेने झाले. महाराजांच्या दरबारात या. त्यांना शरण जा. बाकी काही करा. पण महाराजांकडे कबूल करा. काळी कृत्ये करा ती महाराज पांढरी करू शकतील पण त्यासाठी विश्वास हवा. श्रद्धा हवी. भक्ती हवी नि भाव हवा. महाराज सर्वांचेच आहेत. त्यांची भक्ती हीच तुमची शक्ती. फक्त नुसती भाकर वाढू नका, बरोबर भाजी हवी, कालवण हवे. दान म्हणजे कालवण. दान करा नि महाराजांच्या कृपाप्रसादाने सुखी व्हा. महाराज काय करतात? तुमचेच रक्षण करतात. तुम्ही कोणीही असा. काहीही काम करत असा. महाराज म्हणतात तुमचा धर्म सोडू नका. काय असतो एखाद्याचा धर्म? व्यापारी असेल तर तो काळाबाजार करेल, साठेबाजी करेल. सोनार असेल तर तो सोन्याच्या वजनात फसवणूक करेल, थोडेफार त्यांत तांबे मिसळेल. भाजी विकणारा वजनात मारेल. सरकारी अधिकारी लोकांची अडवणूक करेल, लाच घेऊन कामे करेल. एखादा राजकारणी असेल तर लोकांच्या नावाने आपली तुंबडी भरेल. विद्यार्थी असेल तर तो न पकडले जाता कॉपी करेल. गृहिणी इकडच्या चुगल्या तिकडे करेल, आणि सद्गृहस्थ ते शांतपणे ऐकून घेईल. हाच आपापला धर्म आहे. आपण सर्वच अत्यंत धार्मिक आहोत. आपण आपापला धर्म पाळणारच. आम्ही श्रद्धाळू आहोत. आम्ही देवा दारी जातो. त्या दगडाच्या मूर्तीशी वन वे बोलतो. महाराजांची देवाशी डायरेक्ट हॉट लाईन आहे. आपल्या व्यथा महाराज दूर करतील. महाराजांना तुमच्या कडून फक्त काय हवे? भक्ती आणि भाव. भाकर आणि भाजी.

महाराज काय म्हणतात? हे विश्व अवघी माया आहे. ही माया कोण? माया मेमसाब काय? की माया नावाची मुलगी? की आईची मुलावरची माया? मायानगरीतली माया? एखाद्याने जमवून ठेवलेली माया? माया ही मायाच आहे. हे विश्व आहेही आणि नाहीही. समोर हा डोंगर आहे. पण मी डोळे उघडले तरच. मी उघड्या डोळयांनी पाहिला तर डोंगर, नाहीतर काही नाही. या मायावी विश्वात तू काय घेऊन आलायस नि काय घेऊन जाणारेस? महाराज म्हणतात,

मुठ्ठी बांधके आया है तू हाथ पसारे जायेगा
धनदौलत जागिरसे तूने क्या खोया क्या पायेगा.

दे. आपल्या दोन्ही हातांनी मनात किंतू न आणता दे. मग बघा महाराज तुमच्या साठी काय करू शकतात.

**हे विश्वचि अवघी माया जाऊ नका देऊ तुम्ही वाया**
**ही माया ती माया ते माया हे माया**
**सर्व जग हे मिथ्या माया, हे सागर तरूनी जाया**
**भवसागर तरूनी जाया बटुका धर रे छाया**

हे जगच मिथ्या आहे. उद्या देवाशरण जाताना काय नेणार? न पैसा न अडका. ना सोने ना नाणे. ना जमीन ना जुमला. ते सर्व इथेच सोडून जायचे. महाराज म्हणतात, मोह नको. त्याग करा, दान करा, देताना मनात महाराजांचा जप करा. एका हाताचे दान दुसऱ्यास कळू नये म्हणतात. महाराज तर म्हणतात एका बोटाचे दान दुसऱ्या बोटासही कळू देऊ नका. मग मागावी का दानाची पावती? मागावेत का हिशेब दानाचे? दानाचा हिशेब ठेवाल काय? पाप लागेल पाप. महाराज म्हणतात, बाकी कशास भिऊ नका, पण पापाला भ्या. बापाला भिऊ नका, पापाला भ्या.
आज जिकडे जाऊ तिथे ओळख लागते. ऑफिसात जा, काम व्हायचे तर ओळख हवी. कोर्टात जा, चपरासी तरी ओळखीचा हवा. हॉस्पिटलात जा, वॉर्डबॉय तरी ओळखीचा हवा. महाराजांची देवाशी डायरेक्ट ओळख आहे. तेच तुम्हाला पापापासून नि त्या पापाच्या शिक्षेपासून वाचवतील. त्यासाठी तुम्ही काय केले पाहिजे? महाराज तुम्हाला ओळखायला हवेत. त्यावाचून काही खरे नाही.
देवाने काय सांगितले? काम करा, मेहनत करा. नामाचे स्मरण करा. उद्या पंतप्रधानांना भेटायचे तर डायरेक्ट जाल का? नगरसेवक आमदाराशी, आमदार खासदाराशी, खासदार मंत्र्याशी ओळख करून देईल. मंत्री मग पंतप्रधानांशी भेट घडवेल. देवाचे तसेच आहे. डायरेक्ट नंबर लागणार नाही. महाराजांच्या कडून लवकर लागेल. वहा आपले सर्वकाही महाराजांच्या चरणी वहा. भक्तीणींनो मागे राहू नका.
शेवटी हात जोडून आरती म्हणूया,

**जय बटुक जय बटुक जय बटुक देवा**
**तुझ्या मुळे मिळे आम्हा छत्र आणि छाया**

**हे जग असे जसे मिथ्य आणि माया**
**तुज वाचून जगणे जणु जात असे वाया.**

**बटुकचरणी ठेवितो भक्ती भावे माथा**
**शरण दे दयाळू तू अरे बटुकनाथा**

**या जगती कसे बसे जगत मी आलो**
**माझ्या पापभये गांगरून गेलो.**

**यास्तव तु दे आम्हास आशीर्वच देवा**
**तुझ्या मुळे मिळे आम्हा छत्र आणि छाया**

**जय बटुक जय बटुक जय बटुक देवा**
**हाती माझ्या घडो देवा खूप सारी सेवा.**

बोला संत श्री समर्थ सद्गुरूदेव स्वामी बटुकनाथानंद बापू महाराज की जय. जय जय बटुकनाथानंद हरी.

## मी (मठाधिपती) कसा झालो?

## ( स्वामी अपूर्णानंदांचे मनोगत )

माझा जन्मच श्रीअखंडानंद स्वामींच्या कृपेने झाला असे आई म्हणायची. लहानपणापासूनच मला स्वामीजींच्या मठात गेल्याचे आठवते. जन्मल्या जन्मल्या मला आईने स्वामीजींच्या पायी अर्पण केले होते तेव्हा मी त्यांच्याच मठाचा पुढे प्रमुख होईन अशी शंकाही आईला आली नसेल. आई नि वडील दोघेही स्वामीजींचे निस्सीम भक्त. आई दररोज मला मठात घेऊन जायची आणि आपल्या धंदापाण्यातून वेळ मिळाला की वडील ही स्वामीजींच्या सेवेस यायचे. आई खूपच श्रद्धाळू होती आणि वडीलही तिला काही कमी याबाबतीत पडू देत नसत. दरवर्षी स्वामीजींना आई हिरेजडित मुकुट अर्पण करीत असे. वडिलांच्या मिळकतीतला मोठा हिस्सा स्वामीजींच्या चरणी वाहिला जाई. त्यामुळे स्वामीजींच्या मठात आमची मोठीच वट होती. देवाचिये दारी वट शब्द योग्य वाटत नसेल पण आमच्या सारख्या देवाच्या एजंटाकडे हा शब्द वापरायला हरकत नसावी.

मठात मला सगळीकडे संचार करायला परवानगी असे. बॅकस्टेजला मी खुशाल जात असे. नकळत्या वयातील आणि थोडे कळू लागल्यानंतरच्या वयातील माझ्या आठवणी आहेत. एकदा मी तिथे असताना एक माणूस तिथे स्वामींसारखीच चिलिम ओढत बसला होता. का कोणास ठाऊक मला तो बिन केस नि दाढीवाल्या स्वामीजींसारखा वाटला. पुढे मला मागची बाजू एखाद्या नाटकाच्या बॅकस्टेज सारखी वाटायला लागली. दाढ्या आणि केसांचे पाच सहा विग्स होते. एक मेकपची रूम होती आणि एक मेकपमॅन तिथे नेहमी दिसायचा. तेव्हा हे सर्व काय ते कळायचे नाही पण आता मी त्याच मेकपमॅन ला पर्मनंट जॉबला ठेऊन घेतले आहे. एकदा तिथे ठेवलेल्या घडाळयांना मी हात लावला तसा तो चिलिमवाला चिडल्यासारखा वाटला. त्याने हाक मारून कोणाला तरी बोलावले आणि मला बाहेर सोडायला सांगितले. तेव्हा त्याचा आवाज ही मला स्वामीजींसारखा वाटला होता.

लहान असताना मला स्वामीजींचे प्रचंड आकर्षण असे. त्यांचे मधून मधून हातातून अंगारा काढून देणे, बॅकस्टेजला पाहिलेली घडाळयाची मॉडेल्स हवेतून काढून देणे वगैरे प्रयोग बघायला खूप आवडायचे. असे काही झाले की लोक चीत्कारायचे, ’जय जय अखंडानंद स्वामी महाराज.’ एकदा स्वामी म्हणाले, ’हे जग सर्व माया आहे’ तेव्हा मी आईला विचारले होते, ‘आई ही माया कोण?‘ यावर आईने मला ’चूप बस रे, मन्या’ (

मनोज हे माझे खरे नाव खूपच कमी लोकांना ठाऊक आहे ) म्हणून गप्प बसवले होते. वर्षातून एकदा स्वामीजींचा उत्सव असे. तेव्हा भक्त गण मोठा सोहोळा करीत, देणग्या देत आणि नवस फेडीत. स्वामीजी छोटे छोटे दगड प्रसाद म्हणून वाटत. त्यांच्या एका शिष्याने हा दगड सिंहासनावर ठेऊन ‘स्वामी दगडानंद‘ नावाने स्वामीजींची एक ब्रांच दूर गावात सुरू केली होती हे मला अलिकडेच कळले.

मी बारावीत असताना वडील गेले. त्यांच्या आजारपणात स्वामीजींच्या अंगाऱ्याचा गुण काही आला नाही. आपली भक्ती आणि श्रद्धाच कमी पडली असे आईला वाटे. वडिलांनी मोठ्या हिकमतीने सर्व साम्राज्य उभारले होते. त्यांच्या कोण्या दूरच्या काकांच्या मृत्यूनंतर त्या काकांची इस्टेट त्यांच्या सख्ख्या मुलांकडे न जाता आपल्या नावावर करवून घ्यायची हिम्मत त्यांनी दाखवली होती. आपल्यावर स्वामीजींची कृपा आहे असे ते म्हणत आणि जमेल तेव्हा मठात जाऊन त्यांची सेवा करत. त्यांच्यानंतर वर्षभरात आई गेली. ती नाही म्हणत असताना तिचा उपचार मी हॉस्पिटलातच केला, सहा महिने तिने काढले पण शेवटी ती देवाघरी गेली. मी स्वत: स्वामीजी होणार हे खूप लहानपणीच मी ठरवले होते पण आईला तसे कधी म्हणालो नव्हतो. तिला त्याबद्दल काय वाटले असते कोणास ठाऊक. झाले असे की एकदा मी बॅकस्टेजला नेहमीप्रमाणे बागडत होतो. तिथे एक नेहमी बंद असणारी खोली होती. एके दिवशी चुकून उघडी होती. मी तिथे पोहोचलो तर तिथे सर्व सोन्याचांदीचे दागिने होते. एवढी संपत्ती किती मोलाची असेल याचा मला विचारच करता येत नव्हता. माझे वडील स्वामीजींना मोठमोठ्या भेटी देत. पण ते एकटेच काही तसे नव्हते. आपापल्या कुवतीनुसार देणारे इतरही असंख्य होतेच. घेणारे फक्त एकुलते स्वामीजी. त्यामुळे मला स्वामीजींचे प्रचंड अप्रूप वाटे. आज ’करियरच्या अनोळखी वाटा’ नि ’क करियरचा’ वगैरे लिहून येते तिथेही या करियर विषयी कधी लिहून आलेले नाही. पण मला तरी माझ्या करीयर साठी हा बेस्ट ऑप्शन तेव्हा वाटला.

पुढे अखंडानंद स्वामी आजारी पडले तेव्हा मी कॉलेज सोडले नि त्यांच्या जवळच्या वर्तुळात प्रवेश केला. आणि पूर्णवेळ मठाच्या कार्यात झोकून दिले. कॉलेज सोडून दिले कारण प्रश्न शेवटी करियरचा होता.

स्वामीजींनी मला खूप काही शिकवले. चोवीस तास मी त्यांच्या मागे सावली सारखा राहू लागलो. त्यांचे पट्टशिष्य चरणानंद आणि शिरानंद होते त्यांच्याशी मी अति नम्रतेने वागत होतो त्यामुळे त्यांची देखील आडकाठी मला झाली नाही. हळूहळू स्वामीजींकडून मी सर्व ट्रीक्स शिकून घेतल्या. लोकांना मार्गदर्शन कसे करावे नि प्रवचने कशी द्यावीत

हेही शिकलो. मधून मधून मी पण प्रवचने देऊ लागलो. स्वामीजींची तब्येत जशी बिघडत चालली तसा मी नकळत कारभार हाती घेऊ लागलो.
स्वामीजींशी माझा नेहमीच संवाद होत असे त्यातून ही मी कितीतरी गोष्टी शिकलो ज्या मठाच्या सुरळीत चालण्यास आवश्यक असतात. मुख्य म्हणजे देवाचे नाव तोंडात असले की आपण काहीही करायला मोकळे. त्यात परत बाकीच्यांना तोच उपदेश केला की आपली बाजू वरचढ होते. भक्त जे कोणी येतील त्यांना आपल्यावर अतीव विश्वास टाकायला सांगायचे, त्यांच्या विश्वासावरच त्यांना मिळणारे फळ अवलंबून आहे हे त्यांना एकदा पटवून टाकले की आपली जबाबदारी फक्त देणगी गोळा करायची. भक्तांना नेहमी आपल्या नामस्मरणात गुंग ठेवावे म्हणजे जास्त बोलायला वेळ मिळत नाही. एकदा ते भर दरबारातच आपल्या भक्तांवर कडाडले होते कारण त्याने उलटा प्रश्न त्यांना केला होता. त्यावेळीस इतर भक्तगणांनीच त्या प्रश्न विचारणाऱ्यास बाहेर काढले होते. मी धीर करून एकदा त्यांना त्यांच्या खोट्या दाढी नि केसांबद्दल विचारले तेव्हा त्यांनी मोठ्या मोकळया मनाने सांगितले की, 'अपूर्णानंदा, ( तो पर्यंत मी अपूर्णानंद हे नाव धारण केले होते ) आपले काम महत्त्वाचे हे खरे पण आपले खाजगी आयुष्य ही तितकेच महत्त्वाचे. आज मी असाच बाहेर पडलो की मला कोणी ओळखत नाही आणि या स्वामींच्या वेषात माझी बायको पण मला ओळखत नाही.' 'बायको?' मी अगदी आश्चर्याने ओरडायचाच बाकी होतो. त्यावर ते म्हणाले देखील, 'जगाच्या कल्याणा आपण आहोत हे खरे पण स्वत:चे कल्याण पण आपल्याला स्वत:च करावे लागते.' याहून पुढे काही मी विचारणार त्या आधी त्यांनी विषयच बदलला. पुढे त्यांची बायको वारल्याचे कळले आणि त्यांना कोणी मूलबाळ नाही हे कळल्यावर मी सुटकेचा निश्वास टाकला. बाकी त्यांच्या मेकपचा फायदा आज जागोजागी मला जाणवतो. अगदी काही दिवसांपूर्वी रात्री 'चांदनी बार' मध्ये गेलो तेव्हा बाहेर पहाऱ्यावरील आणि आतील गिऱ्हाईक म्हणून आलेले पोलिस अधिकारीही मला ओळखू शकले नाहीत, आणि ते सर्व माझ्या नजीकच्या भक्तगणांतील असूनसुद्धा !
स्वामींना मी एकदा त्यांच्या अलोट लोकप्रियतेचे रहस्य मी विचारले. स्वामीजी म्हणाले, 'सब माया है! लोकांना चुका केलेले चालते, कधी चुका करायलाही आवडते, अगदी जाणूनबुजून चुकीचे वागले तरी चालते फक्त त्या गोष्टींची जबाबदारी दुसऱ्या कोणी घ्यावी असे वाटते. नाहीतर आम्ही आहोतच त्यांच्या मनातील गिल्ट कमी करायला.' स्वामीजींनी गिल्ट शब्द वापरला तसा मी दचकलो. स्वामीजी म्हणाले, 'अरे, मी काही अशिक्षित वाटलो की काय? चांगला ग्रॅज्युएट आहे पण नोकरी मिळेना मग या मार्गास लागलो.' मला खरंच धीर आला. मी पण याच करीयरच्या वाटे निघालो होतो

ना. त्यामुळे हलवून खुंटा बळकट करावा तशा या क्षेत्रातल्या माझ्या करियरचा विचार अधिकच पक्का झाला. फरक फक्त इतकाच की स्वामीजी ग्रॅज्युएट होते आणि मला स्वामीजींच्याच आजारपणामुळे शिक्षण सोडावे लागले होते.माझी स्वामीजींशी नेहमीच चर्चा चाले. हातात मद्याचा पेला आला कि ते खुलून बोलत. तेव्हा एकदा मी त्यांना विचारले होते, 'नशिबावर आपण किती अवलंबून राहावे?' तर ते म्हणाले, 'अपूर्णानंद, ही सर्व माया आहे. आपण मानू ते नशिब. म्हणजे एखाद्यास उद्या ॲम्ब्युलन्स खाली अपघात झाला, त्याला त्याच ॲम्ब्युलन्सने हॉस्पिटलात पोहोचवले जाते आणि त्याचा प्राण वाचतो. आता अपघात झाला हे कमनशिब की व्हायचाच होता तर कमीतकमी ॲम्ब्युलन्स खाली तरी झाला हे सुदैव हे ज्याने त्याने ठरवावे.' मला त्यांचे म्हणणे पटले.

स्वामीजींकडून मठाचा ताबा घ्यायला मला सवड भरपूर होती. वडिलांनी कायदेशीर लढाईने साम्राज्य उभे केले होते, मला तर फक्त स्वामीजींच्या रेडीमेड भक्तांकडूनच मान्यता मिळवायची होती. स्वामीजींचा आजार बळावत चालला तसा मी माझा पवित्रा बदलत राहिलो. मध्ये मध्ये मी चरणानंद-शिरानंदांचा भार कमी करायच्या नावाखाली स्वतंत्र दरबार भरवू लागलो. अखंडानंद स्वामींच्या डोळयात येणार नाही अशा बेताने भक्तांना आपल्याकडे वळवू लागलो. त्यांच्या हयातीतच मठ ताब्यात येणे, ते ही त्यांच्याच हातून हे गरजेचे होते. पण त्यासाठी सर्व भक्तांत माझा उदो उदो होणे गरजेचे होते, म्हणजे स्वामीजींना दुसरा पर्यायच राहिला नसता.
मनात तीव्र विचार आला की स्वामीजीच रस्ता दाखवतात असे सर्व म्हणतात. तसा रस्ता लवकरच मला दिसला. चांदनी बारच्याच बाहेर मंगेश देसाई नावाचा माझा शाळेतील मित्र मला भेटला. तो चक्क आंधळयाच्या भूमिकेतून भीक मागत होता. या व्यवसायात त्याचा चांगलाच जम बसला होता असे त्याने सांगितले. मला यात संधी दिसली. त्याच्याशी मी बोललो तसा तो तयार झाला. लगेच मी त्याला आमच्या दरबारात आंधळयाच्या रूपात बोलावले. सर्व भक्तांसमोर मग मी काही तरी मंत्र पुटपुटून त्याच्या डोळयांवरून हात फिरवला तसे त्याला नीट दिसायला लागले. तो पहिलाच दिवस होता जेव्हा भक्तांनी स्वामी अपूर्णानंदांचा जयजयकार केला. रूप बदलून मंगेश दुसऱ्या दिवशी परत आला आणि तोच चमत्कार दुसऱ्या दिवशी देखील झाला. मंगेशने मग अजून एक आयडिया दिली त्याप्रमाणे तो या लाईनीतील अजून दहा कलाकार मित्र आणणार होता. त्या साठी एक जंगी दृष्टीदान शिबीराची घोषणा झाली. मंगेश सर्वात प्रथम डोळस म्हणून आला आणि आपला 'अनुभव' सर्वांना सांगून गेला. प्रचंड गर्दी जमली होती. त्यात मंगेशचे दहा मित्र मिसळून होते. ठराविक अंतराने त्यांना दृष्टी येणार होती. बाकीच्यांचे काय? मी सर्व भक्तांना प्रथम सांगितले, 'स्वामीजींवरील

अतूट विश्वास हाच तुम्हाला तारेल. ज्यांचा विश्वास अढळ त्याला दृष्टी आल्याशिवाय राहायची नाही. ज्यांना आज येणार नाही त्यांना काही काळ वाट पाहावी लागेल पण स्वामीजींची कृपादृष्टी त्यंच्यावर झाल्या शिवाय राहायची नाही. फक्त विश्वास नि श्रद्धा अतूट हवी.' यानंतर जे झाले ते मठात अभूतपूर्व होते. भक्त आधी माझा आणि नंतर अखंडानंदांचा जयजयकार करत होते आणि आतल्या खोलीत चरण आणि शिर आनंद आनंदाने स्वामीजींचे पाय आणि डोके चेपीत बसले होते. नंतर अशीच अजून दोन दृष्टीदानाची शिबिरे झाली. मंगेश एके दिवशी म्हणाला की त्याच्यातील कलाकार त्याला स्वस्थ बसू देत नाही म्हणून कधी लंगड्याच्या कधी मूक बहिऱ्याच्या तर कधी थोट्याच्या भूमिका तो करील. बाकी चमत्कार करायला मी समर्थ होतोच. स्वामीजींची प्रकृती नाजूक झाली होती. त्यांच्या पर्यंत हे सर्व पोहोचेल अशी मी व्यवस्था केलीच होती. शेवटी चरणानंद आणि शिरानंदांसमोर स्वामीजींनी मला मठाधिपती म्हणून घोषित करून टाकले. ते दोघे काहीच करू शकणार नव्हते कारण आपल्या लोकशाहीत जनमतापुढे त्यांना शरणागती पत्करावीच लागली असती. यथावकाश स्वामीजी गेले. आणि मी मठाचा सर्वेसर्वा झालो. माझ्या वडिलांनी वाटलेली संपत्ती परत माझ्याच कबजात अगदी व्या्जासकट आली. चरणानंद आणि शिरानंदांची भूमिका तीच चरण आणि शिर दाबायची राहिली, फक्त ते चरण आणि शिर बदलून अखंडानंदस्वामी ऐवजी अपूर्णानंद स्वामींचे होते.

कोणी अजून सांगितले नसेल पण मंदिर काढणे, स्वामी बनणे आपल्या देशातील बेस्ट करियर आहे. भांडवल फक्त सुरूवातीस लोकांचा विश्वास संपादणे एवढेच लागते. नंतर तोच विश्वास लोकांना आपल्यावर टाकायला लावला की आपले काम संपले. माझा एक मित्र होता. माझ्याहून तीन वर्षांनी मोठा पण तरीही दहावीत माझ्याबरोबरच होता. शाळा सुटली आणि ह्याने एके दिवशी शेंदूर लावलेला मोठा दगड मोक्याची जागा बघून एका पिंपळाच्या झाडाखाली रातोरात टाकला. सकाळी गर्दीच्या वेळी हा तिथे साग्रसंगीत पूजा करायला बसला. लोकांची गर्दी झाली. स्वयंभू हनुमानाची स्थापना झाली. हा बनला पुजारी. लहानशा हनुमाना समोर मोठी दानपेटी ठेवली. हळू हळू विस्तार झाला, देऊळ झाले. आजूबाजूची अनधिकृत बांधकामे पाडली तरी लोकक्षोभाच्या भीतीने मंदिर तसेच राहिले. उलट आजूबाजूच्या रिकाम्या केलेल्या जागेत अजून पसरले. आज, म्हणजे आतापर्यंत माझ्या मित्राची तीनेकशे फुटाची फुकटात मिळवलेली जागा आहे, आणि तो समाजाला देवभक्तीचा मार्ग दाखवतो आहे. ह्या मार्गात विश्वास आणि श्रद्धेच्या बळावर सर्व काही चालते. डॉक्टर नि वकिलाला त्यांच्या त्यांच्या अशिलांना उत्तरे द्यावी लागता तर इथे सर्व प्रश्नांची आम्हीच तर उत्तरे आहोत.

लोकांना वाटेल की या लाईनीत फसवणूक आहे. पण तसे नाही. लोकांची ही अध्यात्मिक भूक आहे,कोणीतरी ती भागवायलाच हवी. त्यांना चार समजुतीच्या म्हणजे कॉमन सेन्स च्या गोष्टी सांगणारा कोणीतरी लागतो. ही समाजाची सांस्कृतिक गरज आहे ती आम्ही भागवतो. यात लोकांचे आणि आमचे दोघांचे कल्याणच आहे. खऱ्या देवाला फक्त खराखुरा भाव लागतो पण आम्ही देवाचे एजंट, कमिशन एजंट म्हणत नाहीत इतकेच, आम्हाला आमचा भाव घ्यावाच लागणार ना?

कोणी म्हणेल मी स्वत:च हे सर्व सांगतोय तर त्याचा भक्तांवर काय परिणाम होईल? पण खरी गोष्ट इतकीच आहे की ज्यांचा स्वामी अपूर्णानंदां वर पूर्ण विश्वास आहे त्यांचा ह्यावर विश्वास बसणार नाही आणि ज्यांचा माझ्यावर विश्वास नाही त्यांचा मात्र इथे माझ्यावर विश्वास बसेल !

## ही तो महाराजांची इच्छा

बोलो हरी हरी बोलो बोलो बोलो हरिराम
ही तो महाराजांची इच्छा

असा जप करीत साळवी आत शिरला. प्रवचनाला अजून पंधरा मिनिटे बाकी होती पण हॉल रिकामाच. एकदम शॉक लागल्यासारखा अबाउटटर्न करत तो हॉल बाहेर आला.रिकाम्या हॉल मध्ये प्रवचनाला मागे बसलो तर महाराजांची भक्ती पातळ वाट्ली असती त्यापेक्षा हॉल भरल्यावर पाठी बसावे म्हणून बाहेर येऊन मोबाईल कानाला लावून उभा राहिला. पुढे बसलं तर पाठची प्रेक्षणीय स्थळं मुद्दाम बघायला जमत नाहीत. ही गोष्ट जुनी म्हणजे कॉल नुसता रिसिव्ह करायला १६-१७ रुपये पडायचे तेव्हाची. साळवी नुसताच बंद मोबाईल कानावर पकडून इंप्रेशन मारत असे. आज ठकी येईल का असा एकच विचार त्याच्या मनात होता.थोड्याच वेळात फर्नांडिस हॉल मध्ये शिरला. मागोमाग ३ कुलकर्णी,२ जोशी,५ पटेल,आणि १ दोशी आले. हळूहळू हॉल खूपच भरला आणि साळवी पाठच्या खुर्चीवर जाऊन बसला. त्याने मोबाईल खिशात जपून ठेऊन दिला. हातापायाची ॲक्शन काही असो प्रत्येक जण तोंडानी 'बोलो हरि बोलो हरि बोलो बोलो बोलो हरिराम ही तो महाराजांची इच्छा' असा जप जपत होता. साळवीच्या डोक्यात ठकीचे विचार होते. ठकी हे खरे तिचे नाव नव्हते, पण महाराजांच्या लेटेस्ट भक्तांपैकी ती एक होती.केतकी माने आणि रवी राणे किंवा मानसी आणि फ्रेड्रिक अशा जोड्या इथेच जमल्या तशी ठकीशी जोडी जमण्याची साळवीला आशा वाटत होती.त्यातूनच त्याला हा अध्यात्मिक उमाळा येऊ लागला होता. ठकीच्या विचारांत त्याचा जप 'बोल ठकी बोल ठकी' असा कधी व्हायला लागला ते त्यालाही कळले नाही.

इकडे cctv मध्ये पाहात महाराज नेहेमीप्रमाणे वाट पाहात होते. हॉल भरत आला तरी अजून फ्रेडीचा पत्ता नव्हता. त्यांना इतक्यात फातर्फेकर आजी येताना दिसल्या. महाराजांच्या एकदम जुन्या भक्तांपैकी त्या एक. खरंतर त्या वयाचे महाराजांना वावडे. पण बाई गडगंज श्रीमंत. महाराजांच्या आर्थिक इच्छा त्यांच्याकडून अपूर्ण राहूच शकत नसत. आजी घाईघाईत आत शिरल्या नि हॉलमधल्या फाटक्या जाजमात पाय अडकून

पडल्या. हॉलमधल्या सर्वांनी डोळे मिटून घेत आपल्या जपाचा व्हॉल्यूम वाढवला. जणू त्यांनी काहीच पाहिले नसावे. आजी कशाबशा उठून खुर्चीवर बसल्या. सर्वांनी एका डोळयानी ते पाहिले नि मग डोळे उघडून बसायला सर्व जण मोकळे झाले. हिच्याऐवजी फ्रेडी पडली असती तर असे महाराजांसकट सर्वांना वाटले. तितक्यात फ्रेडी खरोखरची आलीच. सर्वांनी तिला एकदम सावध केले, 'मॅडम सांभाळून,पडाल.' मनातल्या मनात सर्वांनी इतरांना शिव्या घातल्या तिला सावध केल्याबद्दल. फातर्फेकर आजी मनातल्या मनात खदखदल्या,मेल्यांनी मला पडताना पाहिले होते तर. साळवीचे कुठेच लक्ष नव्हते. त्याचा ठकीनामाचा जप चालूच होता त्यात खरी ठकी कधी येऊन बसली त्याला कळलेच नाही. त्याची तंद्री भंग पावली तर समोर ठकी. ही ठकी खरी की 'लगे रहो मुन्नाभाई'तल्यासारखी आभासी ते त्याला कळेना. हात लाऊन बघायचे तर इंप्रेशन खराब व्हायचे. पण थोड्या वेळाने तिला जप म्हणताना पाहिले नि त्याची खात्री पटली ती खरोखरची ठकी होती. आता साळवी परत trance मध्ये !

मेकप नंतर महाराज अवतरले. महाराजांचे सारे काही भव्य दिव्य. सिंहाच्या आयाळीसारखे केस आणि चेहेरा पूर्ण लपेलशा दाढीमिशा. महाराज तेज:पुंज दिसतात असे त्यांच्या भक्तांना वाटायचे. जिथे जिथे शक्य तिथून उगवलेल्या केसांच्या जंजाळातून त्यांचे तेज कोणाला कसे दिसायचे कोणास ठाऊक. आज त्यांना तिसरा डोळा उघडून भक्तांना धक्का द्यायचा होता. नाटकातला स्पेशल इफेक्टवाला मुद्दाम येऊन त्यांच्या कपाळावर तिसरा डोळा बसवून गेला होता. महाराजांचे धक्कातंत्र असेच होते. आधीआधी महाराज 'हरि बोलो' असा जप लिहिलेल्या वह्यांची विक्री करायचे. महाराजांबद्दलच्या भक्तिभावाने जप लिहिणारे तर होतेच पण त्यात ही (गुरुसारखी) लुच्चेगिरी करणारे होते. काय तरी एकेक नमुने. कुणी फक्त पहिल्या ओळीत हरि बोलो लिहून खाली _,,_ ची खूण करायचे, कुणी पावतीपुस्तक भरल्यासारखे तीन कार्बन पेपर खाली ठेऊन पुस्तक भरत. एकाने तर आपल्या हस्ताक्षरात 'हरि बोलो'चा स्टॅंप बनवून तोच एकाखाली एक मारला होता. एका जणाने 'ह.बो.' अशा शॉट्फॉर्मने वही भरली होती. महाराज सर्व बघून दुर्लक्ष करायचे. एके दिवशी सुरेश शहा नावाच्या भक्ताने आपल्या मुलाच्या उरलेल्या वह्यांच्या कोऱ्यापानांची वही बनवून त्यात 'हरि बोलो' चा

जप लिहिला होता. ती वही महाराजांच्या चरणी अर्पण केली तसा महाराजांच्या चाणाक्ष नजरेने पुढचा धोका ओळखला. जपाच्या वह्यांची विक्री तडाखेबंद होती. तीच बंद झाली तर काय व्हायचे. महाराज ताडताड पावले टाकत उठून गेले. इकडे भक्त गणांत एकच गोंधळ उडाला. शेवटी सुरेश शहाच्या वहीची गोष्ट बाहेर पडली. बाकी लोकांनी त्या शहाकडे एखाद्या गुन्हेगारासारखे पाहिले.

त्यानंतर एके दिवशी invisible ink ने लिहिलेला एक कागद circulate झाला.कुणीच काही बोलेना. महाराज पापी लोकांना मंत्र दिसेल म्हणतात की पुण्यवान लोकांना यावर सर्व भक्तांनी आपले म्हणणे अवलंबून ठेवले होते. तेव्हढ्यात महाराजांजवळचे शिष्य म्हणाले हा कागद कोरा आहे आणि सर्व भक्तांनी नि:श्वास सोडला. नंतर महाराजांनी काहीतरी जादू केली आणि त्या कागदावर आताचा 'बोलो हरि बोलोहरि...' चा मंत्र उमटला. नंतर ह्या मंत्राची पुस्तके प्रसाद म्हणून मिळायला लागली. ज्याची दक्षिणा ५०० रुपयांहून जास्त त्यांनाच फक्त हा प्रसाद मिळायचा.त्यातही त्यामुळे जास्तीत जास्त दक्षिणा द्यायची स्पर्धा व्हायला लागली नि मग महाराज खूश.

आजचे प्रवचन खास होते.म्हणजे महाराज काही बोलणार नव्हते. खरे कारण कालचा हॅंगओव्हर. शिष्यगणांनी सुरुवात केली

वंदन करतो तुज गुरुराया
पडतो आम्ही तुमच्या पाया
गुरूमाऊली तुम्ही
अत्तरा चा फाया
तुम्हावाचूनी जीवन वाया

मग प्रचंड आवाजात जप झाला. ही तो महाराजांची इच्छा म्हणून झाले. शिष्यांनी जाहीर केले आज महाराज अस्वस्थ आहेत.ते आज बोलणार नाहीत.त्यांच्या तिसऱ्या डोळयानी त्यांनी जे पहिले त्यामुळे ते फारच अस्वस्थ आहेत. हॉलमध्ये खळबळ माजली. नंतर फर्नांडिस उभा राहिला. 'आत्मा आणि परमात्मा यांचा पारलौकिक संबंध' या विषयावर त्यांचे 'स्पीच' होते. त्याचे भारी शब्द सगळयांच्या डोक्यावरून गेल्याने

सगळेच इंप्रेस झाले. साळवीचे ठकी निरिक्षण चालू होते. मध्येच ठकी वळून त्याच्याकडे पाहाते आहे असे त्याला वाटले आणि त्याचे लक्ष उडू लागले.

ठकी ग ठकी
राहू नको मुकी
तुझ्यावाचून जिंदगी
होईल ओकीबोकी

असे शीघ्र कवित्व त्याने दाखवले.

थोड्यावेळाने हॉलमधील दिवे गेले.समोरच्या भिंतीवर लाल उजेड पडला. सर्वांनी पाहिले, हाच तो तिसरा डोळा! मेकपमनने कपाळावर बसवलेल्या दिव्याचे बटण महाराजांच्या हातात होते. काही काळ स्तब्धतेत गेला. आकाशवाणी व्हावी तसा आवाज आला.एक शिष्य बोलत होता. त्याच्या डोळयात पाणी. 'आज महाराज मौन व्रतात का गेले? महाराजांच्या आवाजातले प्रवचनामृत आज आम्हाला का मिळणार नाही? महाराजांनी तिसऱ्या डोळयानी जे पाहिले, धि:कार असो. या भक्तांची भक्ती एव्हढी कमजोर व्हावी? एक भक्त लवकर यावा त्याला बाहेर मोबाईलवर बोलायची इच्छा व्हावी जप सोडून.' आपला उल्लेख ऐकून साळवी चमकला. पण त्याचे नाव कोणीच घेतले नव्हते त्यामुळे तो मी नव्हेच असा निर्विकार चेहेरा करून तो बसला.नशिब ठकी पुढे त्याचे नाव घेतले नव्हते. शिष्य पुढे चालू. 'त्या आजी पडल्या. का पडल्या? कोणी भक्त आला पुढे ते फाटके कारपेट बदलायला?' पुढे अजून त्याची बडबड चालू राहिली. नंतर प्रवचन चालू राहिले. मोठ्या आवाजात जप झाला. साळवीला डुलकी कधी लागली कळलेच नाही.

तो जागा झाला तेव्हा सर्व हॉल रिकामा होता हॉल मध्ये फक्त ठकी आणि तो. ठकी त्याला उठवत हॊती, 'अरे अविनाश उठ.' साळवीने डोळे उघडले तर समोर ठकी. अरे हिला माझे नाव कसे कळले?

ती त्याची दूरची बहीण होती. मग त्याने तिला तिच्या घरापर्यंत सोडले.

परत येताना तो स्वत:शीच म्हणाला  ’ही तो महाराजांची इच्छा!‘

३

**समाजधुरीणांमागे उभी नाही राहिली तर ती वर्तमानपत्रे कसली? त्यांचे वाढदिवस, जंयत्या नि मयंत्यांची नोंद..विविध वृत्तपत्रांतून आलेली ही ओळख. एक नामदार संपतराव सुरनळेंची मुलाखत, दुसरा सुदामराव शिर्के यांच्या वाढदिवसानिमित्त खास लेख आणि शेवटी मालिनीताई समर्थांच्या मृत्यूनंतरचा मृत्युलेख !**

- **नामदार श्री. संपतराव सुरनळे यांची मुलाखत**
- **सुदामराव शिर्के : आपले भावी मुख्यमंत्री**
- **मालिनीताई समर्थ : बंद हृदयसम्राज्ञीला श्रद्धांजली**

## नामदार श्री. संपतराव सुरनळे यांची मुलाखत

श्री.संपतराव सुरनळे हे राजकारणातील एक रोखठोक व्यक्तिमत्त्व. ते अभ्यासू व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जातात. आजकालच्या राजकारणात अशी तत्त्वचिंतक माणसे दिसणे दुर्मिळ. त्यांचा राज्याच्या प्रश्नांचा गाढा अभ्यास आहे. दरेक प्रश्न सोडवण्यासाठी ते जागतिक किंवा आजकालच्या भाषेत सांगायचे तर ग्लोबल भूमिका घेतात. त्यामुळे आपल्या येथील गटारी आणि स्वित्झर्लंडमधील गटारी यांचा तौलनिक अभ्यास ते करतात. त्यासाठी त्या देशात काही महिने काढावे लागले तरी त्यासाठी त्यांची तयारी असते. आता वरील गोष्टच पाहू. मला नाही वाटत कोणी स्वित्झर्लंड सारख्या देशास गटारी पाहण्यासाठी भेट दिली असेल. पण संपतराव तसे करतात. या कामात त्यांच्या पत्नी सुगंधाताई त्यांना सदैव साथ देत असतात. त्या सदा त्यांच्या पाठीशी असतात. मग भले ही ह्या खर्चाचा भार तिजोरीवर पडो आणि विरोधक त्यासाठी त्यांना भलेही धारेवर धरोत. ते अशा टीकेस पुरून उरतात. संपतराव दिलखुलास आहेत. आपल्या विद्वत्तेचा बडेजाव मात्र ते दाखवत नाहीत. त्यांच्याशी गप्पा मारणे ही कोणाही अभ्यासू पत्रकारास आवडते. त्यांच्या घरीच घेतलेल्या मुलाखतीचा हा काही अंश :

*राज्यात नुकताच व्यापाऱ्यांचा संप झाला. त्यांची मागणी होती की कर भरावा लागू नये. आपले काय म्हणणे आहे?*

व्यापाऱ्यांशी माझे बोलणे झाले आहे. त्यांचा कर भरण्यापेक्षा हिशेब ठेवण्यावर जास्त आक्षेप आहे. त्यासाठी सीएंच्या पाया पडणे आणि सर्व हिशेब मांडून ठेवणे कठीण आहे. आणि खर्चिक सुद्धा.

*मग यावर उपाय?*

उपाय सोपा आहे. आता लावलेल्या करावर दोन टक्के हिशेब टॅक्स लावायचा. दर बिला मागे असा टॅक्स ग्राहक भरेल, तर व्यापाऱ्यांचा करास विरोध करायला कारणच राहणार नाही.

*पण याने महागाई वाढेल?*

जास्त नाही. आणि विचार करा, व्यापाऱ्यास हिशेब का ठेवावा लागतोय? तर ग्राहक त्याच्याकडून वस्तू विकत घेतात म्हणून. तर ग्राहकाने त्याबद्दल थोडा खिसा खाली केला तर काय बिघडले. अशा सुधारणांची नितांत गरज आहे. आणि व्यापार हा राज्याचा कणा आहे. तो चालवणारा व्यापारी मोडून पडला तर चालेल काय आपणाला? आणि परवडेल का याचा विचार व्हायला हवा.

*राज्यात ग्राहक हा राजा असे धोरण सरकारनेच आखले आहे?*

अगदी खरे आहे ते. ग्राहक राजा आहेच. पण कोणी विकणारा आहे म्हणून तो ग्राहक बनतो. उद्या विक्रीसच काही नसेल तर ग्राहक तरी उरेल का? आणि राजा म्हटले तर त्यास आपल्या प्रजेची म्हणजे व्यापारी वर्गाची काळजी घ्यावीच लागेल की नाही?

*म्हणजे हा प्रश्न सुटण्याच्या मार्गावर आहे?*

जवळ जवळ. मी सीएम ना माझी योजना सादर केली आहे. लवकरच याबद्दल समिती बसेल.

*पाणी प्रश्नावर तुमचा अभ्यास चालू आहे. तिसरे महायुद्ध ज्यावर होऊ शकते ते टाळण्यासाठी तुमचा हा अभ्यास सुरू आहे त्या बद्दल सांगा जरा.*

पाणी प्रश्न महत्त्वाचा आहेच. मी त्याचा जागतिक पातळीवर विचार करतो. पण पृथ्वीच्या एक तृतीयांश भागावरीलच हा प्रश्न आहे. बाकी दोन तृतीयांश भागात पाणीच पाणी चहूकडे अशी स्थिती आहे. त्यामुळे तिथे पाणी समस्या नाही. माणसाची पाण्याची तहान वाढतेय. आधी एक लीटर पाणी पिणारा प्रत्येक जण दीड लीटर पाणी दिवसागणिक पीत आहे. पण ग्लोबल वॉर्मिंग मुळे पाण्याची पातळी वाढणार आहे आणि पाण्याची कमतरता काही प्रमाणात तरी भरून येणार आहे. वसुंधरा परिषदेत मी हा विचार मांडला तेव्हा लोकांना हसू आले पण आज ना उद्या ते त्यांना पटेलच याची मला खात्री आहे.

*पण त्यामुळे काही भूप्रदेश पाण्याखाली जाईल.*

दोन बाबी आहेत. एक काही मिळवण्यासाठी काही द्यावेच लागते. पाणी हवे तर काही भूभाग घालवावा लागेल. आणि हे काही समुद्राचे पाणी नाही. ग्लेशियरचे पाणी गोडे असल्याने ते पिण्यासाठी वापरता येईल. संकटात ही संधी शोधणे गरजेचे आहे.

*म्हणजे ग्लोबल वॉर्मिंग ही समस्याच नाही?*

असे नाही. पण वाटते तशी नाही. आपल्या कडे लोकांची क्रयशक्ती वाढते आहे. आपापल्या परीने लोक आपल्या आपल्या घरात एसी लावून आपल्यापुरती यावर मात करीत आहेत. आम्ही पण प्रत्येक ऑफिस एयरकंडीशंड करत आहोत. थेंबे थेंबे तळे साचे या न्यायाने हळू हळू जागतिक तापमान कमी होईलच याची मला खात्री आहे.

*पण विकासाच्या बाबतीत पर्यावरण खाते ग्लोबल वॉर्मिंगची भीती दाखवत असते.*

प्रत्येक प्रश्नास उत्तर मिळते पण ते शोधावे लागते. झापडबंद विचार कामाचा नाही. पाय दुखतात म्हणून पाय दाबतात म्हणून मग गळा दुखला म्हणून कोणी गळा दाबत नाहीत. ग्लोबल वॉर्मिंगची भीती बागुलबुवाची भीती आहे. एका ठिकाणची झाडे तोडून दुसरी कडे लावा. शहरात लोकांना राहायला जागा नाही. तिथे हे झाडे न तोडण्याचे खूळ कशाला? कित्येक डोंगर उजाड आहेत त्यावर जाऊन झाडे लावा हवी तेवढी. पण मेहनत नको. मग शहरी भागातून झाडे तोडू नका याची ओरड होते. उद्या माणसास राहायला जागाच नसेल तर काय पर्यावरण जतनाच्या नावाखाली त्याने आदिमानवासारखे गुहेत जाऊन राहावे? व्हर्टीकल डेव्हलेपमेंट व्हायलाच हवी. माणुसकीचा दृष्टीकोन ठेवणे तितकेच गरजेचे आहे.

*म्हणजे माणुसकी, नैतिकता महत्त्वाची असे तुमचे म्हणणे आहे का?*

होय, ती महत्त्वाची आहेच पण त्या पलिकडेही काही आहे. नैतिकतेचे काहीसे न्यायासारखे आहे. न्याय नुसता देऊन चालत नाही पण तो झाल्यासारखेही वाटले पाहिजे. तशी नैतिकता ही दिसली पाहिजे. एखाद्या गोष्टीस अनैतिक समजणे ही काहीसे आपल्या चष्म्यावर अवलंबून असते. कोणाचा अंत करणे अनैतिक पण शत्रूचा अंत घडवणे म्हणजे शौर्य. एखाद्याच्या पाठीत खंजीर खुपसणे अनैतिक नसेल पण तो खुपसला हे त्याच्या नकळत होणे गरजेचे. त्यास जर त्याच्या वेदना जाणवल्या तर ती कृती नक्कीच अनैतिक म्हणता येईल.

*म्हणजे अधिकृत भूमिका तुम्ही नैतिक अनैतिकतेवर ठरवा असे सांगत आहात.*

चांगला विषय काढलात. मला वाटते की अनधिकृत वा अधिकृत असे काही नसतेच. एखादी इमारत अनधिकृत आहे म्हणजे काय? कोण महापालिकेची चार डोकी म्हणतात

म्हणून ती अनधिकृत? ती बांधायला पण तितकीच मेहनत लागते. जमीन ही आपली सर्वांचीच आहे. अधिकृत नि अनधिकृत दोन्ही इमारती जमिनीवरच उभ्या राहतात, दोघांना सिमेंट, विटा नि रेतीच लागते. आमचे मजूर घाम गाळतात इथेही आणि तिथेही. तर अशा बांधलेल्या इमारती पाडून काय त्यांच्या मेहनतीवर पाणी फिरवायचे? दोन्हीकडे आमचेच हाडामांसाचे लोक राहतात. आणि शेवटी विकास महत्त्वाचा, विलास नाही. त्यासाठी जी काही गरज असेल ती भागवून पुढे जावेच लागेल अशा मताचा मी आहे. मग तिथे नियमांचा बाऊ जास्त करून चालायचे नाही. लोकांचे जीवनमान उंचवायाचे तर उंच टॉवर्सना पर्याय नाही मग भलेही काही प्रतिष्ठित त्यांस अनधिकृततेचे लेबल लावोत.

*तुम्ही नेहमीच अशी रोखठोक भूमिका घेत आला आहात म्हणून अवघ्या महाराष्ट्राला तुमचे कौतुक वाटते...*

काय आहे मी रोख घेऊन ठोक देणारा नेता नाही आहे. मला एवढेच वाटते की उद्या सर्वच गोष्टींना परवानगी लागायला लागली तर विकास खुंटेल एवढे न्नक्की.

*बरं, आता राज्यातील पाणी प्रश्नाकडे वळूया..*

हा माझ्या सध्याच्या अभ्यासाचा विषय आहे. देशोदेशी याबाबत काय अवस्था आहे हे बघावयास मी जगातीत कितीतरी देशांचा दौरा केला. मी ह्या अभ्यासानंतर या निष्कर्षावर पोहोचलो की पाणी हे जीवनावश्यक आहे आणि जगातील कोणत्याही प्राणिमात्रास याची गरज लागतेच. त्यामुळे पाणी प्रश्न खरे तर ज्वलंत प्रश्न आहे म्हणजे आग विझवायला तेच पाणी मदत करत असले तरीही. पाण्यावर शहरी जनता काय नि आमचा ग्रामीण शेतकरी बांधव काय, सगळेच अवलंबून आहेत. शेतकऱ्याचे तर जगणे मरणे पाण्यावर अवलंबून आहे. शेतकरी जगला तर माणूस जगेल. आता काही आत्महत्या होतात. पण आत्महत्या झाल्यास सरकार काय काय करणार? प्रत्येकास कसे थांबवणार? आम्ही याचा सखोल अभ्यास केला. अमेरिकेतील एका खेड्याशी तुलना करायला आम्ही भर मे महिन्यात तिकडे गेलो. इकडे पाणी टंचाई होती आणि आम्ही जिवास घोर घेऊन अभ्यास करत होतो. आमच्या एक लक्षात आले ते हे की शेतीसाठी पाणी महत्त्वाचे आहे. आज अमेरिकेतील खेड्यात सुबत्ता आहे ती शेतीस मुबलक पाणी

मिळाल्यानेच. त्यामुळे पाऊस नीट होणे महत्त्वाचे, त्यातही आम्ही धरणांतील पाणी उसासारख्या पिकांकडे वळवले तर साखर निर्यात वाढून देशाच्या परकीय चलनात वाढ होईल. असा देश पातळीवरील विचार होणे गरजेचे आहे.

*मध्ये तुम्ही उपोषणास बसला होतात त्यावेळी..*

उपोषण नव्हे, ती आत्मशुद्धी होती. किंवा आत्मक्लेश म्हणतात म्हणे. मी तर एकाच दिवसात तीन वेळा उपोषण करून तीन वेळा आत्मशुद्धी केली. म्हणजे असे की, सकाळी ब्रेकफास्ट नंतर दुपारच्या जेवणापर्यंत निरंकार उपास, मग दुपारपासून ते संधाकाळपर्यंत दुसरे सत्र नि चहापानानंतर रात्रीच्या भोजना पर्यंत तृतीय सत्रातील उपोषण. मधल्या काळात पाण्याचा एक थेंब ही नाही. मनाचा निग्रह केला की सारे जमते. मला तर यात इतरांचा ही सहभाग असावा असे वाटते, म्हणजे एकाच उपोषणावेळी तीन जणांनी सहभागी व्हायचे. सकाळी एकाने, दुपारी दुसरा तर संध्याकाळी तिसऱ्याने बसायचे म्हणजे तिघांना एका दिवसात आत्मशुद्धीची संधी मिळेल.

*पण हे सर्व का केलेत?*

हे सर्व करायला कारण म्हणाल तर आहे, म्हणाल तर नाही. मला स्वत:ला ह्या प्रकाराचा अभ्यास करायचा होता एकदा. माझी ही अभ्यासाची नेहमीची पद्धत. स्वत: पारखल्या वाचून मला चैन पडत नाही. म्हणून माझ्याकडे येणाऱ्या एका शिष्ट मंडळाचा मी मुद्दाम उद्दामपणे अपमान केला. मग म्हटले बघू आत्मशुद्धीने मनाची टोचणी कमी होते की नाही. पण खरे सांगतो ही पद्धत उपयोगी आहे नक्कीच. पण मला त्यास आत्मक्लेष म्हणायला आवडत नाही, क्लेष कोणीही कोणाला, म्हणजे अगदी स्वत:स ही स्वत:स दिलेले वाईट. म्हणून मी यास आत्मशुद्धीच मानतो.

*लोककलांकडे वळूयात. लोककलांना प्रोत्साहन मिळावे म्हणून तुम्ही तमाशा लीग चालवणार आहात? त्याबद्दल सांगा जरा.*

काय आहे, लोककला हा आपला श्वास आहे, म्हणजे असायला हवा. त्यातील एक म्हणजे तमाशा. मी स्वत: गावोगावच्या तमाशांस नियमित हजेरी लावून लोककलांस प्रोत्साहन देत असतो. सरकारातील कोणी नियमित पणे आपल्याकडे येते म्हणजे सरकार दरबारी

आपली परिस्थिती सुधारेल असा विश्वास त्या कलावंतांस वाटतो. हे सरकार सर्वांचे आहे हा विश्वास दिला गेला पाहिजे.

*आता शेवटचे दोन प्रश्न. दहा वर्षांनंतर हा महाराष्ट्र कोठे असेल असे वाटते?*

पुढे गेलेला असेल. मी दहा वर्षांनी म्हातारा झालेला असेन. श्रेष्ठींची इच्छा असेल तर कदाचित मुख्यमंत्र्यांच्या खुर्चीत ही बसलेला दिसेन. काळ कोणासाठी थांबत नाही पण महाराष्ट्राचा उत्कर्षच होईल एवढे नक्की. पण सदा माझ्या डोक्यात पाणीप्रश्न घोळत असतो. तर पाण्याचे म्हणाल तर गाव तेथे टँकर योजना तोपर्यंत नीट कार्यान्वित झाली असेल. पावसावर अवलंबून न राहता नि पाईपलायनी नि धरणांवर खर्च न करता जेथे पाऊस पडतो तेथील पाणी गावोगाव त्याच पैशात टँकरने पुरवले जावे असे मला वाटते. आफ्रिकेतील एका छोट्या देशात ही योजना माझ्या अभ्यासात माझ्या ध्यानात आली. त्यामुळे टँकरच्या बाबतीतरी महाराष्ट्र स्वयंपूर्ण झालेला दिसेल. माझ्या मुलाने याबाबतीत टँकरचा व्यवसाय सुरू करण्याचा निर्णयही घेतला आहे.

*सरते शेवटी, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व्हाल एक दिवस तेव्हा प्रथम अॅजेंडावर काय असेल?*

विकास. तोही सर्व समावेशक विकास. उगाच याला वगळ त्याला वगळ असे नको. गुन्हेगार असो कि गुंड, कुठल्या गुन्ह्यातला आरोपी. त्याचे माणूसपण महत्त्वाचे. अशांना राजकीय प्रवाहात सामावून घेऊन त्यांचे पुनर्वसन महत्त्वाचे. माणसाची काम करायची क्षमता आहेना हे बघून त्यास मंत्रीपद दिले तर असे लोक पण नक्कीच दखलपात्र कामगिरी करतील. कदाचित काही घोटाळे होतील पण काहीच न घडण्यापेक्षा ते परवडेल. आणि मला स्पष्टपणे वाटते की अशा घोटाळयांमागे देखील बुद्धिमत्तेची गरज असते. सर्व समावेशक विकास म्हणून महत्त्वाचा.

संपतरावांनी राज्याच्या समस्यांचा खोलात जाऊन अभ्यास केला आहे आणि या सर्वांस एक जागतिक परिमाण आहे हे दाखवले आहे. त्यांच्यासारख्यांच्या मार्गदर्शनाची महाराष्ट्रास आज नितांत गरज आहे. संपतराव, आपण आपला मूल्यवान वेळ आपल्या अभ्यासातून काढून दिलात याबद्दल राज्यातील जनतेच्या वतीने तुमचे आभार !

## सुदामराव शिर्के : आपले भावी मुख्यमंत्री

( सुदामराव दामाजी शिर्के यांच्या षष्ट्यब्दीपूर्तीसाठी वृत्तपत्रात प्रकाशित झालेल्या पुरवणीतील सुप्रसिद्ध साहित्यिक आणि त्यांचे सुहृद श्री. महादेव विचारे यांचा हा खास लेख, सुदाम रावांच्या वेगवेगळया पैलूंवर प्रकाश टाकणारा. )

सुदामराव दामाजीपंत शिर्के हे महाराष्ट्रातील एक लोकमान्य आणि कर्तृत्वाच्या कसोटीवर उतरलेले नेतृत्व. गेल्या ४० वर्षांपासून त्यांचा वरदहस्त महाराष्ट्रावर आहे. आज साठीत प्रवेश करताना त्यांच्या कर्तृत्वास सलाम करून त्यांनी शंभरी गाठावी ही ईश्वरचरणी प्रार्थना.

सुदामरावांनी ऐन विशीत असताना राजकारणात उडी घेतली. तेव्हाच्या मॅट्रीक परीक्षेत तिसऱ्यांदा यश येत नाही हे पाहून एखादा माणूस हादरून गेला असता. पण सुदामरावांची बारकाईने विचार केला(बारकाईने कुठल्याही गोष्टीचा विचार करायची सवय अगदी तेव्हापासूनची ) त्यांना यात काही दैवी संकेत दिसला. त्यादिवसांत सुनील गावस्करचा जन्म क्रिकेट खेळण्यासाठी झाला असावा असे वाटायचे तसा आपला जन्म राजकारणासाठी झाला असावा अशी खूणगाठ त्यांनी बांधली आणि त्यांनी तेव्हाचे एक बडे प्रस्थ नरसिंगराव इरगोंडा पाटील यांची शागिर्दी पत्करली. त्याकाळात नरसिंग रावांनी आपले साम्राज्य स्थापिले होते. आज आपण खळ्ळ खटॅक ची भाषा ऐकतो तसा तेव्हाचा त्यांचा नारा होता ’बघतोस काय सलाम कर ! ’ ते तसे घडवण्यासाठी त्यांना तरूण मुलांची गरज लागायची, अशी मुले की जी त्यांच्या एका हाके सरशी धावून येतील. सुदामराव लवकरच त्यांच्या गळयातले ताईत बनले. इरगोंडापाटीलांच्या साम्राज्याची वीट न वीट चिरेबंदी बनावी म्हणून त्यांनी खूपच श्रम घेतले. त्या काळात ते तीनदा तुरूंगातही गेले. त्यानंतर त्यांचा सुरू झाला जिल्हापरिषदेतला प्रवास, प्रथम सभासद नंतर सभापती, तेव्हापासूनच त्यांच्या उत्कर्षास खरी सुरूवात झाली. यथावकाश ते आमदार झाले, आधी राज्यमंत्री नंतर कॅबिनेट मंत्री झाले पण आपल्या सुरूवातीच्या दिवसांना ते कधी विसरले नाहीत. १९८५ मध्ये नरसिंगराव आणि त्यांचा

तरूण मुलगा यांचे अपघाती निधन झाले. सकाळी फिरायला गेलेल्या दोघांना वेगात येणाऱ्या एका गाडीने चिरडले. यात सुदामरावांचा हात आहे अशी कंडी विरोधकांनी पिकवली पण  सुदामराव त्या सर्वांना पुरून उरले आणि नरसिंगरावंचे साम्राज्य त्यांच्या हाती आले. आजही त्यांच्या दिवणखान्यात नरसिंगरावांचा मोठा फोटो दर्शनीच लावलेला दिसेल. त्यानंतर काही वर्षांतच सुदामराव राज्यमंत्री झाले. १९८९साली ते शिक्षणमंत्री झाले. आज राज्यात ८वी पर्यंत परीक्षा नसतात आणि मुलं ९वी पर्यंत पोहोचतात पण त्यावेळीच त्यांनी अगदी ग्रॅज्युएशन पर्यंत परीक्षा नसावी असा प्रस्ताव ठेवला होता. यामागे त्यांची शिक्षणासाठीची कळकळ होती. पाटबंधारे खात्यात काम करताना हे बंधारे उत्पन्नाचे साधन कसे होतील या कडे त्यांनी लक्ष दिले. काही ठिकाणी तर नद्याही नसताना धरणे त्यांनी बांधली. उद्या तिथे एखादी नदी अवतीर्ण झाली तर धरण तयार हवे असा त्यांचा भविष्यवेधी प्रयत्न. आजही त्यांना अख्खा महाराष्ट्र अगदी तळहाताच्या रेषांसारखा माहिती आहे. पूरग्रस्त भागाची हवाई पाहणी तर सर्वच करतात पण सुदाम राव अवर्षणग्रस्त भागाचीही हवाई पाहणी करतात. अशाच एका दुष्काळी पाहणीसाटी मी एकदा त्यांची सोबत केली होती. तिकडून आल्यावर नाश्त्यासाठी आम्ही ओबेरॉय मधे गेलो. चिलीचिकन सॅंडवीच चाखताना त्यांच्या डोळयात पाणी तरळले. मी त्यांना काय झाले असे विचारले तेव्हा दुष्काळी भागाचे कसे होईल याची चिंता वाटते असे ते डोळे पुसत म्हणाले आणि त्यांचा एक  संवेदनशील चेहरा मला पहायला मिळाला. योगायोगाने तेव्हा मराठवाडा मित्र आणि सत्तासोपान या वृत्तपत्रांचे पत्रकार तिथे होते. त्याकाळी पहिल्याच पानावर ’दुष्काळी भाग पाहून सुदामराव शिर्केच्या डोळयात पाणी’ अशी बातमी वाचलेली काही जणांना नक्कीच आठवत असेल.

## राजकीय तत्वचिंतक

सुदामराव हे एक राजकीय नेतेच नसून एक राजकीय चिंतकही आहेत. त्यांनी लोकशाही आणि समाजकारणा बद्द्ल काही मुलभूत मुद्दे मांडले आहेत.गांधीवादाचे त्यांना सुरूवातीपासूनच आकर्षण. ज्याविचारांमुळे वर्षानुवर्ष सत्ता मिळत राहते त्याबद्दल त्यांना आदर आहे. पण ’खरा गांधीवादी कोण?’ या लेखात त्यांनी म्हटले आहे : ’जुन्या

काळी स्वत:ला गांधीवादी म्हणवणारे धादांत असत्य कथन करीत की सत्य आणि अहिंसे वर आमचा विश्वास आहे. आज गांधीवादाशी फटकून वागणणारे मात्र निर्भीड पणे सत्य बोलतात की असत्य आणि हिंसा याच्या शिवाय हा लोकशाहीचा डोलारा सांभाळला जाणे कठीण आहे. आता यापैकी खरा गांधीवादी कोणता? आधीचा असत्यवचनी की नंतरचा सत्यवचनी?' लोकशाहीवर त्यांची श्रद्धा आहे पण अति तेथे माती म्हणतात त्याप्रमाणे अति लोकशाही ही घातक. तिला दृष्ट लागू नये म्हणून थोडी ठोकशाही हवीच. निवडणुका हाच लोकशाहीचा गाभा आहे. दर पाच वर्षांनी ते निवडून येतात. त्याबद्दल त्यांना काय वाटते ते त्यांच्या मराठवाडा मित्र मधील मुलाखतीत सांगितले आहे : 'आजही निवडणूक म्हटली म्हणजे परीक्षेला बसावे तसे टेंशन असते. बाकी कुणी एकदा ग्रॅज्वेट झाला की त्याला परत परीक्षा द्यायला लागत नाही पण आम्हाला मात्र दर पाच वर्षांनी परीक्षा. निकालापर्यंत आपली धाकधूक चालूच असते. निवडून आल्यावर हल्ली काय ते अॅंटी ईंकंबंसी म्हणतात त्याचे टेंशन. विरोधकांचे एक बरे असते पण आम्ही निवडून आलो की आपल्या मतदारसंघात काही झाले तर दुसऱ्याकडे बोट दाखवता येत नाही. तरी निवडणुकांवर आमची श्रद्धा आहे.'

भ्रष्टाचाराबद्दल त्यांना अतीव चीड. ती एक लोकशाहीला लागलेली कीड आहे. एखादे काम होणार नसेल तर तसे सांगा होणारे असेल तर तसे सांगा. आपला हिशेब चुकता करून घ्या नि काम मरून द्या. उगाच पैसा घ्यायचा नि कामही करायचे नाही अशी बेईमानी नको. एवढी प्रामाणिकता हवीच. आपल्या कार्यकर्त्यांना त्यांचे हेच सांगणे असते. हिशोबाला पण ते चोख. पै न पै चा हिशेब त्यांच्याकडे ठेवला जातो. प्रत्येकाला वरपर्यंत ठरलेल्या वाट्यात कोणतीही बेईमानी ते होऊ देत नाहीत म्हणून श्रेष्टीही त्यांना वचकून असतात. कोणावर भ्रष्टाचाराचे आरोप झाले तर ते प्रथम जातीने सर्वांना हिस्सा मिळाला की नाही हे तपासून पाहतात. ह्या बाबतीत कोणतीही हयगय ते खपवून घेत नाहीत. काही प्रमाणात लाचखोरी गरजेची आहे असे ते निर्भीडपणे सांगतात. त्याशिवाय समोरच्याला किती नड आहे आणि ते काम किती आवश्यक आहे ते कसे कळणार असा त्यांचा बिनतोड युक्तिवाद आहे.व्यक्तीस्वातंत्र्य हाही त्यांचा आवडता विषय आहे. मधे ममता बॅनर्जींनी व्यंगचित्रकारास अटक केली, आंबेडकरांच्या कार्टूनवर हंगामा झाला. त्यावर त्यांना सात्विक संताप आला. लेखक, व्यंगचित्रकार,कलाकार असे

बुद्धीजीवी लोक आपल्या लेखणीच्या जोरावर राजकारण्यांची गळचेपी करतात असे त्यांना मनापासून वाटते. लेखणी तरवारीपेक्षा ताकदवान असेल तर तिच्यामुळे होणारी इजा ही आपल्या अर्ध आणि अशिक्षीत कार्यकर्त्यांनी लाठीकाठीने केलेल्या इजेपेक्षा जास्तच असणार. किंबहुना हिंसेवर आपला विश्वास नसल्याने मी लेखणी शक्यतो हातात घेत नाही असे त्यांनी सत्तासोपान या वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत सांगितले आहे. आपले कार्यकर्ते पण तसेच असावेत असा त्यांचा कटाक्ष असतो. आपल्या अशिक्षित कार्यकर्त्यांना भावना व्यक्त करायला लाठाकाठ्यांचीच भाषा समजते त्यात त्यांची काय चूक असा सवाल ते करतात तेव्हा आपण निरुत्तर झाल्याशिवाय राहात नाही. आजचे राजकारणी गेंड्याच्या कातडीचे असतात ही टीका त्यांना टोचते. एका कार्टून मुळे ज्यांच्या भावना दुखावू शकतात ते राजकारणी असंवेदनशील कसे असू शकतात? असे त्यांना वाटते. असे असले तरी लोकशाहीचे भवितव्य उज्वल आहे असे त्यांना वाटते. आज मी जो काही आहे तो लोकशाहीमुळेच आहे , या लोकशाहीमुळेच सुदाम्याचा सुदामराव झाला असे त्यांचे सांगणे असते.

## अमोघ वक्तृत्व

त्यांना अमोघ वक्तृत्वाची देणगी लाभली आहे. त्यांचे भाषण ऎकायला लांबलांबून हजारो लोक जमतात. कार्यकर्त्यांनी जमवलेली ही गर्दी त्यांचे भाषण संपेपर्यंत हलत नाही हे विशेष. त्यांच्या भाषणात टाळयांचा नुसता कडकडाट सुरू असतो, त्यातील काही वेळा तर उत्फूर्तपणे पण टाळया वाजवल्या जातात. त्यांच्या भाषणांचा संग्रह ’लोकशाही एक चिंतन’ या नावानी प्रसिद्ध झाला आहे. त्यात त्यांनी आपली विचार मौक्तिके मांडली आहेत. विधानसभेतील त्यांची भाषणे ही गाजतात. त्याच्या भाषणांचा संग्रह लवकरच प्रकाशित होण्याच्या मार्गावर आहे.हजरजबाबी पणामुळे ते विरोधकांना नामोहराम करून टाकतात. एकच उदाहरण देतो. मधे एका बारचे उदघाटन त्यांच्याहस्ते झाले. तेथे आधी एका शाळेसाठी आरक्षण होते असे विरोधकांचे म्हणणे. सुदामराव उभे राहिले आणि कडाडले ’ती तुमची शाळा होती आणि ही सुद्धा मधुशाळाच ना?’ त्यांच्या या उत्तराने विरोधक गप्प झाले.

## कार्यकर्ते हीच ताकद

कार्यकर्ते ही माझी खरी संपत्ती आणि शक्ती आहे असे सुदामराव नेहमीच म्हणतात. त्यांचा आपल्या कार्यकर्त्यांवर फारच जीव आणि वचकही. त्यामुळेच तुरुंगातून सुटलेले त्यांचे कार्यकर्ते प्रथम घरीसुद्धा न जाता त्यांच्या दरबारात हजेरी लावून जातात. कार्यकर्त्यांवर त्यांचे बारीक लक्ष असते. त्यांच्या घरादारावरही ते बारीक लक्ष ठेऊन असतात. सर्वांना ते नावानिशी म्हणजे अगदी घरातल्या टोपणनावाने ओळखतात. आधी कर्तृत्व मग नेतृत्व असे ते नेहेमी सांगत असतात. त्यांचा एकनिष्ठ शिलेदार राजेन्द्र शेलार आमदार झाल्यावर सोन्याचे दागिने घालून त्यांच्या पाया पडायला आला तेव्हा सद्गदित होत त्यांनी त्याला म्हटले, 'राजू संधीचे सोने केलेस रे बाबा.'असा त्यांचा आपल्या कार्यकर्त्यांवर जीव. कार्यकर्त्यांनी अडलेल्या नाडलेल्यांना मदत करावी याकडे त्यांचा कटाक्ष असतो. त्यांचे कार्यकर्ते ही अशांच्या शोधातच असतात. तुकोबा तरी वेगळे काय सांगतात? ,जे का रंजले गांजले त्यांसी म्हणे जो आपुले,त्याप्रमाणे रंजल्या गांजल्या गरीबांना मदत करायला ते सदैव तत्पर असतात. कोणी तसा गरीब दिसला नाही तर ते अस्वस्थ होतात आणि आधी त्या गरीब माणसास अडवतात, नाडतात,नंतर मदत करतात आणि ते पुण्य पदरात पाडून घेतात. त्यांचे कार्यकर्तेच त्यांचे वैभव आहे असे सुदामराव सर्वांना सांगत असतात.

## कुटुंबवत्सल सुदामराव

सुदामराव कुटुंबवत्सल आहेत. आपल्या मुलावर त्यांचा फारच जीव. त्यांच्या सबळ पाठींब्यानेच त्यांचा मुलगा उमेश आज एम.ए. पर्यंत पोहोचला आहे. डिग्र्यांशिवाय प्रतिष्ठा नाही हे त्यांनी सोसले आहे. उमेशला पुढे पी.एच.डी मिळावी याची तजवीज पण करण्यात सुदामराव गुंतले आहेत. उमेश पण एक गुणी मुलगा आहे. एक टोलनाका सांभाळून तो सध्या एक शिक्षण पुरे करतो आहे. त्याचे भवितव्य उज्ज्वल आहे यात शंका नाही. सुदामरावांना कोणी पुतण्याही नसल्याने उमेशच त्यांचा उत्तराधिकारी होणार यात शंका नाही.

सुदामरावांची दोन श्रद्धास्थाने आहेत. पहिले म्हणजे नरसिंग ईरगोंडा पाटील. आधी त्यांच्या असण्यामुळे आणि नंतर त्यांच्या नसण्यामुळे आपली राजकीय कारकीर्द घडली याची त्यांना सदैव जाणीव असते. त्यामुळे ते त्यांच्या स्मृतिपुढे ते सदैव नतमस्तक होतात. दुसरे त्यांचे श्रद्धास्थान म्हणजे निवडणुका किंवा अगदीच नेमकेपणे सांगायचे तर निवडणूक आचारसंहिता.निवडणुका आल्यावरच त्यांचे पालन न करता आपल्या पाची वर्षांत मतदारांवर प्रभाव पडू नये म्हणून कोणताही निर्णय घेणे ते टाळत असतात. असे हे सुदामराव शतायुषी व्हावेत ही जगन्नियंत्याकडे आणि ते लवकरच मुख्यमंत्री झालेले बघायला मिळोत अशी त्या सर्वशक्तिमान हायकमांड चरणी प्रार्थना.

## मालिनीताई समर्थ : बंद हृदयसम्राज्ञीला श्रद्धांजली

मालिनीताई समर्थ एक समाजसेविका होत्या. तशा त्या खोपर मतदार संघाच्या आमदार होत्या आणि आधी तिकडील नगरसेविका होत्या पण त्यांना स्वत:स समाजसेविका म्हटलेलेच अधिक आवडे. आपल्या समाजसेवेची सुरूवात त्यांनी काही वर्षांपूर्वी खोपर मध्ये केली ती पाणी टंचाईच्या प्रश्नावरून. त्यावेळी हंडे, कळशा आणि बादल्या घेऊन उपडी बादली मोर्चा त्यांनी काढला होता. त्यानंतर सर्व त्यांना बादलीताई म्हणून ओळखू लागले. त्या प्रश्नाची तड पालिकेत गेल्याशिवाय लागायची नाही हे लक्षात आल्यावर उलटा तांब्या चिन्हावर त्यांनी पालिकेची निवडणूक लढवली. त्यात त्या निवडूनही आल्या. आपल्या  पालिकेतील पहिल्या कारकीर्दीत या प्रश्नावर त्यांनी जिवतोड मेहनत घेतली पण तो असा कठीण प्रश्न आहे की तरीही सुटला नाही. तेव्हा पुढील निवडणूकीत त्यांनी अजून काही काळ आपल्या लोकांकडून मागून घेतला. प्रचारात आपल्याकडून होईल तसा प्रश्न सोडवावा म्हणून पाण्याच्या १ लिटरच्या बाटल्या वाटून लोकांना भरघोस मदत केली. त्या काळात त्यांच्या कार्यकर्त्यांची फौज जमा झालीच होती. त्यामुळे परत निवडून येण्यास काहीच अटकाव झाला नाही. विरोधकांनी त्यांच्यावर बूथ कॅप्चरिंग आणि पैसे वाटल्याचा आरोप केलाच पण शेवटी विजय तो विजयच असतो. आजही खोपर मध्ये तसेच पाण्याचे दुर्भिक्ष असते, यावरून तेथे ही किती गहन समस्या असावी याचा आपल्याला अंदाज येईल. तरीही दिवसातून अर्धाएक तास येणारे पाणी मालिनीताईंच्याच प्रयत्नांमुळे आहे याची जाणीव खोपरकरांना आहे. कामकरी महिलांना अधून मधून मदत म्हणून त्या पाण्याचे पाऊच वाटत असत. ते पिऊन थकल्या भागल्या बायकांच्या मिळणाऱ्या दुवांचेच मालिनीताईंना कौतुक होते. त्यांच्या यजमानांनी पाणी पळवून ते आपल्या 'समर्थ मिनरल वॉटर'च्या कारखान्याकडे वळवले असा आरोप विरोधक भलेही करोत पण त्या कारखान्यात पाऊणशे लोकांना रोजगार मिळाल्याने त्यांना कृतार्थ वाटत असे.

मालिनीताईंची खरी कामगिरी मात्र हवा तेव्हा बंद घडवून आणणे ही होती. लोक त्यांना बंद सम्राज्ञी म्हणत. हळूहळू त्यांचे कार्यकर्ते त्यांना खोपरहृदयसम्राज्ञी म्हणू

लागले. नंतर त्यांची ओळखच बंदहृदयसम्राज्ञी म्हणून पडली. स्थानिक असो की राज्यस्तरावरील किंवा राष्ट्रीय, कुठल्याही प्रश्नावर ताईंचे मत विचारात घेतले जाई. त्या त्या प्रश्नाच्या सोडवणूकीसाठी बंद हाच उपाय दिसला तर त्या बंद ची हाक देत. किंबहुना बाकी कोणी बंदची हाक दिली तर त्यास मालिनीताईंचे समर्थन असेल तरच तो खोपरमध्ये यशस्वी होत असे. एकदा बंद जाहीर झाला की तो उत्स्फूर्त होईल याची जबाबदारी त्यांचे कार्यकर्ते घेत. रस्त्यारस्त्यावर उत्स्फूर्तपणे दुकाने,रिक्षा आणि टॅक्सी बंद पाडणारे त्यांचे समर्थाचिये सेवक कार्यकर्ते पाहून बंद न पाळणाऱ्या लोकांनाही लाज वाटे आणि तेही उत्स्फूर्ततेने सामील होत. बंद घडवण्याच्या त्यांच्या क्षमतेचा हेवा बाकीच्यांना वाटला नाही तरच नवल होते. आंतरराष्ट्रीय किंवा परग्रहावरील समस्याही आपल्या मतदारसंघातील बंदने सोडवता येतील असा त्यांचा विश्वास होता आणि अशी त्यांची आकलन शक्ती होती. बंद बद्दल त्यांनी मौलिक विचार वेळोवेळी मांडले आहेत. त्यात त्यांचे चिंतन दिसून येते. जगातील कोणताही प्रश्न बंद वाटे सुटू शकतो असे त्यांना वाटे. बंद आपल्या भारतीय मानसिकतेचा भाग आहे, आपल्या लोकांना जास्त काम करायला सांगितले तर ते ऐकत नाहीत उलट काम बंद म्हटले की पदराला खार लावूनही ते तयार होतात. बंद करावयास धमक लागते. तो यशस्वी करावयाचा तर थोडीफार दगडफेक आणि दोन चार बसेस जाळणे अपरिहार्य ठरते. पालिकेने जुन्या पुराण्या बसेस अशा प्रसंगी खास जाळण्यासाठी रस्त्यावर उतरवाव्यात असा ठराव त्यांनी पालिकेत ही मांडला होता. आपल्या विरोधकांत धमक असेल तर त्यांनी एक तासाचा तरी बंद घडवून दाखवावा असे आव्हान त्यांनी विरोधकांना दिले होते, ते अजून कोणी स्वीकारले नाही हे पुरेसे बोलके ठरावे.

ताई दानशूर ही होत्या. अडल्यानडल्यांना मदत करणे हा त्यांचा स्वभाव धर्मच होता. कित्येक संस्थांना त्या लाखालाखाच्या देणगीच्या चेक्सच्या झेरॉक्स कॉपीज उदार अंत:करणाने पाठवीत असत किंवा ते चेक्स फॅक्सने पाठवत असत. त्याच्या ह्या देणग्यांची बेरीजच काही लाखांत जाईल. अर्थात त्यांची जाहिरात त्यांनी कधी केली नाही आणि त्या संस्थांची नादानी अशी की त्यांनी देखील अशा देणग्या मिळाल्याचे

कधी मान्य केले नाही. देणाऱ्याने देत जावे म्हणत मालिनीताई मात्र चेक्सच्या झेरॉक्स कॉपीस सर्वांना पाठवितच राहिल्या.

मालिनीताई मात्र पिंडाने खऱ्या समाजसेविका होत्या, त्या सामजिक प्रश्नांतच अधिक रमत असत. आपल्या नगरसेविका निधीतून त्यांनी एकदा एका गटारावर झाकण बसवून घेतले. भर रस्त्यावरील त्या झाकणावर आजही एका खांबावर मालिनीताई समर्थांच्या नगरसेवकनिधीतून असा फलक डोलतो आहे. त्या झाकणाला आणि खांबालाही आज पोरके झाल्याचे वाटत असेल. अशी त्यांची माया होती. त्यांनी नाले ओलांडण्यासाठी छोटे पूल बांधणे, नळात पाणी येईल तेव्हा सर्वांना कळावे म्हणून खोपर मध्ये भोंगे बसवणे, कचरा दृश्य राहू नये म्हणून त्या ढिगांसमोर आपल्या संघटनेचे मोठे बोर्ड लावणे अशी कित्येक कामे खोपर मध्ये करवून घेतली. खोपरमधील रस्तोरस्ती पडलेले खड्डे त्या स्वत: पेव्हर ब्लॉक च्या तुकड्यांनी भरत असत. त्यामुळे वाहनचालकांना त्रास होतो या तक्रारीकडे त्या दुर्लक्ष करीत. कामे करणाऱ्यांनाच टीकेचे धनी व्हावे लागते असे त्या नेहमी म्हणत. खोपर मध्ये पावसाळ्यात पाणी साठणे, काही घरे पाण्याखाली जाणे नेहमीचेच. स्वत: मालिनीताईंच्याच कारखान्याच्या अनधिकृत बांधकामाने पाण्याची वाट अडून पाणी साठते या विरोधकांच्या आरोपांकडे लक्ष न देता लोकांच्या सुटकेसाठी दोन कायम स्वरूपी बोटींची व्यवस्था त्यांनी करून घेतली आहे. त्यांनी दोन ॲम्ब्युलन्स ही सदैव तयार ठेवण्याची आपल्या मतदारसंघात सोय केली आहे. एकीकडे काही कार्यकर्ते दगडफेक,आणि जाळपोळीत मग्न असताना त्यांचे अन्य काही कार्यकर्ते जखमींना तत्परतेने आपल्याच ॲम्ब्युलन्स मधून हॉस्पिटलात हलवत आहेत असे हृदयस्पर्शी दृश्य खोपर मध्ये वरचेवर पाहायला मिळते. त्यांच्या लोकप्रियतेचे हेच रहस्य असावे बहुधा. त्यांनी महिलांचे प्रश्न सोडवण्यासाठी महिलामंच स्थापला होता. त्यातून कपड्यांच्या क्लिपा, हेअरपिन्स, रबरबॅंड, रिबिनी, पाण्याचे मग्स इ.जीवनावश्यक वस्तुंचे वाटप अशा उपक्रमांना त्यांनी सुरूवात केली. त्यातून महिला सक्षमीकरणास मोठीच मदत झाली असे त्यांना वाटत असे. हुंडा बंदी आणि स्त्री भ्रूण हत्याविरोधी त्यांनी प्रभावी विचार मांडले. कमी वयात मुलींचे लग्न लावू नका असे त्या आपल्या कार्यकर्त्यांना समजवीत. त्यांच्या भूमिका ठाम पणे मांडायला त्या कचरत

नसत. त्यासाठी आपल्या कार्यकर्त्यांना तुरूंगात जावे लागले तरी बेहत्तर अशीच त्यांची भूमिका असे. शेवटी त्याच त्यांना जामिनावर सोडवतील अशा खात्रीने ते ही खुशीने तुरूंगात जाण्यास तयार होत.

त्यांना नंतर आमदारकी मिळणे ओघानेच आले. मतदारसंघ विस्तारला तरी त्यांची आपल्या वॉर्डावरील माया कमी झाली नाही. विधानसभेत त्या मितभाषी असत. काही वर्तमान पत्रांनी त्यांची संभावना मौनी आमदार म्हणून केली होती तेव्हा त्यांनी आपल्या संस्कृतीतील मौनाचे महत्त्व सांगून त्यांनी गप्प केले होते. त्या अर्थाने त्या कट्टर संस्कृतिरक्षक होत्या. त्यांना अजून आयुष्य मिळाले असते तर कदाचित त्या मंत्री किंवा खासदार झाल्या असत्या पण देवालाही स्वर्गातील पाणीप्रश्न सोडवायला त्यांची गरज भासली असावी !

त्यांच्या मृत्युनंतर त्यांचे कार्यकर्ते सैरभैर होणे स्वाभाविकच आहे. त्यातून काही मोडतोड किंवा एक दोन बसेस जळाल्या तर त्यात आश्चर्य नाही.आणि वावगेही काही नाही. आपल्याला कधीही पोलिसांपासून रक्षण देणाऱ्या ताई आज नाहीत हे सत्य त्यांच्या कार्यकर्त्यांना स्वीकारावावेच लागेल. त्यांच्या मृत्युनंतर जो उत्स्फूर्त बंद त्यांनी घडवून आणला त्यातच ताईंच्या कार्यकर्त्यांची कर्तबगारी दिसते. कोणी हा बंद भीती पायी आहे असे म्हटले तरी त्यांची तोंडे बंद करायची भीती त्यांच्या कार्यकर्त्यांना वाटत नाही. 'समर्थाचिया सेवका वक्र पाहे असा भूमंडळी कोण आहे' असे म्हणणारे निर्भय कार्यकर्ते त्यांनी घडवले. पोलिसांत देखील त्यांनी उपकृत केलेल्यांची संख्या कितीतरी असावी त्यामुळे 'घाबरू नकोस मी तुझ्या पाठीशी आहे' एवढा संदेश आणि बाकीचा आदेश त्यांच्या कार्यकर्त्यांना पुरेसा पडत असे. कोण्या कवीने म्हटल्याप्रमाणे, 'खुशीमे भी पी है और गम मे भी पी है' त्याच प्रमाणे सणासुदीला ही बंद आणि कोणाच्या मरणानंतरही बंद पाळणे ही आपली संस्कृती आहे, त्यामुळे ताईंच्या अकाली मृत्युनंतर काही काळ जिथे काळच थांबला तिथे काही दिवस खोपरातील व्यवहार बंद राहिले तर त्यात आश्चर्य ते काय.

अशा या ताई आज नाहीत हे पचवणे लोकांना कठीण जाईल. नाक्यानाक्यावरील मोठमोठी होर्डिंग्स याचीच साक्ष देतात.

ताई तुम्ही गेलात निघून....
खोपर झाली पोरकी,
जणू झाडे झाली बोडकी.
***
ताई तुमचे प्रचंड उपकार
तुम्ही सावरला अवघा संसार
***
प्रचंड माणसाच्या तारणहार
ताई तुम्ही केली दैत्य संहार
***
थेंब थेंब पाण्याचा
ताईंच्या आठवणींचा...
ताई तुम्ही परत या

अशी उत्स्फूर्त आणि सैरभैर झाल्याने असेल पण काहीशी अनाकलनीय अशी काव्ये नाकोनाकी दिसायला लागली आहेत. त्यातील शब्दश: अर्थ महत्त्वाचा नाही तर भावना महत्त्वाची आहे.

मालिनीताईंच्या मागे त्यांचे यजमान श्री. सुधाकर समर्थ आहेत. त्यांची ’समर्थ मिनरल वॉटर’ ही कंपनी आज नावारूपाला आली आहे. त्यांचा मुलगा नितांत आज ताईंच्याच पावलावर पाऊल टाकत राजकारणात शिरतो आहे. त्या निमित्ताने मला त्यांचे एक वेगळेच दर्शन काही महिन्यांपूर्वी झाले. तीन महिन्यांपूर्वी त्या आजारी पडल्या. आजाराचे गांभीर्य कळल्यावर त्यांनी मी आणि इतर दोघा निष्ठावंताना बोलावले. आम्हाला म्हणाल्या, ’मोकळेपणाने सांगा संघटना आमच्या नंतर कोण चालवणार?’ आम्हाला प्रश्न अनपेक्षित होता. कोणीच काही बोलत नाही पाहून त्या

म्हणाल्या, 'माझ्या नितांत ला सांभाळून घ्याल ना तुम्ही सारे?' आम्ही सारे 'हो' म्हणालो तशा त्या म्हणाल्या, 'मग उद्याच त्यांच्या उपाध्यक्षपदाची घोषणा करून टाका.' अशा रितीने ताईंनी लोकशाही पद्धतीने नितांतला आपले वारसदार नेमले. योगायोगाने नितांतसाहेबांचा त्याच दिवशी २१वा वाढदिवसही होता. अशा ताईंमध्ये वरून हुकूमशाहीचे काटे दिसत असले तरी त्यांच्यात सर्वानुमते कारभार चालवणाऱ्या लोकशाहीचे  गोड गरे आतून भरले होते. तीन वर्षांपूर्वी नितांतचे लग्न झाले, तेव्हा ताईंनी मुलीकडच्यांकडून चांगला १० लाखांचा हुंडा घेतल्याची वदंता होती. मी स्वत: त्याबद्दल ताईंशी बोललो होतो. ताईंनी त्यावेळी माझ्या डोळयात झणझणीत अंजनच घातले, म्हणाल्या, 'भाऊसाहेब, पुढेही लक्षात ठेवा, आपले खासगी आयुष्य वेगळे आणि सार्वजनिक वेगळे ठेवा, दोघांची सरमिसळ होऊ देऊ नका.' त्यामुळे हुंडाबंदी ही सार्वजनिक भूमिका असली तरी व्यक्तिगत आयुष्यात त्यांची लुडबुड होऊ देणे त्यांना मान्य नव्हते. सुधाकरराव म्हणूनच आजही कोठेही पुढे पुढे करताना दिसत नाहीत. मागील वर्षी त्यांना नातू झाला तेव्हा त्या अत्यंत आनंदात होत्या. 'नातूच झाला हो' असे फोनवर अत्यानंदाने सांगणाऱ्या ताई अजूनही डोळयापुढे येतात. 'आधुनिक तंत्रज्ञानाने आपले आयुष्य खूपच सोपे केले आहे' असे त्या तेव्हा मला का म्हणाल्या हे मात्र कोडे मला सुटले नाही. असो.

मालिनीताई आज आपल्यात नाहीत. त्यांनी घडवलेले कार्यकर्ते आहेत,  नितांतसाहेब त्यांची गादी चालवतील अशी खात्री आहे. नळातून पडलेल्या पाण्याच्या प्रत्येक थेंबाथेंबानंतर खोपर मधल्या महिला त्यांची आठवण काढतील. आज खोपर मधील रस्त्यारस्त्याला आणि प्रत्येक बिल्डिंग,शाळा आणि कॉलेजला त्यांचे नाव द्या अशी मागणी होत आहे. खोपर लाच मालिनीपुर म्हणावे अशीही मागणी होते आहे. यात प्रॅक्टिकल प्रॉब्लेम्स लोक ताईवरील प्रेमापोटी विचारात घेत नाहीत. तरी नितांतसाहेबांचे म्हणणे असे की, त्यांनी दाखवलेल्या वाटेवर चालणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. हे खरेच आहे. अशा ताई परत परत जन्मत नसतात.

४

**कथा दीर्घ कथा नि कादंब-या दिवाळी अंकांतून येतच असतात. अल्पचरित्र वाचलं असेल पण पूर्ण आत्मचरित्र? या 'वार्षिक चोरबाजार' च्या दिवाळी अंकातील वाचा हे संक्षिप्त आत्मचरित्र!**

## चोराच्या वाटा (एक संक्षिप्त आत्मचरित्र) : श्री.मनोहर घांग्रे

<u>अर्पण पत्रिका</u>

माझे गुरू आणि सहकारी पुरणसिंग यांस अर्पण.
पुरणसिंग, मी एकलव्या सारखा तुझ्याकडून शिकलो पण तू द्रोणाचार्या सारखा अंगठा नाही कधी मागितलास...

<u>रूण निरदेश</u>

हे सर्व xxxxx xxx माझं म्हणजे ओर्जिनल. मी स्वत: लिहायचे म्हटले तर सर्व पानं xxx नी भरून गेली असती. वाचतानाच काय पण छापणाऱ्याच्या पण अंगावर काटा येईल अशी माझी भाषा, म्हणून मी माझे मीत्र पी.पी.भोराडेंना विनंती केली. xxx नगर्सेवक बनायचे स्वप्न म्हटल्यावर ते तयार पण झाले. हे सर्व वाचनीय ( हा शब्द भोराडेंनीच पुरवला ) व्हायचे कारण बी तेच. त्यांना माझा थ्यांक्यू.

<u>मनोगत</u>

दिवस ट्वेंटी ट्वेंटी चे आहेत. टेस्ट क्रिकेटचा जमाना गेला. वन डे चा भाव ही आता कमी झाला. आता सारे काही झटपट, इथे वेळ आहे कोणाला? पूर्वी २-३ खंडांची आत्मचरित्रे लिहित. नंतर २००-३०० पानांची. पण हे सर्व आता out of fashion झालंय, आता फक्त ३-४ पानांची संक्षिप्त चरित्रे लोकं वाचतील, तर हे आहे माझे संक्षिप्त आत्मचरित्र.

फार पूर्वी फक्त चारित्र्यवान लोक चरित्र लिहायचे. खरंतर माझ्यासारख्या खतरों के खिलाडीच्या आयुष्यातच रोमहर्षक की काय ते प्रसंग जास्त यायची शक्यता आहे. त्यामुळे ते वाचायचे कुतुहल लोकांना नक्कीच असणार. असो. ह्या माझ्या संक्षिप्त आत्मचरित्राचे संक्षिप्त मनोगत इथेच संपवतो.

*****

## पाळण्यातले पाय

माझा जन्म १९६५ चा. माझ्या आधीच्या ६ भावंडांनी वापरल्यामुळे असेल पण माझ्यासाठी चोरबाजारातून नवा पाळणा मागवावा लागला. त्या चोरबाजारातील पाळण्याचा गुण लागूनच हा आजचा मन्या घांग्रे बनला असावा. तसे माझे पाळण्यातील पाय दिसायला दुसरीपर्यंत थांबावे लागले. आमच्या म्युनिसिपालटी शाळेत एक मुलगा सुगंधी खोड रबर आणायचा. त्याचे नाव आता आठवत नाही पण माझे पहिले हस्त कौशल्य मी तो रबर पळवण्यात दाखवले. पुढे पाचवी पर्यंत प्रगती झाली. त्या वर्षांत कोणाचे पेन तर कोणाचा कंपास पळव, पुस्तक नाही तर वही पळव, खाण्याचा डबा चोर असे अनेक उद्योग केले. चोरण्याच्या कलेत मी चांगलाच पारंगत व्हायला लागलो. परिणाम व्हायचा तोच झाला. पाचवीत शाळेतून बाहेर पडावे लागले. अर्थात एक बरे होते. माझ्यामागे इतक्या वर्षात आणखी ५ भावंडे जमा झाली होती त्यामुळे माझ्याकडे लक्ष द्यायला वेळ कोणाकडे होता? आणि माझ्या गरजा बाहेरच्या बाहेरच मी पुरवत असल्यामुळे आईबापांना माझी काहीच काळजी नव्हती. त्यामुळे मी शाळेत गेलो काय की शाळेतून बाहेर काढला गेलो काय त्यांना त्यात काहीच फरक पडत नव्हता.या दिवसांनीच माझ्या पुढच्या आयुष्याचा पाया घातला.

## पाकिटमारीचे दिवस

शाळेतून काढून टाकणे माझ्या पथ्यावरच पडले. शाळेच्या चार भिंतींपेक्षा मोठा परिसर मला माझ्या साठी मिळाला. शाळेत असतानाच पाकिटमारीची सवय मला होती. त्यात सफाई आणण्यासाठी मी खूप मेहेनत करीत असे. या फिल्ड मध्ये प्रॅक्टीकल महत्त्वाचे. त्यासाठी भरपूर मेहनतीची माझी तयारी होती. देव पण कोणाच्या हातात काय कला देतो पहा. माझ्या हाताची सफाई अशी होती की कोणालाही त्याचे पाकीट गेल्याचा साधा संशय सुद्धा येत नसे. कोणाला इजा होऊ नये म्हणून मी काळजीपूर्वक पाकीट मारीत असे. शक्यतो ब्लेड न वापरण्याकडेच माझा कल होता. एखाद्या डॉक्टरचा हात चांगला आहे अशी त्याला प्रसिद्धी मिळावी तसा आमच्या लाईनीत मी लवकरच फेमस झालो. पहिल्या पाच सहा वर्षात तर मी कधीच पकडला

गेलो नाही. मध्ये मला पक्या पोवळे नावाचा जिवलग मित्र मिळाला होता आणि आम्ही दोघे मिळून रेल्वे,बसेस,देवळे वगैरे गर्दीच्या ठिकाणी धूमाकूळ घालत होतो.

त्या दिवसांत सिनेमाची तिकिटे ब्लॅक मध्ये विकण्याचा धंदा तेजीत होता. पाकीटमारी पेक्षा इथे रिस्क जास्त पण पैसे पण चांगले मिळायचे. पण पोलिसांकडे नेहेमी लक्ष ठेवून राहायला लागायचे. अर्थात रिस्क तर सगळीकडेच असते म्हणून काय आपण घाबरून जगणं थोडीच सोडून देतो? उलट रिस्क जेव्हढी जास्त तेव्हढी कमाई जास्त हे मी ह्या लाईनीत शिकलो.

साधारणत: १५-१६ वर्षांचा असताना मी पाकीट मारताना पहिल्यांदाच पकडला गेलो. पब्लिक हात धुवून घ्यायला लागले. आधीच मी बारीक त्यात देवदत्त दीनवाणा चेहेरा. मला वाटले पब्लिकला दया येईल. तेव्हढ्यात एकाएकी मार थांबला. मी पाहिले तर दोन हवालदार येत होते. हा माझा पोलिसांशी पहिला संबंध. इकडे पक्याने काय केले की त्याची सायकलच दोन जणांच्या अंगावर घातली. ती दोघे ओरडायला लागली तसे पब्लिकचे ध्यान तिकडे. हवालदार मला सोडून त्याच्या मागे धावले आणि मी पण तिकडून पळालो. पक्या त्याच्या सायकलीवर पसार. तो सायकलींग एक्स्पर्ट कसला कोणाच्या हाती लागतोय. जिवलग मित्र असावा तर असा. पुढे पोलिस चौकीशी संबंध यायला आणखी ५-६ वर्ष गेली. त्या दिवशी पब्लिकने पकडले त्याच दिवशी सकाळी मी पक्याला म्हटले होते,

’यार पक्या, या पाकिटमारीत मजा नाही, कुछ नया करते हैं’

त्यावर पक्या भडकला”

’तुला मन्या सुख बघवत नाही, पोटाला देणाऱ्या धंद्याची बदनामी करतोस?’

मी म्हटले,

’अरे काही challenging पाहिजे की नको?’

’धंद्याची बेईमानी करतोस? घंटाई देवी तुला शिक्षा दिल्याशिवाय राहाणार नाही बघ.’

संध्याकाळी मग पक्या म्हणालाच,

’पहा घंटाईने शिक्षा दिली की नाही?’

गावच्या घंटाई देवीचे आम्ही परमभक्त. दर वर्षी ५ दिवस आम्ही धंदा बंद करून आम्ही देवीच्या जत्रेत जात असू.अर्थात तिकडे जत्रेतल्या गर्दीत थोडीफार कमाई होत असेच. सुटी म्हटली तरी हात शिवशिवायचे थांबतात थोडीच?

पुढे ४-५ वर्षे अशीच गेली. मधे काही दिवस बायकांच्या गळ्यातील चेन खेचायचा धंदा केला. पळत पळत येऊन चेन खेचायची आणि पसार व्हायचे. आमचा अगदी हातखंडा. आहे हे कौशल्याचे काम, रिस्क पण खूप पण कमाई पण चांगली. पण लोकांची नीयत पण बरोबर नाही, दिखाव्यापुरत्या खोट्या चेन घालतात. म्हणजे आपली सर्व मेहेनत वाया.खऱ्याची दुनिया राहिली नाही हेच खरे. काही दिवसांनी काय झाले की एके दिवशी एका बाईची चेन खेचून पळालो. थोड्यावेळानी साळसूदपणे परत आलो तर ती बाई तिथेच रडत बसली होती.आज पर्यंत कोणाचे पाकीट मारल्यावर मागे कधीच वळून पाहिले नव्हते. त्या बाईला रडताना पाहून मी पक्याला म्हटले
’आज पासून ही चेन चोरी बंद’ माझ्या स्वभावातच कुठे तरी हा दयाळूपणा असावा. मारलेली पाकीटे पण पैसे काढून मी माझ्या खर्चाने पोष्टाने पाठवत असे. पुढे माझ्या वेदनारहित दरोड्यांचा उगम येथे असावा कदाचित.
पक्या यावर पण चिडला, ’घंटाई तुला माफ करणार नाही बघ.’
झालंही तसंच. काही दिवस पोलिस स्टेशनची हवा खावी लागली. कोठडीत मात्र काही नवीन मित्र मिळाले. काही सराईत गुंडांची ओळख झाली. मला माझ्या पुढच्या प्रवासाचा विचार करायला वाटावा अशीच ती पोलिस कोठडीतली शिक्षा होती. बाहेर सोडताना इन्स्पेक्टर यादव चिकार मोठे लेक्चर देत होते तेव्हा मी भविष्यातले प्लॅन बनवत होतो. पोलिस कोठडी आणि जेल मला वाटत आमच्या लाईनीत पुढच्या शिक्षणाचे भाग आहेत. परत आलो आणि मी पाकिटमारी सोडली.
आणि घरफोडी कडे वळलो.

## घरफोडी आणि दरोडेखोरी

घरफोडी हा अत्यंत धोकादायक असा व्यवसाय आहे. त्यात मेहेनत खूप. घरादारावर लक्ष ठेवा, अचूक वेळ साधा, रात्रीचे जागरण आणि पोलिसांची नेहेमीच भीती. साधे घराच्या दाराऐवजी खिडक्यांतून जायचे यायचे, जिन्याऐवजी पायपावरून चढउतार करायची. अर्थात कमाई होते पण टेन्शन पण तेवढेच जास्त. या लाईनीत आल्यावर मी एक केलं कोणाला कधी इजा केली नाही. बेशुद्ध करण्याच्या स्प्रे मारायचा आणि शांत पणे लुटालूट करायची. उगाच मारामारी फोडाफोडी कशाला. आणि ज्याचे घर लुटायचे त्या अन्नदात्याला कशाला इजा पोहोचवा? रक्त पाहिले की मला चक्कर येते. भॊवळ येऊन पडलो तर मीच पकडलो जायचो. तसा मी चाकू आणि खेळण्यातलं पिस्तुल घेऊन जायचो पण त्यांचा उपयोग कधी मी केला नाही. वेदनारहीत घरफोडी ची कल्पना मीच प्रथम मांडली. आजवरच्या कारकीर्दीत किती पाकिटे मारली त्याचा हिशोब नाही पण आज पर्यंत एकूण ८८ घरफोड्या माझ्या नावावर आहेत.

## शुभमंगल

आमीर खानचा रंगीला पाहून आल्यावर मी पक्याला एक दिवशी म्हटले,
’यार पक्या आपुन को सेट्ल होने को मंगता. जल्दीही शादी बनानेको मंगता’
पक्या बोलला, ’चल उडवून टाकू बार’
आमच्यासारख्या होनहार मुलांकडे खूप सार्यांचे लक्ष असणारच. पण मला विक्रोळी स्टेशनावर पाकीट मारणारी हेमा आवडली हॊती. मध्ये मी घरफोडी सुरू केल्याने तिला पण माझ्याबद्द्ल आदर वाटत असावा. थोड्याच दिवसात आमचे लग्न झाले. पक्याचे पण झाले त्याच मंडपात. लग्नाला झाडून सारी पाकीटमार,दरोडेखोर मंडळी आली होती. या लाईनीत माझी वटच तशी होती. लग्नानंतर हेमाने आपले करियर सोडून घरी बसायचा निर्णय घेतला. दोन मुलं झाली त्यांच्याकडे लक्ष द्यायला. मुलं शिकायला पाहिजेत असं आम्हा दोघांना पण वाटतं. त्यांनी या लाईनीत येऊ नये असे वाटते कारण ही फार कष्टाची लाईन आहे. वेळेचा काही भरवसा नाही. रात्री जागरणं होतात. लोकं शांत पणे झोपतात तेव्हा आम्हाला जिवावर उदार होऊन कामावर जायला लागते.

बाकी गँग वाल्यांशी आणि पोलिसांशी चांगले संबंध ठेवावे लागतात. एव्हढे सगळे मुलांना जमेलसे वाटत नाही. बघू अजून लहान आहेत.

चोर संमेलन

लग्नात एव्हढे सारे लोकं आले ते पाहून मला वाटलं की हे क्षेत्र किती असंघटित आहे. पुढे काही वर्षांनी म्हणून मी अखिल भारतीय चौर्यकर्मी संघटना बनवली. मी सेक्रेटरी आणि डाकू पूरणसिंग अध्यक्ष. मध्ये जेलात असताना पुरणसिंगशी चांगलीच ओळख झाली होती.

पक्याला म्हटले, 'यार पक्या नवीन काही करुयात रे.'

पक्या म्हणाला, 'मन्या असे बोलू नकोस जाशील नाहीतर जेलमध्ये'

मी म्हटले, 'त्यात एवढे वाईट काय आहे? नवीन नवीन शिकायची आपली ती शाळा आहे.'

त्यावर पक्याच्या डोक्यात आयडिया आली,"अरे आपण सर्व चोर डाकू वगैरेंचे संमेलन भरवू. म्हणजे सर्वांनाच काहीना काही शिकता येईल. तू आयोजक, पुरणसिंगला अध्यक्ष बनवू.'

पक्याला भन्नाट आयडिया सुचतात. तो खरंच माझा नुसताच मित्र नाही तर आमच्या छोट्या टोळीचा मेंदूच आहे.

मग आम्ही त्या कामाला लागलो. सर्व महाराष्ट्रातील पाकिटमार,भुरटे चोर, डाकू, दरोडेखोर, स्मगलर यांना गुप्त आमंत्रणे गेली. पाचगणी जवळच्या जंगलात २ दिवसांचे मस्त संमेलन झाले. पुरणसिंग त्याच्या भाषेत बोलला. वेदनारहित दरोड्यांवर मी बोललो तसा लंगडा सलीम उखडला. खून खराब्याशिवाय आपली इज्जत राहणार नाही म्हणाला.अमर गँग च्या म्होरक्याचे बँक लुटण्यावर भाषण झाले. एकूण सर्व नीट झाले.

बँक लुटण्याची कथा

संमेलनानंतर पक्याच्या डोक्यात बँक रॉबरीचा कीडा वळवळत होता. बँक लुटायची म्हणजे खून खराबा. मला ते अजिबात आवडायचे नाही. शेवटी पक्याने घंटाई देवीची शपथ घातली म्हणून तयार झालो.मोठी लुटूया की कोऑपरेटीव ठरत नव्हते. मी म्हटले पतपेढी लुटू तर पक्या उखडला. म्हणाला, एव्हढी मेहनत काही लाखांसाठी, तू एकटाच जा. शेवटी नाक्यावरची कोऑपरेटीव्ह बँक ठरवली. तिच्यात एक म्हातारा वॉचमन असायचा तोही बिन बंदुकीचा. दुपारी बँकेचे अर्ध शटर खाली आणि पब्लिकला २ तासांसाठी बंदी. एखादा दरोडा घालायचा म्हणजे नीट नियोजन लागते म्हणजे तो फसण्याची शक्यता कमी. उद्या दुपारी काम फत्ते करू म्हणून घरी गेलो तर त्याच दिवशी दुसऱ्या कुणी गँगनी तीच बँक लुटली. आम्ही डोक्यावर हात मारला. एव्हढ्या दिवसांची मेहनत पाण्यात. पक्या म्हणाला काय कॉंपिटीशन वाढलीय सगळीकडे. नंतर तो बँक लुटीचा प्लॅन बारगळला तो बारगळलाच. अजून ही काही तरी करायची इच्छा मात्र आहे. पाहू कधी योग येतोय तो. मला वाटते एकतरी बँक रॉबरी आपल्या बायोडाटात हवीच.

## भविष्याचा वेध

आज माझी जवळ जवळ पन्नाशी येऊन ठेपली. खूप कष्ट केले,मेहेनत केली. कधी मधे जेलात जाऊन नवी विद्या आत्मसात केली.आपल्या लाईनीत माझी चांगलीच वट आहे. कोणाला पटो न पटो वेदनारहीत दरोड्यांची कल्पना माझ्या नावावर आहे. पोलिसांत चांगल्या ओळखी आहेत. आज खाऊन पिऊन मी सुखी आहे. हवे असेल तेव्हा कामातून सुट्टी घेणं पण परवडू शकतं. पक्या सारखा जिवलग दोस्त आहे. सुरूवातीला पक्या नि मी दोघेच होतो आता हाताशी ४ तरूण मुले आहेत. छोटीशी का होईना मन्या गँग आहे. आई घंटाई देवीची कृपा आहे.

पक्याला एकदा मी म्हटले, 'यार नवीन काहीतरी करू. आपण असे करूया डाकू बनूयात. मस्त पैकी घोड्यावर येऊ गावं लूटू. ४-५ वर्षांनी शरण येऊ तर सारी पापं माफ. रिटायरमेंट ची सोय होईल.'

पक्या ने एखाद्या वेड्या कडे पाहावे तसे पाहिले. 'मन्या तू ना बावळट आहेस.'
ह्या मन्या गँगच्या म्होरक्याला बावळट म्हणायची हिंमत फक्त पक्याच करू शकतो.
'अरे डाकू बनायची फॅशन आता गेली. आता कुणी स्मगलर पण होत नाहीत. रिटायर्मेंट ची काळजी आहे तर नगरसेवक बन ना. अरे राजकारणात जा. तुझ्या सारख्या तरूणांची आज देशाला गरज आहे.'
'मी आणि तरूण?'
'अरे हेच वय आहे राजकारणात जायचे. अरे गरज फक्त तुलाच नाही काही. त्यांना पण अशी डेअरींग बाज माणसे लागतात. आज नगरसेवक उद्या आमदार, नशीब असेल तर परवा शिक्षण मंत्री'
'मी आणि शिक्षण मंत्री? मी तर पाचवी पण पास नाही झालोय.'
'म्हणून तर. जे शिकलेले आहेत ना त्यांना शिक्षणाची किंमत कळत नाही. तू शिक्षण मंत्री म्हणून आदर्श होशील.'
मला पक्याचे पटले. पक्या आहेच हुशार म्हणा. माझ्या डोळया समोर लाल दिव्यांची गाडी आली. म्हटले उद्याच आमदारांना भेटू. महापालिका निवडणुका जवळच आहेत. उद्या घंटाई कृपेने खरच मंत्री बिंत्री झालो तर 'वाल्याचा वाल्मिकी' असा आत्मचरित्र पार्ट टू लिहिता येईल.

आमचा धंदा: एक चिंतन

आज मी या धंद्यात गेली ४० वर्ष आहे. आम्हाला लहान पणी मार्गदर्शन मिळाले नाही. आपल्याच चुकांतून शिकत आम्ही मोठे झालो. नशिबाची साथ मिळाली आणि आई घंटाई देवीचा आशिर्वाद मिळाला आणि मी येथवर येऊन पोहोचलो. पाकिटमारी,भुरटी चोरी,जबरी चोरी, घरफोडी,दरोडे, डाके, बॅंका लुटणे,स्मगलिंग अशी कित्येक क्षेत्रे या लायनीत आहेत. मेहेनत सगळीकडेच आहे. डेअरिंग लागते,प्रसंगावधान लागते, समोरच्याला हसता हसता फसवता यावे लागते,या करता थोडे अॅक्टिंग पण लागते. या सर्वांची नीट तयारी करावी लागते. नेहेमी सतर्क रहावे लागते. पोलिसांशी आणि इतर गॅंग शी चांगले संबंध ठेवावे लागतात. एखादा दरोडा घालायचा तर १-२

आठवड्यांचे नियोजन लागते. इतके सर्व करून किमान सुरूवातीत तरी नशिबाची साथ लागते.

माझ्या मुलांनी या धंद्यात येऊ नये असे वाटते. मी अडाणी राहिलो तसे त्यांनी राहू नये म्हणून हेमानी आपली चांगली करियर सोडली. मुलांनी खूप शिकावे मोठे व्हावे. सूट-बूट आणि टाय लावून एसी ऑफिसात बसून इंग्लिश मध्ये यस फिस्स करावे. आजकाल म्हणे बॅंकेत न जाताच बॅंकेची कामे करता येतात. तर त्यांनी पक्या म्हणतो त्याप्रमाणे सायबर क्राईम मध्ये स्पेशलायझेशन करावे आणि प्रत्यक्ष मैदानात न उतरता ते आमचे बॅंकेच्या लुटीचे स्वप्न साकार करावे. सुटा बुटात आणि चार इंग्लिश वाक्ये झाडत केलेल्या गुन्ह्यांना आपल्या देशात खूपच प्रतिष्टा आहे. आणि काळाप्रमाणे बदलावे लागणारच ना माणसाला.

५

**वर्तमानपत्रे नि वाचकांची पत्रे एक अविभाज्य भाग आहे ! एका अति सक्रिय पत्रलेखिकेने त्यातून एका पुस्तकाची निर्मिती केली ! ठाम्मत नावाने ही पत्रे प्रसिद्ध होताहेत ! आणि तीन पत्रे ही पेपरात आलेली अनावृत्त पत्रे !**

- **'ठाम्मत' या संग्रहाच्या प्रकाशना निमित्ताने**
- **तीन पत्रे**

## ’ठाम्मत’ या संग्रहाच्या प्रकाशना निमित्ताने

अनसूया सरपोतदार हे नाव ’दैनिक विश्ववार्ता’ च्या वाचकांना नवीन नाही. अनसूयाबाईंना आपली मते असतात आणि ती मांडावयास त्या कचरत नाहीत. आपल्या मतावर त्या नेहमीच ठाम असतात. जोपर्यंत त्यांचे स्वत:चे मतपरिवर्तन होत नाही तो पर्यंत तरी. त्या चौफेर वाचन करतात. दिवसभरात विश्ववार्ताच्या चारी पानातील बातमी न बातमी त्या वाचतात. त्यांना त्यामुळे स्वत:चे असे मत प्रत्येक बाबतीत असते. बदले पर्यंत त्या ती आपली अधिकृत भूमिका आहे असे सांगतात. आजच्या अनधिकृत पणाच्या जमान्यात ही अधिकृतता उठून दिसते. आपली मते लिहून छापून आणणॆ हा त्यांचा छंदच.  ’दैनिक विश्ववार्ता’चे संपादक श्री. भाऊराव लाड हे त्यांचे सख्खे मामा. त्यामुळे त्यांना मत मांडावयास हक्काचे व्यासपीठ मिळाले. गेल्या पाच वर्षात एकही आठवडा असा नसेल की ज्यात विश्ववार्तातील ’ठाम मत’ या वाचकांच्या पत्रांच्या सदरात अनसूयाबाईंचे पत्र प्रकाशित झाले नसेल. कधी कधी दररोज एक या गतीनेही ती छापून येतात. विश्ववार्ताकारांचा त्यांच्यावर इतका विश्वास की त्यांची पत्रे ते डोळे झाकून छापतात. यात काही कॉलम सेंटीमीटरचीही सोय होते. शेवटी सहकारानेच उद्धार कसा होतो हे आपल्या महाराष्ट्रात सर्वांनीच पाहिले आहे. अनसूयाबाईंच्या या पत्रांचा संग्रह ’ठाम्मत’ या नावाने विश्ववार्ता प्रकाशन मोठ्या झोकात प्रकाशित करणार आहे. त्यांची काही गाजलेली पत्रे आम्ही इथे पुन:प्रकाशित करीत आहोत.

<u>हवामान खात्याचा गलथान कारभार</u>

या वर्षी जुलै उलटून गेला तरी पावसाचा पत्ता नाही. तुरळक पावसाने दुष्काळाचे संकट जाणवते आहे. अधून मधून काळे ढग जमून येतात. आणि न पडता निघून जातात. त्यांच्या वर हवामान खात्याचे काहीच नियंत्रण नाही काय? उद्या अवर्षणाने महाराष्ट्र ग्रासला तर याची जबाबदारी हवामान खाते घेईल काय? ढगांवर कारवाई न करणार्या अधिकार्यांवर गलथान कारभारासाठी कारवाई करणे गरजेचे आहे. मुख्यमंत्री यात लक्ष घालतील काय?

<u>पाणी टंचाई आणि भाषासुधाराची गरज</u>

आपल्या राज्यात विशेषत: ग्रामीण भागात पाण्याची टंचाई जाणवत असते. पाणी टंचाई दिवसेंदिवस वाढतच आहे. पाणी इज अ लिमिटेड रिसोर्स असे म्हणतात. पाण्यावरून तिसरे महायुद्ध होण्याची शक्यता आहे. असे असताना मराठी भाषेत 'पाण्यासारखा पैसा खर्च करणे' असा वाक्प्रचार कसा काय वापरात येऊ शकतो? आपल्या लहान मुलांना आपण हीच शिकवणूक देणार आहोत का की पाणी ही वाहवण्याची गोष्ट आहे? महाराष्ट्र साहित्य परिषद याबाबत काही करेल का? त्यामुळे गावागावातील पाणी टंचाई कमी होण्यास मदत होईल.

<u>समुद्राच्या पाण्याचा पिण्यासाठी वापर</u>

समुद्राचे पाणी गोडे करून पिण्यासाठी वापरणार हे वृत्त वाचले. समुद्रात आज अथांग पाणी आहे हे खरे पण कुठलीच गोष्ट या जगात अमर्यादित नाही त्यामुळे उद्या या प्रकल्पांमुळे समुद्र आटण्याचा धोका संभवू शकतो हा इशारा आपण आजच देऊन ठेवलेला बरे.

<u>सचिनच्या कौतुकामागची गोष्ट</u>

कालच आमच्या सोसायटीत क्रिकेट खेळणार्या मुलांनी बॉलने खिडकीच्या काचा फोडल्या. आज विचार येतो सचिन तेंडुलकर लहान असताना अशीच सिक्सर मारून काचा फोडत असेल काय? जेव्हा तो आजचा सचिन नव्हता तेव्हा त्याच्या काचा फोडण्याबद्दल त्याच्या बिल्डिंगीतील लोक काय म्हणत असावेत? आज मात्र कदाचित ते जुने काचेचे तुकडे ते सचिनने फोडलेल्या काचा म्हणून अभिमानाने दाखवण्याची शक्यताच जास्त.

<u>पेपरलेस सरकार</u>

सरकारने इ गव्हर्नेन्सची घोषणा केली आहे. सरकारी कार्यालये पेपरलेस ऑफिसेस बनणार आहेत. सर्वसामान्यास मात्र एवढेच माहिती हवे की पेपरलेस म्हणजे कागदी नोटांचीही गरज या ऑफिसांत पडणार नाही काय? ही कार्यालये खर्या अर्थाने भ्रष्टाचार मुक्त होतील का?

<u>दहावीचा कठीण पेपर</u>

यावर्षी दहावीचा गणिताचा पेपर कठीण असल्याबद्दल पेपरात ओरडा होत आहे. दरवर्षीच असे होत असते. यावेळी माझ्या आजोबांची आठवण येते. नीट अभ्यास करणे महत्त्वाचे हे सांगताना ते म्हणत, ढोपर फुटले तर पेपरावर खापर फोडू नये !

ओबामांस इशारा

बराक ओबामा अमेरिकेचे अध्यक्ष म्हणून निवडून आले. त्यांचे अभिनंदन करण्याआधी त्यांना एक इशारा देऊन ठेवते. त्यांनी अमेरिकेचे पाकिस्तान धार्जिणे धोरण सोडावे आणि भारतास पाठिंबा द्यावा. माझे जवळील काही नातलग अमेरिकेत असून त्यांनी ओबामांस मतदान केले आहे. ओबामांनी भारताबद्दलचे धोरण न बदलल्यास माझ्या नातलगांस पुढच्या निवडणूकीत ओबामाविरोधी मतदान करण्यास मी भाग पाडीन. अभिनंदन करतानाच हा इशारा मी आजच देऊन ठेवत आहे.

महाराष्ट्रातील स्थलांतरितांच्या समस्या

’येवा, महाराष्ट्र आपलाच असां’ म्हणत आपण युपी, बिहारींचे नेहमीच स्वागत केले आहे. महाराष्ट्रात दर दहा मैलावर मराठीबोली बदलते म्हणतात. असे असताना आपल्या हिंदीभाषी बांधवांस ती समजणॆ कष्टाचे पडते. तेव्हा संपूर्ण महाराष्ट्र भर एकच प्रमाण भाषा बोलण्याची सक्ती करावी अथवा हिंदीस राज्याभाषा बनवावे अशी सूचना आहे. अतिथी देवो भव: हे विसरून चालणार नाही.

महाराष्टातील स्थलांतरितांस समज

प्रगत महाराष्ट्रात येणार्या लोंढ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यांस साधे मराठीदेखील समजत नाही. आपल्या लोकांनी त्यांच्याशी हिंदीतच बोलावे ही त्यांची अपेक्षा असते. अतिथी देवो भव: हे ठीक पण शेवटी त्यांनी अतिथीप्रमाणे चार दिवस राहून निघून जावे हे बरे. आपण आपली भाषिक अस्मिता जपलीच पाहिजे.

जागतिक प्राणिदिना निमिताने

आपल्याकडे एखाद्या मूर्ख माणसास गाढव म्हणण्याची पद्धत आहे. निर्बुद्धपणाचे गाढवाशी नाते जोडले गेले आहे. याविरूद्ध विश्व गर्दभ समितीने निषेध नोंदवल्यास आपली तयारी आहे काय? महाराष्ट्र साहित्य परिषदेने या विरूद्ध ठराव केल्याचे ऐकिवात नाही. भाषा सुधाराची आज गरज आहे. कुत्र्यासारखे भुंकणे, कोल्ह्यासारखा

धूर्त, लबाड लांडगा, मांजरीसारखे डोळे मिटून दूध पिणे अशा वाक्पचारांवर बंदी आणण्याची आज नितांत गरज आहे. पण म.सा.प. चे लक्ष कुठे आहे?

<u>वाघ बचाओ</u>

आज वाघ बचाओ हा नारा दिला जात आहे. काही सेलिब्रिटी देखील यात सामील आहेत. मला असे वाटते की प्रत्यक्ष वाघाने याबद्दल कधीच काही सांगितले नाही. तर आपण वाघांस वाचवायचे म्हटले तरी जोपर्यंत स्वत: वाघांसच आपल्या जातीची काळजी नाही तोपर्यंत आपले प्रयत्न पुरेसे पडणार नाहीत. मागे डायनोसॉर असेच नामशेष झाले होते हे वाघांनी लक्षात ठेवावे.

<u>मराठी साहित्यात रहस्यकथांचा अभाव</u>

आपले मराठी साहित्य समृद्ध आहे पण आजकाल कोणी लेखक रहस्यकथा किंवा कादंब-या लिहीत नाहीत. अर्नाळकर आणि धारपांनंतर ताकदीचे रहस्यमय लेखन करणारे कोणी नजरेत दिसत नाहीत. लवकरच साहित्य संमेलन भरत आहे त्यात याचा विचार करावा असे सुचवावेसे वाटते. रहस्य साहित्याचा अनुशेष भरून काढायचे कोणी मनावर घेईल काय?

<u>टीव्ही वरील मराठी सिरियल्स</u>

आजकालच्या टीव्हीवरील मराठी मालिका अत्यंत उद्बोधक आहेत. लोकशिक्षणाच्या दृष्टीतून मालिकांतून जे दाखवले जाते त्याने आपला क्षोभ कसा व्यक्त करावा याचे लोक शिक्षण होत आहे. सासू सुनेला मारण्यासाठी गॅसचे बटण उघडे ठेवते, किंवा फेस क्रीमच्या बाटलीतून ॲसिड भरले जाते अशा नामी कल्पना दाखवून लोकांस त्याबद्दल विचार करण्यास प्रवृत्त केले जात आहे. याहून ही कल्पक उपायांकरता चॅनेल्सने अशा उपायांसाठी सर्व प्रेक्षकांसाठी स्पर्धा आयोजित करावी. आपल्या महाराष्ट्रात अशा स्पर्धेस प्रचंड प्रतिसाद मिळेल याची खात्री वाटते. कोणास हे आपत्तीजनक वाटत असेल पण आपल्या रागाचा योग्य निचरा करणे ही आपल्या आरोग्याची गुरूकिल्ली आहे हे लक्षात घेतल्यास याचे महत्त्व ध्यानी येईल.

<u>सोन्याचे चढे भाव</u>

वाढत्या महागाईने लोकांचे कंबरडे मोडले आहे. त्यात आता सोन्याचांदीचे भाव सतत वाढतच चालले आहेत. या विक्रमी वाढीने सोने मध्यमवर्गाच्या आवाक्याबाहेर जात

आहे. अशा जीवनावश्यक गोष्टींच्या भावावर नियंत्रण सरकारने ठेवणे आवश्यक आहे. आम आदमीच्या नावावर सत्तेत येणारी सरकारे तरी याकडे लक्ष देतील काय?

उपोषण : सरकारी आणि सक्तीचे

एका मंत्र्यांनी आपल्याच सरकारच्या धोरणा विरूद्ध काही तासांचे उपोषण केले. एरव्ही उपोषणाने एखाद्याची शारिरीक प्रकृती बिघडते. पण मंत्र्यांची राजकीय प्रकृती मात्र त्यांच्या उपोषणाने सुधारली असेल. गरिबांस रोजच सक्तीचे उपोषण घडत असते पण मंत्रीमहोदयांसारख्यांसाठी हे फारच कठीण आहे. ते त्यांनी साधले त्यामुळे त्यांना त्याचा फायदा होईलच.

प्राणिमित्रांना आवाहन

आजकाल प्राणीमित्र होण्याची जणू फॅशनच झाली आहे. त्यामुळे मोकाट सुटलेल्या कुत्र्यांकडॆ कोणाचे लक्ष नाही. रात्री कोणी कुत्र्यांपासून सुरक्षित राहून घरी पोहोचणे कठीण झाले आहे. माझे आव्हान या प्राणिमित्रांस असे आहे की त्यांनी आपल्या घरातील कीडे, मुंगी, डास, झुरळे यांना देखील मारू नये. डासांना चावण्यासाठी सोपे जावे व त्यांना पुरेसा आहार मिळावा म्हणून उघड्यावर झोपावे. माशांकरता आपले अन्न उघडेच ठेवावे. हात धुतल्यास जंतूंचा नायनाट होऊ शकतो. विविध आजार जीवजंतूंमुळे होतात त्यांना आटोक्यात आणण्यास औषधे दिली जातात. त्यांनीही या जंतूंचा नाश होतो. या मुक्या जंतूंवर दया दाखवून हात धुण्याचे टाळावे आणि अशी औषधे घ्यायचे ही टाळावे. इतके तरी हे प्राणिमित्र करून दाखवतील काय?

नेत्यांनी वानप्रस्थाश्रम स्वीकारावा

आज आपल्या देशातील सरकार आपल्या संस्कृतीचे गोडवे गात आहे. सर्वांसच त्या संस्कृतीचा अभिमान आहे. नेते मंडळी उठसूट ते जुने दाखले देतात. पण यांचे नेतृत्व करणारे वरिष्ठ आज पंच्चाहत्तरी ओलांडलेले आहेत. आपल्या त्याच संस्कृतीचा आदर करून त्यांनी वानप्रस्थाश्रम स्वीकारला तर ते या पक्षांस शोभून दिसेल.

लोकनेते सरखेल सरपोतदारांचे निधन

सुप्रसिद्ध लोकनेते श्री. सरखेल सरपोतदारांचे निधन दु:खदायक आहे. वयाच्या सत्त्याऎंशीव्या वर्षी मुख्यमंत्री बनण्याची आस मनी ठेऊन ते गेले. त्यांच्या भूमिकांना

प्रतिगामी मानले गेले, त्यांच्या कित्येक वक्तव्यांनी गोंधळ उडाला. आपली मते ठामपणे न घाबरता मांडणारा नेता आजच्या काळात विरळा. स्त्री शिक्षणास त्यांनी केलेला उघड विरोध किंवा मुलगा हाच वंशाचा दिवा अशा काही भूमिकांनी रण माजले तरी त्यामुळे समाजात एक प्रकारची वैचारिक घुसळण झाली हे नाकारता येणार नाही. या दृष्टीने पाहिल्यास त्यांनी समाजावर उपकारच केले असे म्हणता येईल. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.

अशी ही अनसूयाबाईंची विविध विषयांवरील पत्रे. यात त्यांना कोणताही विषय वर्ज्य नाही. कालानुसार काही मते बदलतही असतील पण त्या त्या वेळी ही ठाम मतेच असतात. त्यांचा हा संग्रह 'ठाम्मत' लवकरच प्रकाशित होत आहे. नोंदणी साठी आमच्या 'विश्ववार्ता'च्या कार्यालयाशी संपर्क साधावा.

## तीन पत्रे

१.

सत्तासुंदरीचे मतदारराजास पत्र

प्राणप्रिय मातकट माकडा,

खूप दिवस झाले तुला भेटून. दर पाच वर्षांचा विरह सहन करून तुला भेटायला किती उत्सुक असते मी म्हणून सांगू. तू आणि मी यांचे नाते काही अजबच आहे. मी कोणाच्या गळयात माळ घालावी हे तू सांगतोस माझ्या गुलाबी गुलामा आणि मी ते निमूटपणे मान्य करते. तू मला प्रिय आहेस नि तुझ्याशिवाय मी कोणाला वरावे हे मला कसे समजेल? तेव्हा माझ्या पोपटी पोपटा आणि मोरपिशी मोरा, मी येतेय तुला भेटायला. तू सुद्धा मला भेटायला आतुर आहेस ना रे माझ्या औटघटकेच्या राजा? होय, राजाच तू. औटघटकेचा म्हटले म्हणून रागावला नाहीस ना गुलामा? तू राजा आणि गुलाम एकाचवेळी आहेस हेच तर आपल्या लोकशाहीचे वैशिष्ट्य आहे ना गडबड गुलामा? अर्थात मी तुला काय सांगणार? तू हुशार आहेस, चतुर आहेस. तुझे राज्य घटकेत खालसा होणार हे माहित असूनही मिळालेल्या काही तासांच्या वेळात तू राज्य करूनच घेतोस. माझ्या अक्कलवान राजा, तेव्हा तू गुरकावणारा वाघ वाटतोस आणि मी कोणाला माळ घातली की तुझा भित्र ससुला का बरे होतो रे माझ्या सुंदर उंदिरा? माझ्या सावळया बावळया नि माझ्या बावळट बैतान्या. तू तसा हुशार असलास तरी तुला फसवता येते हे माहितेय मला. तुला झुलवणे नि तुझ्याकडून स्वत:च्या चिन्हावर ठसा उमटवून घेणे हा कित्येकांच्या हातचा मळ. कधी तू भुलतोस तर कधी नाही. म्हणूनच तर तू कधी भटक भवान्या वाटतोस तर कधी सटक सुभान्या. असे असले तरी या लोकशाहीत तुझ्यावाचून मी अपूर्ण आहे रे माझ्या कळकट काळुंद्र्या. काळुंद्र्या म्हणाले म्हणून रागावू नकोस माझ्या मर्कटा. आणि रागावलास तरी जाशील कोठे ? शेवटी गाठ माझ्याशीच आहे ना उंदरा? म्हणून तर मी तुला नि तू मला भेटायला एवढा उत्सुक असतो हो की नाही? मी लवकरच येतेय माझ्या माकडा. तयार रहा नि तयारीतही रहा.

या दिवसापुरतीच तरी तुझीच,

सत्तादेवी

२.

मतदारराजाचे आमदार उमेदवारास पत्र

सत्तादेवीचे पत्र पावले. किती प्रेम उतू जातेय तिचे सांगू? मला भेटायला ती आतुर झालीय. ती कोणाला माळ घालेल हे मीच ठरवणार नेहमीप्रमाणे. ती माझ्या शब्दाबाहेर नाही म्हणे. मागच्या वेळेस तिने तुम्हालाच माळ घातली होती हे मला आज आठवले तुमचा पेपरातला फोटो पाहून. तसे मला ते जाता येता आपल्या रस्त्याच्या मध्यभागी फुटलेलेल्या गटाराच्या झाकणावरचा बोर्ड वाचूनही तुमचे नाव आठवते. किती डौलदार पाटी आहे, 'आमदार रघुनाथदादा भुसनळे यांच्या आमदार निधीतून.' तुमचे कामच अगदी पक्के. त्यामुळे ते गटाराचे झाकण परत फुटले पण तुमचा तो झाकणावरचा बोर्ड अजूनही टिकून आहे आमदार साहेब. कितीही भररस्त्यात तो बोर्ड असो किंवा कितीही वाहतुकीला अडथळा त्याने येवो, तो बोर्ड मात्र अजूनही तसाच तुमच्या कर्तृत्वाची साक्ष देत उभा आहे. तुम्ही गेल्या पाच वर्षांत किती बिझी होतात याचा अंदाज मला आहे. निवडून गेल्यावर त्यामुळे आताच मी तुमचे दर्शन घेत आहे. किती ते कार्यबाहुल्य ! असा कर्तृत्ववान आमदार मिळायला भाग्य लागते. नाही म्हणायला आपल्या भागात अनधिकृत दोन बिल्डिंगी उभ्या राहिल्या तेव्हा तुम्ही जिवाच्या आकांताने चवताळून उठलात नि ती बांधकामेच असली तरी 'सारी माणसे ही देवाचीच लेकरे' त्या तालावर ' ह्या सार्‍या बिल्डिंगी माझ्याच पोरांवाणी' असे भावूक आणि बाणेदार उद्गार काढलेले आठवतात. सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण कोणी असे जिवापाड आजकाल कोणी करतो का साहेब? मध्ये कोणीतरी तुमच्या दादागिरीबद्दल बोलत होते. तुमचे नावच रघुनाथदादा आहे हे त्यांना माहित नाही का? बांधकामे असोत की हॉटेले की डान्स बार. बेकायदा असो की कायदेशीर. तुम्ही कधी त्यांना आपपर भाव नाही दाखवत साहेब. त्या सार्‍यांच्या अडचणीत तुम्हीच धावून येता ना साहेब? टगेगिरी ही राजकारणात लागतेच असे काहीतरी तुम्ही म्हणालात मध्ये आठवते मला. सत्यवादी म्हणून तुमचा कोण अभिमान मला तेव्हा वाटला सांगू? आपल्या मतदारसंघात मध्ये झोपड्या उठल्या. एक 'रघुनगरी' वसाहत रातोरात उभी राहिली. तिने मोकळ्या मैदानात बस्तान बसवले. त्याचा सर्व गरीबांस किती आधार वाटला असणार? आपल्या उंच इमारतीत राहणार्‍यांना हे कसे कळावे? तुमचे विरोधक तर याहूनही वाईट, ते त्या

दरिद्रीनारायणांना तुमची व्होट बॅंक म्हणतात. किती प्रयत्न झाले पण त्या झोपड्यांना म्हणजे गरीबखान्यांना तुम्ही संरक्षण पुरवल्यावाचून राहिला नाहीत. तुमची ही हिम्मत मला आवडते. तिथे झोपड्यातून माणसे वसत असताना तुमच्या घरावर सोन्याची कौले बसताना पाहून खरे सांगतो ऊर कसा भरून आला. लोक नि विरोधक याकडे कुत्सितपणे पाहतात. पण तुम्ही मात्र समाधानाने आपल्या राजेशाही घराकडे पाहात असाल. आता तुम्ही स्वत:च समाधानी नसाल तर इतरांना काय समाधान देऊ शकाल? तुमच्या गाड्यांबद्दलही ऐकून आहे. आधी फियाट मग सॅंट्रो वरून मर्सिडीझ कडे तुमचा होणारा प्रवास मी डोळा भरून पाहिला आहे आमदार साहेब. तुमचा हा उत्कर्ष हळूहळू तळागाळापर्यंत झिरपल्यावाचून राहू शकेल काय? खरेच आमचे नशीब थोर म्हणून तुम्ही आमचे आमदार झालात. आज सगळीकडे स्पर्धा किती वाढलीय. त्यातून तुम्हाला परत तिकीट मिळतंय, हे कर्तृत्व काय कमी आहे? तशी कार्य अहवालाची पाने मी उलटली नि माझी मलाच लाज वाटली. तुम्ही गेल्या पाच वर्षांत एवढी कामे केलीत ती ही मला दिसू नयेत? लाजिरवाणीच बाब आहे ही नाही का? काही तर तुमच्या वाढता वाढता वाढे अशा संपत्तीकडे डोळे लावून बघतात. संपत्तीसंचय करण्याचा हा मार्ग तुम्ही आखून दिलाय, तो आम्हाला मार्गदर्शक ठरावा. तुमची परत निवड झाली तर म्हणजे तशी ती होईलच, तुमचे एखाद्या छोट्या झाडातून वटवृक्षात रूपांतर होईल यात शंका नाही. नगरसेवकपदाच्या रोपट्यातून आलेल्या झाडाचा असा विकास पाहून किती अभिमान वाटतो म्हणून सांगू? तुम्ही आमदार परत व्हालच. म्हणून मीच घोषणा देऊन टाकलीय, 'येऊन येऊन येणार कोण? रघुनाथदादां शिवाय आहेच कोण?'

सदा आपल्या आशीर्वादाच्या प्रतीक्षेत,

एक मतदार ( एक दिवसीय ) राजा.

३.

आमदार उमेदवाराचे सत्तासुंदरीस पत्र

प्रियतम सत्तादेवीस,

तुझ्यापासून काही दिवसांपुरता दूर राहण्याचे दिवस आलेत. तुझी किती आठवण येतेय सांगू? आचारसंहिता लागू झाली आणि आम्ही एखाद्या पाण्यावाचून माश्यासारखे झालो आहोत. आचारसंहिता अंगात मुरलेली आहे आमच्या एखाद्या अचार सारखी. खरेच तुझ्यावाचून आम्ही म्हणजे जलबिन मछली. काही दिवसांतच परत तुझी भेट होईलच. आपल्या त्या बावळ्या मतदारास भुलवले की तू आम्हाला माळ घालशीलच. मग आपण पाच वर्षे सुखाचा संसार करायला मोकळे. आम्ही त्याचीच स्वप्ने रंगवत आहोत सुंदरी. तू पण हाच विचार करतेस ना?

तू मतदार’राजास’ पत्र लिहीलेस म्हणे. तशी नेहमीच दर पाच वर्षांनी लिहीत असशील पण त्या ’राजा’नी फारच गंभीरपणे घेतलेय सारे वाटते. स्वत:ला खरोखरचाच राजा समजू लागलाय. पण आम्ही काय तसे कमी नाही. त्याला आमच्या कार्याची भुरळ आम्ही भुरळ पाडलेली दिसतेय. आमचा कार्य अहवाल आम्ही तसाच बनवून घेतलाय ना? आजकाल मेहनतीवाचून काय होतेय? म्हणून तो पंचवर्षीय अहवाल छापून घ्यायला आमची किती मेहनत. आमदार व्हायचे म्हणजे कोण झंझटी. त्यातून कामे लक्षात ठेऊन छापून काढणे. आमदार निधी संपवणे. या टर्म मध्ये तर आम्ही किती अॅक्टिव्ह होतो. सदनात तर आम्ही एका मारामारीत सक्रिय भाग घेतला. एका मार्शलच्या थोबाडीत मारायची हिम्मत आम्ही दाखवली. शेवटी ही हिम्मत महत्त्वाची की नाही? सभात्याग तर किती केले याची गणती नाही. शेवटी जनतेचे प्रश्न सुटायची आमची तळमळ. हिम्मतीच्या जोरावर कित्येक गरीबांच्या निवासाची आम्ही सोय आजवर करवत आहोत. दरिद्रीनारायण त्या झोपड्यातून कसा राहत असेल? काहीही असो, आम्ही नेहमीच त्या झोपड्यांचे रक्षक होऊन ठाकलो आहोत. विरोधक त्यांना आमची व्होट बॅंक भलेही म्हणोत. काहींना आम्ही प्रोटेक्शन मनी गोळा करतो असे वाटते. पण आमची नीयत साफ आहे. त्यामुळे दुसऱ्या कोणाचे खिसे साफ होत असतील तर लोकप्रतिनिधी म्हणून आम्ही का पर्वा करावी? तुझ्यासारख्या सुंदरीने आम्हाला वरले ते काय उगाच?

आमची हीच तर स्टाईल आहे. आजवर ही आमदारकी झाली. नाही म्हटले तरी नुसती त्या पदाचीच पण सत्ता असते. त्यातून खरीखुरी म्हणजे लाल दिव्याच्या गाडीची सता मिळाली तर काय होईल? ती कधी मिळेल? आमदारकीची ही मिजास तर लाल दिव्याची किती? आणि नुसता विचार कर मुख्यमंत्रीपदाची खुर्ची मिळाली तर? नुसते नाव काढले तरी अंगावर काटा येतो. मतदार'राजा' भले तुला माळ घालायला लावो, आता कधी ना कधी त्या खुर्च्या मिळतीलच ना? पाहू. आपले प्राक्तन. तू मात्र माझी साथ सोडू नकोस बरे प्रिये. तुला परत भेटायची प्रतीक्षा आहेच.

केवळ तुझाच,

नामदार आमदार ( खराखुरा ) राजा

६

**शिक्षणाचे महत्त्व पेपरवाल्यांना ठाऊक ! दहावी बारावी आता जुनी झाली. आता थेट पी.एचडीत मारलेली ही उडी. एका पी.एचडी च्या प्रबंधाची करून दिलेली ही ओळख !**

## माणसं : अशी नि तशी

नुकताच हरी दामोदर लाळघोटे यांनी पीएच.डी साठी नवीन प्रबंध सादर केला. या जगात सर्वात जास्त काही दिसत असतील तर ती माणसे. असे संशोधन या पीएच.डी च्या विद्यार्थ्याने केले आहे. यात माणसे दिसण्याचे प्रमाण त्या भूभागातील जनसंख्येवर अवलंबून असते असा दुसरा निष्कर्ष काढला गेला आहे. आता शास्त्रीय संशोधनावर आधारित असल्याने याला नाही कसे म्हणणार? पुढे माणसांचे नानाविध नमुने असतात आणि व्यक्ती तितक्या प्रकृती असतात असाही निष्कर्ष काढला आहे. म्हणजे इथे देवाने किती मेहनत केली असेल पहा? जगात एकासारखा दुसरा मिळणे दुर्मिळ. असे असंख्य नमुने जगात क्षणोक्षणी अवतरत असतात.जगात एकासारखे एक सात लोक असतात म्हणे ( हे संशोधनातीलच एक गृहितक आहे ). म्हणजे एकूण जगाच्या लोकसंख्येस सातने भागितले तर तेव्हढ्या प्रवृत्ती नि प्रकृती या जगात आहेत. आपल्या देशाच्या कृपेने या प्रवृत्तींचे प्रमाण वाढतच आहे. गणितभयास्तव हा एक्झॅक्ट आकडा सोडला तरी या प्रवृत्ती नि प्रकृतींचे प्रमाण खूपच असणार हे खरे. याचा दुसरा अर्थ ही हा की जगातील एकूण प्रवृत्तींचे प्रमाण वाढण्यात आपला हातभार ही खूप आहे. आपला देश महान आहे हेच यातून परत सिद्ध होते आहे.

या संशोधनात माणसांचे विविध प्रकार आढळून आलेले आहेत. आजवर पीएच.डी चे प्रबंध कोणी वाचत नसे. पण हा समाजभिमुख प्रबंध असल्याने याची दखल घेणे जरूरीचे आहे. लाळघोटेंना आढळलेली माणसे विविध प्रकारांची आहेत. एक ब्रॉड म्हणावी अशी वर्गवारी त्यांनी केली आहे. यातील काही नमुन्यादाखल :

<u>प्रतिष्ठित आणि लब्धप्रतिष्ठित</u>

हे स्वत:ला प्रतिष्टित समजतात. ते कोणत्याही परिस्थितीत आपली 'पोझिशन' सांभाळतात. ही पोझिशन पण त्यांनी स्वत:च ठरवलेली असते. यांना दूरचे सर्व लहान दिसते आणि स्वत:खेरीज इतर सर्व दूर दिसते. स्वत:खेरीज इतर म्हणून त्यांना कस्पटासमान दिसायला लागतात. या प्रकारातील एका बाईंना रस्त्यात अपघात झाला. रस्त्यावरील लोकांनी त्यांना जवळच्या म्युनिसिपालटीच्या हॉस्पिटलात अॅडमिट केले.

शर्थीचे उपचार झाले. बाई बचावल्या. शुद्धीवर आल्या. आजूबाजूची लो कॅटेगरीच्या माणसांची गर्दी पाहून त्याही स्थितीत बिथरल्या. पहिल्या शिव्या त्यांच्या तोंडून गेल्या त्या त्या हॉस्पिटलाला नि नंतर तिथे पोहोचवणाऱ्या रस्त्यावरील बिनचेहऱ्याच्या माणसांना. आपली पोझिशन अशी डाऊन केल्याचे त्यांना सहन होईना. किमान डिस्चार्ज च्या वेळी तरी चांगल्या हॉस्पिटलातून बाहेर पडावे म्हणजे इतरांना सांगताना बरे वाटेल असे वाटून गरज नसतानाही मोठ्या नावाच्या प्रायव्हेट हॉस्पिटलात रातोरात ट्रान्स्फर झाल्या. त्यांनी आपल्याला भेटायला आलेल्या लोकांची यादीच बनवून ठेवली. जे कोणी आले नाहीत त्यांच्याबद्दल त्यांनी जन्मभरचा अबोला धरला. बाईंना त्यांना वाचवणाऱ्या अज्ञातांबद्दल तरी बरे बोलावे असे सांगणाऱ्या त्यांच्या मैत्रिणीवर तर त्यांनी आणखीच डूख धरला. हे वागणं बरं न्हवं असे त्यांच्या नवऱ्यास ही वाटे पण बाईंना नवऱ्याचे काही फार कौतुक नव्हते. ही माणसे मरणानंतर चंदनाच्याच सरणावर चढण्यासाठी आग्रही असतात. कोणाकडे जाताना टीपटॉप असणे यांना गरजेचे असते मग त्यासाठी जाण्याचा मूळ हेतू लक्षात न घेतला तरी चालतो. मग  कोणाच्या अंत्ययात्रेस जाण्यासाठी नव्या को-या पांढऱ्या कपड्यांची खरेदी होते. समोरच्यास प्रथेप्रमाणेच कोरडी सहानुभूती दाखवली जाते. इतरांना स्वत:हून लहान लेखणे हे यांचे व्यवच्छेदक लक्षण आहे. यात त्यांची सारी प्रतिष्ठा पणाला लागते.

<u>खाईन तर तुपाशी</u>

यांना साऱ्याच जगण्याची मिजास असते. पण त्यासाठी इतरांना कमी लेखण्याची त्यांना गरज वाटत नाही. यांचे सारे काही यथासांग. शॉर्टकट्सशी यांचे पटत नाही आणि कोठेही कॉम्प्रोमाइज करणे त्यांना पटत नाही. या यथासांगपणाच्या आपल्या कसरतीत कधी कधी यांची गाडी चुकू शकते. पण याची खंत त्यांना नाही. उद्या यांना आपले वाहन घ्यायचे असेल तर उगाच पैसे वाचवायचे म्हणून हे नॅनो घेणार नाहीत. त्यांना मोठी एसी गाडीच हवी असते. पैसे कमी म्हणून ही ते छोटी गाडी घेणार नाहीत. त्यापेक्षा ते गाडी न घेणं पत्करतील. आणि जन्मभर रिक्शानेही फिरतील.

<u>आय, मी, मायसेल्फ माणसे</u>

हे स्वत:स कधीस विसरत नाहीत. कायम स्वमग्न असल्याने आजूबाजूचे यांना अंधूक दिसते. आत्मचरित्र लिहीणे यांना आवडतेच पण इतरांची चरित्रे यांनी लिहीली तर

त्यातही ते स्वत:बद्दलच जास्त लिहीतात. यांना मी पण कच्च्या फळासारखे चिकटलेले असते त्यामुळे ते त्यांच्यापासून विलग होऊ शकत नाही. मी म्हणजे काय याबद्दल त्यांच्या स्वत:च बनवलेल्या कथा नि कल्पना असतात. त्या येता जाता सर्वांना ऐकवणे हा यांचा छंद असतो. कोणत्याही घटनेत 'मी असतो तर' याचा कल्पनाविलास करणे हा यांचा छंद असतो.

<u>फटकळ नि रोखठोक माणसे</u>

या प्रकारातील माणसांच्या जिभेत हाड नसते. किंबहुना ती जीभ एखाद्या जिमनॅस्टने कसरत करावी तशी चालत असते. त्यांच्या फटकळपणास ते स्पष्टवक्तेपणा म्हणवून घेतात, समोरच्याला याबद्दल काय वाटेल याची त्यांना फिकीर नसते. त्यामुळे कोणाचा मुलाहिजा बाळगणे त्यांना आवडत नाही. रोखठोक बोलून हे मोकळे होतात. या प्रकारातील काही मात्र स्वत:बद्दल फारच सेन्सिटीव्ह असतात. त्यामुळे स्वत:च्या मानापमानाबद्दल मात्र ते जागरूक असतात. त्यामुळे समोरचाही यांच्याप्रमाणेच फटकळ निघाला तर मात्र यांची पंचाईत होते.

<u>'ठोकून देतो ऐसाजे' माणसे</u>

या प्रकारातील माणसांना प्रचंड आत्मविश्वास असतो. यांना माहित नाही अशी गोष्ट या जगात बहुधा नसेलच. कोणत्याही प्रश्नाचे उत्तर यांच्याकडे तयार असते. मग ते उत्तर बरोबर असो की चूक. यांच्याकडून ते उत्तर एवढ्या पटकन आणि सफाईने येते की समोरच्यास तेच खरे असे वाटण्याची शक्यता असते. समोरच्याचे अज्ञान आणि स्वत:चा प्रचंड आत्मविश्वास या बळावर हे बाजी मारून नेतात. यांचा डोलारा कित्येकदा यावरच उभारलेला असतो. एखादे वारली पद्धतीचे चित्र आहे समजा. कोणी यांना त्याबद्दल विचारले तर क्षणार्धात ते सांगतील, आफ्रिकेतील चाड देशातील कोणत्यातरी शहरातील प्रसिद्ध कला आहे ही ! एवढ्यावर न थांबता यातील एखाददुसऱ्या चित्रकाराचे नावही हे सांगतील. यातील आफ्रिका आणि चाड या माहितीच्या जोरावर पुढची काल्पनिक नावे सांगतील. ज्याला या वारली चित्रकलेची माहिती आहे तो ही यांच्या आत्मविश्वासापुढे गोंधळून जाईल अशी यांची स्टाईल असते. त्यामुळे हे भाव खाऊन जातात. राजकीय क्षेत्रात यांना महत्त्वाकांक्षा असेल तर हे खूप पुढे जाऊ

शकतात. अगदी मुख्यमंत्रीपदा पासून पंतप्रधानपदावर दावा सांगण्यापर्यंत यांची मजल जाऊ शकते. इतिहास काय भूगोल काय, किंवा एखाद्या महत्त्वाच्या विषयावरील माहिती काय, कोणत्याही गोष्टीची तोडफोड करून लोकांना संमोहित करून हे खूप मजल मारू शकतात.

सुतासारखी सरळ माणसे

यांना गरीब गाय, कोणाच्या अध्यात मध्यात नसणारी, नाकासमोर पाहणारी अशा विविध नावांनी ओळखले जाते. यातील काहींची नाके थोडी वाकडी असतील पण सामान्यत: ही माणसे सरळरेषेतच चालतात. कोणाचे पैसे द्यायचे यांच्याकडे राहिले असतील तर आपण कधी एकदा ते परत फेडू याचे टेन्शन देणाऱ्या पेक्षा यांनाच जास्त असते. हे सत्यवचनी असतात. आणि कित्येकदा देवभोळे ही. जग सुरळीत चालण्यासाठी एखाद्या वंगणासारखे हे काम करतात. सारेच उद्या लढाऊ झाले तर एकमेकांचे गळेच दाबले जातील. त्यामुळे यांचा उपयोग शॉक अब्सॉर्बर सारखा होतो.

भिडस्त माणसे

ही सरळसोटांची एक प्रजाती आहे म्हणजे सरळसोटांपैकी काहींना भिडस्त म्हटले जाते. भीड चेपली की माणूस बिनधास्त वागतो. यांची भीड कधीच चेपली जात नाही. त्यांच्या जिभेतही हाडांचा सांगाडा बसवलेला असतो. कोणासही नाही म्हणणे यांच्या जिभेला झेपत नाही, त्यामुळे आजूबाजूचे कोणी यांचा गैरफायदा घेऊ शकतात. त्यातील काहींना हे समजते देखील पण त्याबद्दल मनातल्या मनात चरफडण्याखेरीज हे काहीच करू शकत नाहीत.

वरवरची माणसे

यांना आपल्या भोवतीच्या सर्वांची काळजी असते, म्हणजे तसे ते दाखवत असतात. ती पोकळ आहे हे यांना स्वत:स तर ठाऊक असतेच. यांचा अभिनय चांगला  नसेल तर समोरच्यास पण तसे वाटू शकते. हे आपल्या घरी न येण्याची शक्यता असलेल्यांना आग्रहाची आमंत्रणे करतात. यांना भिडस्त माणसे भेटली अत्यानंद होतो तर कोणी फटकळाशी सामना झाला तर पंचाईत होते. एखाद्या भिडस्तास हे घरी आग्रह करकरून बोलावतील. त्यास घरी पंक्तीस बसवल्यावर त्याच्यापुढे ताटात एवढे कमी वाढतील की त्याने चाखतमाखतच खावे. भाजीचे अख्खे भांडे ते याच्यासमोर असे धरतील की त्यास

भाजी संपत आली आहे हे कळावे. हात राखून मग भिडस्त गडी जेवतो. ही माणसे यावर मात्र थांबायची नाहीत. व्यवस्थित आणि पोटभर जेवणे कसे गरजेचे आहे हे वर आपल्या पाहुण्यास समजावून सांगतील. तरूणांनी कसे चापून जेवले पाहिजे यावर व्याख्यान देतील. भिडस्तांस काय त्या अर्धपोटी जेवणावर हे ही पचवतील.

बादरायण माणसे

ह्या प्रकारातील माणसे वडाची साल पिंपळाला लावण्यात तरबेज असतात. आकाशात ढग आले. अगदी गडगडाट झाला. विजा चमकल्या. वातावरण निर्मिती झाली. नभ मेघांनी आक्रमिले हे गाणे रेडीओवर वाजू लागले. लोक छत्र्या उघडून चालू लागले. एवढ्या वातावरण निर्मितीनंतर सर्व ढग न पाऊस न पाडताच निघून गेले. बादरायण माणसे सुरू होतात, वाचकांच्या पत्रव्यवहारात पत्रे जातात, आजकाल ढग येतात नि न पडता निघून जातात, यावर सरकारचा नि हवामान खात्याचा काहीच कंट्रोल नाही का? सरकारने या ढगांवर कडक अॅक्शन घ्यायला हवी. या प्रकारातील एकाने यावर्षी खूप थंडी पडली म्हणून नगरपालिकेस धारेवर धरले होते. यांना सर्दी झाली तर ते डॉक्टरांना सांगतात, चौतीस वर्षांपूर्वी मी बर्फ खाल्ला होता त्यामुळे आज सर्दी झाली. कार्यकारण भावाचा अभाव ही यांची खासियत असते.

वाकड्यात शिरणारी माणसे

साध्याही विषयात मोठा आशय शोधणाऱ्या कवी आणि लेखकांची एक जमात असते. त्यांना आजूबाजूस वेगवेगळी प्रतीके दिसतात. नि जीवनाचे विविध अर्थ ते काढत बसतात. वाकड्यात शिरणारी माणसे ही त्यांच्या इतकीच किंवा त्याहूनही हुशार असतात. ते एखाद्या वाक्याचा संदर्भ सोडून अर्थ काढून लावू शकतात. या बळाच्या जोरावर ते राजकारणात मुक्त संचार करू शकतात. म्हणजे हिंदूधर्मसुधारकांनी काही सुधारणा सुचवल्या तर हे तुम्ही मुस्लिमधर्माबद्दल का बोलत नाहीत असा प्रश्न विचारतात. एखाद्या घटनेचा होता होईल तेवढा वाकडा अर्थ लावणे यांची खासियत तर असतेच पण ती ते ताकद म्हणून ही वापरू शकतात.

ढालगज माणसे

मराठी भाषेतील हा शब्द स्त्रियांसाठी राखीव म्हणून वापरला जातो. सासू ही ढालगज असावी अशी आमची प्रथा नि परंपरा आहे. ही माणसे सापशिडी खेळतात पण इतरांना शिडीवरूनही सापाच्या तोंडासारखे खाली खेचतात.

लाळघोटेंच्या प्रबंधातील ही काही नमुन्यादाखल उदाहरणे. मूळ प्रबंधच वाचण्यासारखा आहे. त्यातून ज्ञानमौक्तिके मिळवावीत असा आहे. पीएच.डीचा आहे म्हणून काय झाले?

७

**खाणे नि खिलवणे, पोटातून हृदयात जाणारा कुफिया मार्ग वगैरे आम्हाला परिचित आहेतच. तेव्हा वर्तमान खाद्यसंस्कृती वर्तमानपत्रांत दिसायलाच हवी ! ही एक ओळख अर्वाचीन खाद्यसंस्कृतीची !**

## अर्वाचीन महाराष्ट्रातील काही खास खाद्यपदार्थ

आपला महाराष्ट्र हा कशातच मागे नाही. या पुरोगामी राज्यात खाद्य संस्कृती बहरास आलेली दिसते आहे. या खाद्यसंस्कृतीत अविभाज्य असलेले काही खाद्यपदार्थ:

### पाठीचे धिरडे

लहान व निरुपद्रवी बालकांसाठी बनवला जाणारा हा एक खास पदार्थ आहे. काही आया ही हा बनवत असल्या तरी प्रामुख्याने शिक्षक वर्ग आपल्या हाताखालील विद्यार्थ्यांकरीता खास करून बनवतात. या करता हात किंवा फूटपट्टीचा वापर केला जातो. पूर्वी छडी वापरून ही बनवला जाई. शिक्षकाचे frustration जेव्हढे जास्त तेव्हढा हा पदार्थ रूचकर होतो. काही मुलांमध्ये या पदार्थामुळे कोडगेपणा हा सद्‌गुण वाढण्याची शक्यता असते.

### बोलाचि कढी आणि बोलाचा भात

हा बनवण्यास अत्यंत सोपा पदार्थ असून सर्वात लोकप्रिय पदार्थ म्हणून ओळखला जातो.कोणीही केव्हाही आणि कुठेही बनवू शकेल असा हा पदार्थ आहे. हा नुसत्या तोंडाच्या वाफेवर शिजतो. जीभ नुसती उचलून टाळू ला लावून अत्यंत सोप्या पद्धतीने हा बनवता येऊ शकतो. लोणकढी थाप वापरून ही बनवता येऊ शकतो. हा एक रूचकर पदार्थ असून खाण्या~याला त्यातून तात्पुरत्या तृप्तीचा ढेकर देणारा सर्वात स्वस्त आणि मस्त असा पदार्थ आहे. राजकारण्यांचा अत्यंत आवडता हा पदार्थ असून तो आश्वासने,निवडणूक जाहीरनामा वगैरे नावांनी बनवला जातो.दर पाच वर्षांनी बनवताना ह्यात नवीन मसाला वापरल्याने त्याची चव बदलत राहते व खाणा-याला कंटाळा येत नाही. व्यापारी दुकानदार मंडळी हाच पदार्थ after sales service या नावाने बनवतात. खाणा-याला तात्पुरती तृप्ती मिळत असली तरी याचे पोषण मूल्य शून्य असून त्यामुळे याची गणना junk food मध्ये होते. यामुळेच कदाचित इतर सर्व junk foods प्रमाणे हा पदार्थ लोकप्रिय आहे.मात्र बनवणा-याला स्वत: हा पदार्थ खाता येत नाही.

## पुराणातील वांगी

महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतातील हा लोकप्रिय पदार्थ आहे. खास करून संस्कृती रक्षण मंडळांचा हा आवडता पदार्थ. काही ठिकाणी जेवणासाठी भात उकरला जातो त्याप्रमाणे ही पुराणातील वांगी उकरली जाऊ शकतात. ही भाजून वा शिजवून खाता येतात. कित्येक हॉटेलांत छोले मसाला,मटार मसाला, एग करी वगैरेंची gravy एकच असते. फक्त त्यातील घन पदार्थावर त्या डिश चे नाव ठरते. तसेच या पदार्थाचे आहे. विविध सामाजिक वैयक्तिक प्रश्नांवर उतारा म्हणून ही वांगी बनवली जातात. Issue कोणताही असो त्यावर इलाज म्हणून ही वांगी गुणकारी आहेत. याचे पौष्टिकता मूल्य ही वांगी का बनवण्यात आली आहेत यावर ठरते. जर issue एकदम महत्त्वाचा असेल तर हा पदार्थ बनवणा-याची राजकीय ताकद वाढवण्याची क्षमता या पदार्थात आहे.

## भूखंडाचे श्रीखंड

भूखंडाचे श्रीखंड  हा महाराष्ट्रातील एक खास पदार्थ असून तो नुसता बनविणे सुद्धा खूपच कमी लोकांच्या आवाक्यातील आहे. हा पदार्थ फक्त बनवणाराच त्याच्या मर्जीतील काही लोकांमध्ये वाटून खाऊ शकतो. ह्या पाककृती करता सर्व प्रथम एक भूखंड घ्यावा लागतो. त्याची उपलब्धता आपल्याआपल्या क्षमतेवर अवलंबून असते. ह्या पदार्थाकरता कित्येक वर्ष पडीक असलेला भूखंड वापरणे सोयीचे ठरते. तसेच शाळा,बागा यांकरीता राखीव असलेले भूखंड वापरल्यास पदार्थाची लज्जत आणखी वाढू शकते. तसा भूखंड उपलब्ध नसल्यास आपल्याला हवे तसे आरक्षण रिकाम्या भूखंडावर करून घेता येते. याकरता आरक्षणाचे घोंगडे काही काळ भिजत ठेवावे. काही वर्ष व्यवस्थित भिजल्या वर ते लोकांच्या जेव्हा विस्मृतीत जाईल तेव्हा त्याचे श्रीखंड करण्यास घ्यावे. शाळा, बाग,उघडे मैदान अशी नगर रचनेत सोय करून घेण्यासाठी योग्य त्या प्रमाणात enzymes म्हणून इतर नगरसेवक,आमदार इ.ची मदत घ्यावी. फक्त श्रीखंड बनून झाल्यावर त्यांना काही प्रमाणात चाखण्यास देण्यास विसरू नये. झोपडपट्टीतील भूखंड ही याकरता वापरता येतात. त्याकरता झोपडी दादा ह्या enzymes ची मदत लागेल.झोपड्यांच्या जमिनीवरील श्रीखंडामुळे आपले नाव तर होतेच पण आपली व्होट बँक ही बनविता येते. हा पदार्थ बनवणे ही एक खूप वेळ

घेणारी आणि अत्यंत सावधगिरीने बनवावी लागणारी गोष्ट आहे. हळू हळू कोणाच्या नजरेत न येता बनवल्याने ती बाधण्याची शक्यता कमी होते. हा पदार्थ फक्त बनविणाराच खाऊ शकतो अर्थात त्यातील काही वाटा संबंधितांना दिल्यानंतरच याचे सेवन करता येते. याचे पचन सुलभ व्हावे म्हणून आधी आपली लाज कोळून पिणे आवश्यक आहे. हा अत्यंत पौष्टिक असा पदार्थ असून याचे सेवन आणि पचन करता आल्यास तसे
करणा-याची  राजकीय ताकद कित्येक पटींने वाढू शकते.श्रीखंड बनवून होण्यासाठी पुढे बिल्डर नावाच्या enzyme ची गरज लागते. या पदार्थात कित्येक घटकांची गरज लागत असली तरी हा अत्यंत गुणकारी आहे.

**लाजेचा कोळ**

लाज,लज्जा,शरम या सारख्या न दिसणा-यागोष्टीतून हा पदार्थ बनवला जातो. लाज ही वाटण्याची गोष्ट आहे. येथे वाटणे म्हणजे to distribute नसून to feel हे लक्षात घेतले पाहिजे. ह्या लाजेचे जनाची आणि मनाची असे दोन प्रकार असून दोघांचा वापर करून कोळ बनविल्यास तो जास्त गुणकारी ठरतो. हा पदार्थ पचनक्रिया वाढविण्यासाठी उपयोगी आहे. तो बनविण्यासाठी लाजेचा त्याग करणे आवश्यक आहे. तसे करून झाल्यावर ती भिजत घालून वाटून घ्यावी. (इथे वाटणे म्हणजे चटणी सारखे वाटणे) त्यानंतेर थंडगार पिऊन टाकावी. असे केले असता 'लाज कोळून प्याली' असे म्हणता येते. स्वत:च्या लाजेचा कोळ स्वत:च प्यावा. भूखंडाच्या श्रीखंडाचे पचन होण्यासाठी हा पदार्थ अत्यावश्यक आहे. बोलाचि कढी बनवणा-यांना या कोळाचे नियमित सेवन अधिकाधिक पदार्थ बनविण्यासाठी उत्साहवर्धक आहे.

**लोणकढी थाप**

हा एक मध्यमवर्गीय पदार्थ असून तो कित्येक घरात बनवला जातो. ऑफिसात दांडी मारणे, कोणाकडे जाणे टाळणे,एखादे काम टाळणे, कुठे जाण्यास उशीर होणे  इ. करता हा खास बनविला जातो. हा तसा निरुपद्रवी पदार्थ असून काहींना तो जीवनावश्यक असल्यासारखा वाटतो. बोलाचि कढी खाणा-याला त्याचे पोट भरल्यासारखे वाटते तसे इथे होत नाही. बनवणारा मात्र एकदा हा पदार्थ बनवून झाला की सुटलो एकदाचा असा नि:श्वास टाकू शकतो.

महाराष्ट्रातील नवनवीन खाद्यपदार्थांची ही फक्त झलक आहे.  धम्मक लाडू,चापट पोळी,अंगाचा तीळपापड असे कित्येक पदार्थ बाकी आहेत. पुढे मागे ’अर्वाचीन महाराष्ट्रातील १००१ खाद्यपदार्थ’ पुस्तक लिहिण्याचा मानस आहे. तोपर्यंत रामराम.

८

**बालमैफल, बालजगत, बालोद्यान वगैरे तर असतातच. पण 'बाळा जो जो रे' असे मार्मिक नाव असलेले एक सदर आणि त्यात प्रसिद्ध झालेला हा एक निबंध !**

## बंगलोर ट्रीप : एक प्रवासवर्णन

श्रीयुत अरविंद गोविंद देशपांडे म्हणजे मध्यमवर्गीय नोकरदार माणसाचा एक प्रोटोटाईप. कुटुंबवत्सलता हा त्यांचा गुणधर्म. त्यामुळे दर उन्हाळयाच्या सुटीत मुलांना घेऊन बाहेरगावी घेऊन जाणे हा त्यांचा धर्म. गावोगावी फिरल्याने मुलांना शहाणपण येतं हो त्यांची श्रद्धा. एवढंच नाही तर परत आल्यावर सहलीचे प्रवास वर्णन लिहायचा नियम त्यांनी मुलांना घालून दिला आहे. यावर्षी सुटी झाली की बंगलोरला जायचा बेत त्यांनी बनवला. बंगलोरला जाऊन आल्यावर मुलं बसली नेहेमी प्रमाणे प्रवास वर्णन लिहायला.

अरविंदरावांना तीन मुलं, तिसरीतील कु.शर्वरी, सातवीतला कु. अमर आणि दहावीतली स्कॉलर कु.प्राजक्ता. हे आहेत तिघांनीही लिहिलेले निबंध

**कु.शर्वरी**

मे महिन्याची सुट्टी झाली आणि आम्ही सगळे जण बंगलोरला गेली. ताई बोल्ली की बंगलॊर म्हंजे खूप मजा म्हणून मी जायची वाटच पहात होती. आम्ही झुकझुक गाडीतून गेलो. आणि मग तिकडच्या बागेत गेलो. त्या बागेत एक गाय होती. गाय एक पवित्र प्राणी आहे. तिला चार पाय असतात, दोन शींगे असतात. आणि एक शेपूट असते. गाय आपल्या शेपटाने माशा उडवते. गाय दूध देते. दुधामुळे आपल्याला ताकद येते. दूध माला खूप आवडते.त्यात मी हॉरलिक्स टाकून पिते. दुधाचे दही बनवतात. आणि दहीचे ताक. गायीच्या पाठीवर एक उंच भाग असतो त्याला वशींड असे म्हंटात. गायीची दिवाळीत पूजा करतात. गायीच्या पिलास वासरू असे नाव आहे. अशीही गाय माला खूप खूप आवडते. अशि झाली आमची बंगलोरची सहल.

**कु.अमर** (ह्याला इंग्रजीची ‘हाऊस‘ किंवा वेड आहे ! )

Every May we all go to some out village. So this year may vacation came and we decided going to Bunglor. When my baba told me this I

was very very happy. We waited for the going day eagerly. We will travel by Udyan ekspress. We climbed the train in Dadar. We were in train for 24 hours. It was very funny. Now train travel becomes my liking travel.

In Bunglor we stay in a hotel. Bunglor is a very famous city. It is very very big city. Bunglor is a capital of Karnataka city. We then went to a big garden. It was very big. Then we sat in a toy train. We also saw one old King's palace. We sat there in a horse cart. Then we go to one national park. There are many plants and grass and animals and birds there. We ate idlis and dossas with sambar and chatani there. Then we came back. Bunglor was very funny. It has now become my very liking city.

**कु.प्राजक्ता**

’केल्याने देशाटन मनुजा येतसे चातुर्य फार’

असं म्हणतात. खरंच आहे ते. प्रवासात नवीन लोक दिसतात,नवीन प्रदेश दिसतो, नवनवीन खाद्य पदार्थ खायला मिळतात. या सर्वांतून आपल्याला खूप काही शिकायला मिळत असते. त्यामुळेच मी देशाटनाला नेहेमीच उत्सुक असते. या वर्षी आम्ही सर्वांनी बंगलोरला जायचे ठरवले. त्यादिवसाची मग आम्ही आतुरतेने वाट पाहत होतो. जायचा दिवस आला आणि आम्ही दादरला पुष्पक एक्सप्रेस पकडली आणि आमचा प्रवास सुरू झाला. मला गाडीत चढल्यावर वाफेच्या इंजिनापासून ते आता पर्यंतच्या प्रगतीचा अभिमान वाटून गेला. आम्हाला आगगाडीत २४ तास काढायचे होते. तो अनुभव काही वेगळाच होता. त्यात आम्ही सर्वांनी खूपच धमाल केली. भेंड्या खेळलो,पत्ते खेळलो, सापशिडी आणि बुद्धीबळ खेळलो. खूपच मजा आली. ते सारे क्षण मी मनाच्या कुपीत जपून ठेवले आहेत.

बंगलोर हे कर्नाटकाच्या राजधानीचे शहर आहे. ते एक मोठे असे भारतातील मेट्रो शहर आहे. कर्नाटक हे महाराष्ट्राचे शेजारी राज्य आहे. तिकडील कन्नड भाषा ही आपल्या मराठीसारखीच संस्कृतोद्भव आहे. म्हणजे ही आपली भाषा भगिनीच आहे.

बंगलोरला आम्ही एका हॉटेलात उतरलो.तिथे आमचे खूपच चांगले आदरातिथ्य झाले. तिथे इडली आणि दोशे खाऊन आमची रसना तृप्त झाली. बंगलोरला राष्ट्रीय उद्यान आहे. तिथली वनराई आणि हिरवाई डोळे दिपवून टाकणारी आहे. असंख्य पक्ष्यांचा तिथे मुक्त वावर आहे. कित्येक वन्यप्राणी आहेत.अशा ह्या ठिकाणी निसर्गाशी जवळीक साधली जाते. असे वाटते की परत येऊच नये. ते निसर्ग सौंदर्य मी डोळयांत साठवून ठेवले आहे. बंगलोरातील राजाचा राजवाडा ही प्रेक्षणीय आहे. तेथील वस्तुसंग्रहालयातील शस्त्रात्रे, आयुधे, त्याकाळचे विविध पोशाख आणि पुरातन भांडी कुंडी पाहून अगदी चकितच व्हायला होते. तिथे आम्ही घोडागाडीत देखिल बसलो. बंगलोरमधील लहान मुलांचे उद्यान ही अत्यंत सुंदर आहे. आपल्या लहान भावा बहिणीला मोहवून टाकतील असे खेळ तिथे आहेत. आम्ही खेळण्यातील झुकझुक गाडीत बसलो आणि त्या उद्यानाची सफर केली. चिमुरड्या शरूला म्हणजे माझ्या छोट्या बहिणीस ही गाडी खूपच आवडली.

बंगलोरमधील वास्तव्याचे दिवस संपत आले. मी एक दीर्घ श्वास घेऊन ती बंगलोरची हवा आपल्या छातीत भरून घेतली. आणि आम्ही मुंबईकडे रवाना झालो. मुंबईत पाय टाकला, घरी आलो आणि होम स्वीट होम असे का म्हणतात याची प्रचीती आली.

आमची ही बंगलॊर सहल नेहमीच माझ्या लक्षात राहील.

आणि अरविंदरावांनी काय लिहावे?

तुमचा अंदाज खराच आहे. त्यांच्या डायरीतील नोंदीस सुरूवात होते मुंबई बंगलोर ५ तिकिटे रू. ------- पासून आणि ती संपते मुंबई बंगलोर ट्रीप एकूण खर्च रू. ------- वर. आणि त्यांच्या सुविद्य ( तरीही ) शहाण्या पत्नी? सोनालीताई अगदीच ’मेलं कुठे जाणे

नको नि येणं नको’ असे म्हणत नसल्या तरी असे काही लिहायच्या फंदात मात्र पडत नाहीत.

९

## ही काही प्रसिद्ध झालेली बातमी पत्रे !

## काही बातमीपत्रे

१.

नमस्कार.ब्रेकनंतर आपले ‘आआत्ता‘ म्हणजेच ‘आज आता ताबडतोब‘ वाहिनीच्या राम रावण युद्धाच्या विशेष भागात स्वागत आहे. आज सकाळी राम आणि लंकाधिपति दशानन रावण यांच्यात घमासान लढाईला सुरुवात झाली.दोन्ही बाजूंकडून कडवा प्रतिकार होताना दिसत होता.रावणाच्या एकूण अंदाजावरून रावण रामाला भारी पडणार असाच रंग दिसत होता.य़ा लढाईचे लाईव प्रक्षेपण आपल्याला फक्त आआत्ता वाहिनी दाखवत आहे. आमच्या प्रतिनिधी चरखा भट्ट युद्धभूमीवरुन खास आपल्यासाठी वार्तांकन करत आहेत.

चरखा, काय माहोल आहे तिथे?

- हे पहा आज सकाळी जेव्हा युद्धाला सुरुवात झाली तेव्हा वातावरण तंग होते. दोन्ही बाजूंकडून तीव्र प्रतिकार होत होता. पण आता युद्ध संपण्याच्या बेतात आहे असे दिसते.

म्हणजे कोण जिंकण्याची शक्यता आहे?

- एकूणच रावण जेरीला आल्याचे चित्र आहे. कोणत्याही क्षणी युद्ध संपेल असे दिसते आहे. आणि ही Breaking news आहे. रावणाच्या पोटात रामाचा बाण लागला आहे. मी तुला आधीच म्हटले त्याप्रमाणे युद्धाचा अंत जवळ आला आहे.

चरखा, तुझे प्रत्यक्ष रावणाशी बोलणे झाले का?

- होय, बाण लागून नंतर खाली पडायच्या क्षणापर्यंत माझे बोलणे झाले.

काय म्हणणे होते रावणाचे?

- मी रावणाला विचारले की आता कसे वाटते त्यावर रावणाने अतिशय कष्टाने अशी माहिती दिली की एकतर बाण खूप तीक्ष्ण आहे त्यामुळे पोटात खूप दुखते आहे व रक्त पण खूप वाहते आहे. आणि महत्त्वाचे म्हणजे फक्त आआत्ता लाच ही exclusive मुलाखत दिली आहे. त्याचबरोबर रामाशी लढाई भारी पडल्याची कबुली पण रावणाने दिली.

तू रावणाला हे विचारलेस का की त्याला रामाची माफी कधी मागावीशी वाटली का?

- हो. त्यावर रावणाने म्हटले की त्याला माफी जरूर मागावीशी वाटली

मग का नाही मागितली माफी?

- हो, असे मी विचारले तेव्हा रावणाने सांगितले की शेवटपर्यंत तो हे ठरवू शकला

नाही की कोणत्या तोंडाने माफी मागू?

२.

राज्यात आज ठिकठिकाणी भावना दुखावल्याच्या बातम्या हाती आल्या आहेत. आज सकाळी मराठी अभिनेत्री भावना दुखावल्याच्या बातमींमुळे सर्व मराठी अभिनेत्री संपावर गेल्या.मराठी अभिनेत्रींच्या भावना दुखावल्या नसून अभिनेत्री भावना यांचा पाय मुरगळल्याने दुखावल्याचे दुपारी समजल्यानंतर त्यांनी आपला संप मागे घेतला.दरम्यान मराठी सिनेनिर्माता संघाने हा संप बेकायदेशीर असल्याचे म्हटले आहे.

पुणे येथील महाराष्ट्र जतन संघ या संघटनने शिवचरित्रात शिवाजीमहाराजांची एकाहून जास्त लग्ने झालेली दाखवल्याने भावना दुखावल्याबद्दल निषेध केला आहे. इतिहासातील घटना काहीही असल्या तरी त्या लोकांपुढे आणताना तारतम्य बाळगले पाहिजे. इतिहास आपण घडवू शकलो नाही तरी आजच्या संदर्भाप्रमाणे इतिहास बदलला पहिजे. यापुढे इतिहास संशोधकांची झाल्या घटना पुढे आणण्याची मनमानी सहन केली जाणार नाही असा इशारा संघटनेने दिला आहे. त्याचप्रमाणे सरकारने शिवचरित्रावर बंदी आणली पाहिजे अशी मागणी संघटनेने केली आहे.

मुंबईतील बजरंग ब्रिगेड ने 'न कर्त्याचा वार शनिवार' या वाक्प्रचारावर बंदी आणण्याची मागणी केली आहे. शनिवार हा मारुतीचा वार असून अप्रत्यक्षपणे मारुतीरायाला न कर्ता म्हटल्यामुळे भाषापंडितांचा निषेध केला आहे. अशी हनुमानभक्तांची भावना दुखावणारी भाषा सहन केली जाणार नाही व सरकारने ह्या वाक्प्रचारावर तत्काळ बंदी घालायची मागणी केली आहे.

या घटनांचे पडसाद आज विधिमंडळात उमटले.विरोधी पक्षनेत्यांनी भावना आणि सुव्यवस्थेची परिस्थिती हाताबाहेर गेल्याचे सांगून त्याबद्दल सरकारला धारेवर धरले.त्यांनी गृहमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. चर्चेला उत्तर देताना गृहमंत्र्यांनी सांगितले की राज्यात भावना आणि सुव्यवस्थेची स्थिती उत्तम आहे. लवकरच फास्ट ट्रॅकच्या न्यायालयांच्या धर्तीवर भावनेचे प्रश्न हाताळण्यासाठी विशेष न्यायालयाची स्थापना करण्याची घोषणा त्यांनी केली.

३.

नाळेगाव चे आमदार श्री.बाळकराम ताजे पाटील यांच्या नुकत्याच झालेल्या जाहीर सभेचा हा संक्षिप्त वृत्तांत

रामराम मंडळी. नाळेगाव बुद्रुक आणि खुर्द आणि पंचक्रोशीतील समस्त गावकरी बंधु भगिणिंनो. उन्हातानाची आणि भुकेची पर्वा न करता तुम्ही सर्व इथे माझे विचार ऐकण्यासाठी जमला आहात असा सरपंच श्री.आजे पाटीलांचा फोण आला तसा मी ताज मधले जेवण संपवून हेलिकाप्टर ने तडक निघालो. माझा नेहेमीचा वामकुक्शीचा शिरस्ता मोडून इथे आल्याचा मला मनपूर्वक आणंद होत आहे. तीन वर्शांपूर्वी तुम्ही माला आमदार म्हणूण निवडूण दिले आणि विकासाची गंगा इथे वाहू लागली आहे. आमचे गुरू हणमंत मोहिते नेहेमी म्हणायचे की, बाळकोजी(ते मला प्रेमाने आज ही बाळकोजी म्हणतात) कोणत्याही चांगल्या गोश्टीची सुरुवात स्वतापासुन करावी.त्यांच्या आन्येनुसार आम्ही तशी सुरुवात केली आहे. तीन वर्शांपुर्वी आम्हाला सरकारी वाहनांवर अवळंबून राहावे लागायचे ते आता आम्ही तडक हेलिकाप्टर ने येऊ शकतो. आमच्या विरोधकांना हा विकास दिसायचा नाही. मतदार संघाची शेवा करायला कधीही येता यावे म्हणून आम्ही चार अद्ययावत कि काय अशा गाड्या दिमतीस ठेवून आहोत. म्हणजे तुमच्यापॆकी कोणालाही गरज पडली तर आम्हाला नेसत्या कपड्यानिशी येता यावे. अशी ही विकासाची सुरुवात आम्ही स्वतापासून करून आदर्श घालून दिला आहे. आज आमचा येथे मोठा बंगला आहे त्यामुळे आम्ही तुमच्यात

हवे तेवढे दिवस राहू शकतो. प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी अशीच सोय करण्याचा माणस आहे. असाच या भागाचा विकास करण्याचा विडा आम्ही उचलला आहे.आमचे विरोधक विडी उचलली आहे असे खुशाल म्हणोत,त्यांचे कामच आहे ते. हमारा हाथ गरिबोंके हाथ हा आमचा नारा आहे. त्यामुळे गरिबी कितीही वाढो चिंतेचे कारण नाही. किंबहुणा वाढत्या महागाईने गरिबी वाढली तरी बेहत्तर उलट त्यामुळे आम्हाला अधिकाधिक गरिबांची सेवा करण्याचा मोका मिळेल याचाच आम्हाला आणंद आहे.

४.

आमच्या चित्रपट प्रतिनिधीकडून

'गटांगळया' ह्या आपल्या चित्रपटाने तिकिटबारीवर आपले नाव सार्थकी लावल्यानंतर निर्माते श्री.राजकिशोर यादव यांनी त्यांच्या तीन नवीन चित्रपटांची घोषणा केली आहे. त्यातील 'डाभोरले' हा पहिला चित्रपट असून त्यात शहरी जीवनातील फास्ट लाईफ व त्यामुळे होणा-या भावभावनांच्या डाभोरल्याचे चित्रण आहे, तर 'तवंग' हा दुसरा चित्रपट ग्रामीण पार्श्वभूमी वरील असेल.एका गावाच्या समुद्रकिनाऱ्यावर जहाज फुटून तेलाचा तवंग पसरतो त्यामुळे तिथल्या लोकांवर व आयुष्यावर उठणा-या तरंगाचे चित्रण यात असेल. जहाज फुटी आणि तेलगळती सामान्य घटना असली तरी त्याचे चित्रण भारतात पहिल्यांदाच या चित्रपटातून येत आहे. तिस-या चित्रपटाचे नाव 'समाप्त The End' असून द एण्ड ने सुरू होणारा हा जगातील पहिलाच चित्रपट असेल असा दावा यादव यांनी केला आहे. तिन्ही चित्रपटांचे दिग्दर्शन त्यांचेच असून नवे संगीतकार सुरू संपत यांचे संगीत असेल. तिन्ही चित्रपट दिवाळीच्या दरम्यान प्रदर्शित होतील.

१०

**आणि**
**वर्तमानपत्रांचा अविभाज्य भाग झालेला हा थिल्लर टाईम्स !**

## थिल्लर टाईम्स

आजच वाचा ! उद्यासाठी !
आपला सर्वांचा
थ्रिलर टाईम्स !
आपली प्रत आजच राखून ठेवा

थिल्लरपणा हा मोठाच गुण आहे म्हणायचा !
सकाळी सकाळी पेपर आला की त्यात पहिले पान जाहिरातींचे. पूर्ण पानभर, जणू तीच हेडलाईन. मग आठ दहा पानांनंतर समाज प्रबोधनात्मक आठ पानी पुरवणी. त्यात मग नट आणि नट्यांनी कोणते कपडे घातले किंवा घातले नाहीत, किती पार्ट्या अटेंड केल्या किंवा कोण कोणाशी कसले लफडे करतायत वगैरे उद्बोधक व समाजोपयोगी मजकूर. मूळ पेपर दहा पानी असो की सहा पानांचा ओबडधोबड, पुरवणी मात्र गुळगुळीत आठ पानांचीच हवी. मागे न्यूज प्रिंट महागल्याची पेपरवाल्यांची बोंब या समाजसेवेपर उपक्रमामुळे ऐकू येत नाही!
दिवस रात्रीच्या धावपळीत चार क्षण विरंगुळा देण्याचे पवित्र कार्य! याला कोणी पेज थ्री म्हणतात. म्हणोत बापडे. आम्ही याला थिल्लर टाईम्स म्हणतो.
समाजाला आरसा दाखवणारे हे पेपर म्हणजे आजचे एक भूषण आहेत. नाहीतर आमच्या प्रात:स्मरणीय नट आणि नट्यांच्या विविध चाळयांची कम activitiesशी आम्ही अनभिज्ञ  नसतो का राहिलो?
हिंदी सिनेमागीतांचे पण तसेच. या करमणुकीत तेही मागे नाहीत. साहिर नि शैलेंद्र वगैरे मंडळींनी हिंदी सिनेमा गीतांना कवितेच्या गर्तेत ढकलले किंवा लोटले म्हणा. ते आजकाल आजा मेरी गाडी में बैठ जा किंवा ना तूने सिग्नल देखा अशा सर्व सामान्यांना सहज समजेल अशा शब्दकलेत गुंफून त्यांच्या मुक्तीचे महान कार्य अलिकडच्या गाणे रचणा-यांनी केले आहे. ज्ञानेश्वरांनी पण हेच कार्य केले नव्हते काय? या दृष्टीने हे यांचे संतकार्यच म्हणायला हवे.

संगीतातही तेच. रागदारी ही उच्चभ्रूंची मक्तेदारी. आमच्या कानांना ढाण ढाण मुजिकच सुखावते. आम्ही किती सहजतेने ते गुणगुणू शकतो. इडियट बॉक्स वरील मालिकांतूनही हाच संदेश देतात. सर्वांना सगळेच सोपे सुलभ वाटावयास हवे. चार घटका जे पहावयाचे ते चकचकीत गुळगुळीत नसेल तर आमचे रोजचे आयुष्य काय वाईट आहे? का आम्ही सिरीयल सिरीयली पाहाव्यात?
जीवनाचा सखोल बिखोल अर्थ शोधणे हे विचारवंतांचे काम. आम्ही ते नाही करत. आम्हाला प्यारी हीच आमची संस्कृती. कितीही वरवरची म्हणून हिणवलेत तरी हीच एक सत्य..बाकी सारे असत्य. आम्ही आमची ही थिल्लर संस्कृती जिवापाड जपणारे हे मनोरंजन विश्व आम्हाला प्यरे. Times have changed म्हणतात. असेलही. पण आमच्या थिल्लर टाईम्स ना एक तपाहून अधिक काळ लोटला. आता कुठे तो वयात येतोय. यापुढे तो अजूनही वृद्धिंगतच होईल.
सुलभीकरण हा आमच्या आजच्या संस्कृतीचा पाया आहे. खरे तर सोपेकरण म्हणावयास हवे. कारण सुलभीकरण हा शब्द देखील काठिण्यपातळीवर वरचाच नाही का? सारे काही कसे सोपे आणि सरळ. उगाच डोक्याला कशाला हवा हेडेक? आमची दमदार पाऊले पुढे पडतच आहेत. अजून पुढेच जाणार आहोत आम्ही. मनोरंजन विश्व आमचे भाव विश्व आहे. त्यातून गांभीर्य आणि लालित्यपूर्णतेची फारकत जीवन किती सोपे करते नाही?

म्हणून सांगतो..
थोडक्यात काय जमाना थिल्लर टाईम्स चा आहे..आजच वाचा..उद्यासाठी
थिल्लर टाईम्स..
टिंग टॉंग..

## ११
## आणि शेवटी.....

**टीकेविना !**

# टीकेविना : एका दिवाळी अंकाचे संपादकीय पान

"क्ष" दिवाळी
*२०२५ दिवाळी*
*घराणेशाही विशेषांक*

**संस्थापक**
अरविंद गोमाजी नाचणेकर
**मानद संपादक**
विश्वनाथ अरविंद नाचणेकर
**संपादक**
मंगेश विश्वनाथ नाचणेकर
**सहसंपादक**
राजेश मंगेश नाचणेकर
राजेश्वरी मंगेश नाचणेकर
सुरेश मंगेश नाचणेकर
**कार्यकारी संपादक**
प्रथमेश राजेश नाचणेकर
**उपसंपादक**
दीपक राजेश नाचणेकर
उमेश सुरेश नाचणेकर
**महिलाविभाग संपादक**
दिव्या दीपक नाचणेकर
मधुरा उमेश नाचणेकर
**बाल विभाग संपादक**
कु.तन्मय उमेश नाचणेकर
कु.श्रेया उमेश नाचणेकर

## संपादकीय

दिवाळीचे स्वागत करताना हा घराणेशाही विशेषांक वाचकांच्या हातात देताना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे. राजेशाही आमच्या अंगात भिनल्याने लोकशाही असूनही घराणेशाही सर्व क्षेत्रात दिसून येते. खासदाराचा मुलगा आमदार आणि आमदाराचा मुलगा नगरसेवक होणे जणू नियमच आहे. वेगवेगळया उद्योगक्षेत्रात ही असेच चित्र दिसते आहे. घराणेशाहीमुळे कित्यक जणांवर अन्याय होतो. हे चित्र बदलणे गरजेचे आहे. याच घराणेशाहीचा विविधांगांनी वेध घेण्याचा हा प्रयत्न आहे.

या वर्षापासून महिला विभाग आणि बालविभाग हे नवीन विभाग सुरू होत आहेत. ही दिवाळी घराणेशाहीचा नाश करणारी होवो हिच प्रार्थना.

संपादक

# ई साहित्य प्रतिष्ठान

इंग्लंडची लोकसंख्या सहा कोटी आहे. आणि महाराष्ट्राची बारा कोटी. इंग्लीश वाचकांची संख्या आहे शंभर कोटी. आणि मराठी वाचक? कुठे आहेत वाचक? कुठे आहे आपली भाषा जगाच्या नकाशावर? कुठे आहोत आपण?

आमची मायबोली जागतिक दर्जाची भाषा आहे! तिला तो मान जगभरातून मिळायला हवा. आणि बाहेरच्यांनी मान देण्यापुर्वी आपण तो द्यायला हवा. माझा मराठाची बोलु कवतुके... अमृतातेही पैजा जिंके.... माउलींनी दाखवलेलं स्वप्न पूर्ण करू तरच आम्ही शिवबाचे मावळे.

आता मराठी ई पुस्तकं तुम्ही www.esahity.com वरून डाऊनलोड करा. किंवा esahity@gmail.com ला कळवून मेल ने मिळवा. किंवा 7710980841 या नंबर ला Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा. किंवा ई साहित्यचे app. https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.www.esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहे. download करा.

आता ठरवलंय. मराठी पुस्तकांनी अवघं विश्व व्यापून टाकू. प्रत्येक मराठी सुशिक्षिताच्या मोबाईलमध्ये किमान पन्नास मराठी पुस्तकं असलीच पाहिजेत. प्रत्येक मराठी माणसाच्या!

तुमची साथ असेल तर सहज शक्य आहे हे... कृपया जास्तीत जास्त लोकांना यात सामिल करून घ्या.

टीम ई साहित्य